नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## कॅश फॉर जॉब केसमध्ये २ हजार आरोपी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :**
तमिळनाडूचे माजी मंत्री व्ही. सेंथिल बालाजी यांच्याशी संबंधित कथित कॅश फॉर जॉब प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने केली. या प्रकरणात २००० हून अधिक लोकांना आरोपी बनवल्याबद्दल न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले.
न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉय मल्ल्या बागची यांच्या खंडपीठाने म्हटले की, जर या खटल्याची सुनावणी झाली तर खटल्यासाठी क्रिकेट स्टेडियमची आवश्यकता असेल.' न्यायालयाने म्हटले आहे की जर न्यायव्यवस्थेने या प्रकरणात हस्तक्षेप केला नसता तर राज्य सरकारने आतापर्यंत हा खटला बंद केला असता.

* वर्ष ५२ * अंक ३० * * अकोला * | गुरुवार, दिनांक ३१ जुलै २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख
## खरीखरी..

## दिव्याचे सुवर्णाभिनंदन !

नागपुरात एका डॉक्टर दाम्पत्याच्या पोटी १९ वर्षापूर्वी एका कन्यारत्नाचा जन्म झाला. खरे तर भविष्यात भव्य दिव्य करणाऱ्या एका कन्येच्या कथेचा हा जन्म आहे. ही मुलगी जन्मताच तिच्या बुद्धिबळप्रेमी आई-वडिलांच्या पावलावर पाऊल टाकणारे ठरली, लहानपणात तिची पावले लहान होती. केवळ तेराव्या वर्षी या दिव्या नावाच्या देशमुख यांच्या कन्येने फारच मोठी मजल मारली आणि आता ती बुद्धिबळ क्षेत्रातील जगाचे डोळे दिपवून टाकणारी व्यक्ती ठरली आहे. आज सकाळी दिव्या नागपुरात परतली ती आता बुद्धिबळाची महाराणी झाली आहे. तिच्या स्वागतासाठी मुख्यमंत्र्यांपासून ते केंद्रीय मंत्र्यांपर्यंत सर्वच उपस्थित होते. त्यांच्यासोबत जनसामान्यांचा समुदाय ही होता. दिव्या भारताची चौथी ग्रँडमास्टर महिला किंवा मुलगी त्यामुळे तिच्या स्वागतासाठी नागपुरातील सर्वच ग्रँड नेते आपला पक्षीय ब्रँड घरी ठेवून जातीने विमानतळावर हजर होते. आजच्या घडीला या सर्वात कमी वयाच्या ग्रँडमास्टरने नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्राचे नाव शिखरावर पोहोचवलेले आहे. नागपुरात अनेक बुद्धिबळपटू खेळाडू होते, आहेत आणि होतीलही पण वयाच्या फक्त एकोणिसाव्या वर्षी या मुलीने तिच्यापेक्षा दुप्पट वयाच्या कोनेरू हम्पीला हरवून हा देदीप्यमान विजय मिळवलेला आहे. अत्यंत भव्यदिव्य यश मिळवलेल्या दिव्याचे आई-वडील डॉक्टर आहेत. त्यांनी दिव्यामधील बुद्धिबळाचे बळ ओळखून तिला या खेळाच्या क्षेत्रामध्ये स्वतःचे करिअर घडवण्याची संधी दिली. दिव्याच्या आईने त्यासाठी आपली वैद्यकीय कारकीर्द थांबवली. दिव्या सुद्धा प्रचंड मेहनत आणि समर्पित भावनेने या खेळाकडे बघत होती आणि ती खेळत होती. आज-काल भारतीय खेळ पूर्णपणे बाद झालेले आहेत. नव्या पोरापोरींना खेळात खेळ म्हणजे क्रिकेटचा खेळ एवढेच ठाऊक आहे पण बुद्धिबळासाठी केवळ बळ नाही तर बुद्धीही हवी असते आणि ही बुद्धी दिव्याकडे उपजतच होती त्यावरच तिच्या आई-वडिलांनी विश्वास ठेवला. त्यामुळेच सर्वात लहान वय असूनही दिव्याच्या दिव्याने दीपत्कार दाखवला. आपल्या भारतात बुद्धिबळाच्या खेळातील बरेच ग्रँड मास्टर आहेत. त्यापैकी २३ ग्रँड मास्टर दक्षिणेमधील आहेत त्यामध्ये विश्वनाथन आनंद, गुकेश, प्रज्ञानानंदा, त्याची बहीण आर वैशाली, हरिकृष्णा, कोनेरू हम्पी, हरीका द्रोणावली, पेन्सिल हरी कृष्णा अर्जुन हेरियसी हे सर्व दक्षिण भारतातील आहेत. यापैकी कोनेरू हम्पीला हरवून आपल्या मराठमोळ्या दिव्याने चमत्कार करून दाखवला आहे. आता ती विश्वविजेती बनलेली आहे. तिने महिलांचा म्हणण्यापेक्षा तरुणींचा सन्मान वाढवलेला आहे. दिव्या आपल्या बुद्धीसोबत शांतपणे पराक्रम करण्यात या आघाडीवर असते. कारण तिने ऑलम्पिक मध्ये तीन वेळा सुवर्ण पदक जिंकलेले आहे. आशियाई चॅम्पियनशिप जिंकलेली आहे, विश्व ज्युनिअर चॅम्पियनशिप आणि विश्व युवा चॅम्पियनशिप मध्ये सर्वोत्कृष्ट स्थान मिळवून तिने आपल्या लहानशा आयुष्यात फार मोठी कामगिरी केलेली आहे. तिच्या खेळात आक्रमक शैली आणि सदैव विचारांची निरंतरता दिसून येते. १९ वर्षाच्या या अत्यंत छोट्या वयात दिव्या महिलांच्या कॅंडिडेट टूर्नामेंटसाठी पात्र ठरणारी कमी वयाची पहिली महिला ठरली आहे. बुद्धिबळात चिन्यांची आघाडी असते, आता तिचा सामना चिनी ग्रँडमास्टर सोबत होईल. हीच दिव्या बुद्धिबळा सोबत आपले शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणही पूर्ण करीत आहे. तिच्या खेळाची बरीचशी वैशिष्ट्ये आहेत. मात्र प्रतिस्पर्ध्याला गोंधळात टाकून गुण पटकवण्यामध्ये दिव्या पटाईत आहे. कमीत कमी चालीमध्ये विजय मिळवणे दिव्याला बरोबर जमते. कमी वेळात निर्णय घेण्याची क्षमता आणि आक्रमकता ही तिची जमेची बाजू आहे. तणाव आला की अनेकजण त्यामुळे तणावबाधित होतात पण आपली दिव्या तेव्हाही स्थितप्रज्ञ राहते. 'ना उल्हासे, ना संतापे... तिची प्रज्ञा स्थिरावते' बुद्धिबळाच्या क्षेत्रात किंवा खेळ प्रज्ञा आणि स्थितप्रज्ञतेला जास्त महत्त्व असते. श या सर्व भव्य दिव्य यशात तिच्या पालकांचा आशीर्वाद आणि तिच्यावर असलेल्या विश्वास त्यासोबतच त्यांची दूरदृष्टीही दिसून येते. आजकाल प्रत्येक पालकाला मुलाची इच्छा नसतानाही आपल्या मुलाने डॉक्टर बनावे, इंजिनियर बनावे, आयटी इंजिनियर बनावे आणि भरपूर पैसे कमवावे असे वाटते. मातापित्यांच्या अशा प्रकारच्या स्वप्नांच्या? ओझ्याखाली त्या गरीब बिचाऱ्या मुलांच्या इच्छेचे पार मातेरे होऊन जाते. पण या दिव्याच्या पालकांनी दिव्या पराभूत झाल्यावरही तिला शाबासकी दिली आणि जिंकल्यावर अधिक शांत कसे राहावे शिकवलेले आहे. हे यश मिळवलेल्या दिव्याला महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या शुभेच्छा आणि आशीर्वाद तर मिळालेलेच आहेत आणि ती आता राष्ट्राची संपत्ती झालेली आहे. या राष्ट्रीय संपत्तीचे सुवर्णाभिनंदन!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## इस्त्रोकडून सर्वात महागडा व शक्तिशाली
# उपग्रह निसार लॉंच



नासाच्या सहकार्याने निर्मिती ■ घनदाट जंगल व अंधारातही पाहण्याची क्षमता

■ **वृत्तसंस्था, श्रीहरीकोटा, दि. ३० :**
सर्वात महागडा आणि सर्वात शक्तिशाली पृथ्वी निरीक्षण उपग्रह निसार आज बुधवार, ३० जुलै रोजी प्रक्षेपित करण्यात आला. श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून सायंकाळी ५:४० वाजता जीएसएलव्ही एफ १६ रॉकेटद्वारे त्याचे प्रक्षेपण करण्यात आले.
हे रॉकेट निसारला ७४३ किमी उंचीवर, ९८.४ अंश कललेल्या सूर्य-समकालिक कक्षेत स्थापित करेल. यासाठी सुमारे १८ मिनिटे लागतील. हा उपग्रह नासा आणि इस्त्रोने संयुक्तपणे तयार केला आहे.
निसार ७४७ किमी उंचीवर असलेल्या ध्रुवीय कक्षेत फिरेल. ध्रुवीय कक्षा म्हणजे अशी कक्षा ज्यामध्ये उपग्रह पृथ्वीच्या ध्रुवांवरून जातो. या मोहिमेचा कालावधी ५ वर्षांचा आहे.
निसार हा एक उच्च तंत्रज्ञानाचा उपग्रह आहे. त्याचे पूर्ण नाव नासा आणि इस्त्रो सिंथेटिक अपर्चर रडार आहे. हे अमेरिकन अंतराळ संस्था नासा आणि भारतीय संस्था इस्त्रो यांनी संयुक्तपणे तयार केले आहे. या मोहिमेवर १.५ अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे १२,५०० कोटी रुपये खर्च झाले आहेत.
हा उपग्रह ९७ मिनिटांत पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करेल. १२ दिवसांत १,१७३ प्रदक्षिणा पूर्ण करून, तो पृथ्वीच्या जमिनीच्या जवळजवळ प्रत्येक इंचाचा नकाशा तयार करेल.
यामुळे त्याला ढग, घनदाट जंगले, धूर आणि अंधारातही पाहण्याची क्षमता मिळते. पृथ्वीच्या पृष्ठभागावरील अगदी लहान बदल देखील तो पाहू शकतो.
निसार मोहिमेचा मुख्य उद्देश पृथ्वी आणि तिच्या पर्यावरणाला जवळून समजून घेणे आहे. हा उपग्रह विशेषतः तीन गोष्टींवर लक्ष ठेवेल. यामध्ये पृथ्वीच्या पृष्ठभागावर किंवा हिमनद्यांमध्ये किती बदल होत आहेत ते पाहिले जाईल. जसे की जमीन खाली जाणे किंवा बर्फ वितळणे.
पर्यावरणाची स्थिती समजून घेण्यासाठी जंगले, शेतजमीन आणि इतर नैसर्गिक क्षेत्रांच्या स्थितीचे निरीक्षण करेल. समुद्राच्या लाटा, त्यांचे बदल आणि सागरी पर्यावरणाचा मागोवा घेईल.
या माहितीमुळे, शास्त्रज्ञ हवामान बदल, नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरण अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतील. मिशनचा ओपन-सोर्स डेटा सर्वांना मोफत उपलब्ध असेल. ही एक अत्याधिक खर्चिक मोहिम असून, दोन देश एकत्रिपणे राबवत आहेत.

## भारतावर २५% कर लादण्याची
# ट्रम्प यांची घोषणा

■ **वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. ३० :**
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५% कर लादण्याची घोषणा केली आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट केले की भारत रशियासोबत शस्त्रास्त्रे आणि तेलाचा व्यापार करत आहे, त्यामुळे त्यावर दंड देखील आकारला जाईल.



ट्रम्प यांनी दुसऱ्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, भारताची अमेरिकेसोबतची व्यापार तूट खूप जास्त आहे म्हणून ते भारतीय वस्तूंवर शुल्क लादत आहेत.
ट्रम्प म्हणाले, भारत हा अमेरिकेचा मित्र आहे, परंतु गेल्या काही वर्षांत आम्ही त्यांच्याशी कमी व्यापार केला आहे कारण त्यांचे शुल्क खूप जास्त आहे. भारतात अशी अनेक धोरणे आहेत ज्यामुळे अमेरिकन कंपन्यांना व्यवसाय करण्यात अडचणी निर्माण होतात.
आजही भारत आपली बहुतेक शस्त्रे रशियाकडून खरेदी करतो. एवढेच नाही तर चीनसह भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल आणि वायू देखील खरेदी करतो, तर रशियाने युक्रेनमधील हिंसाचार थांबवावा अशी संपूर्ण जगाची इच्छा आहे, असेही ते म्हणाले. यामुळे, अमेरिकेने आता १ ऑगस्टपासून भारतातून येणाऱ्या वस्तूंवर २५% कर लादण्याचा निर्णय घेतला आहे.

## ऑपरेशन सिंदूर 'तमाशा' : प्रणिती शिंदेंवर टीकेची झोड

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :**
संसदेच्या पावसाळी अधिवेशनात पहलगाम हल्ला आणि त्यानंतर राबवण्यात आलेले ऑपरेशन सिंदूर यावरील चर्चेत बोलताना काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी ऑपिरशन सिंदूर हे सरकारने माध्यमांमध्ये केलेला एक तमाशा होता असे वादग्रस्त विधान केले होते. यावरून त्यांच्यावर सत्ताधाऱ्यांनी टीकेची झोड उठवली होती. यावर स्पष्टीकरण देताना प्रणिती शिंदे यांनी भाजपवरच पलटवार केला आहे.



प्रणिती शिंदे म्हणाल्या, देशभक्ती आणि राष्ट्रवाद आम्हाला ना भाजप शिकवू शकते ना ट्रोल्स शिकवू शकतात. मी एवढेच विचारू इच्छिते की जे वारंवार सैनिकांचा अपमान करतात आणि म्हणतात की एका व्यापाऱ्याला जास्त अडचणी सहन कराव्या लागतात, सैनिकांपेक्षा जास्त. हा अपमान नाही का? असा सवाल प्रणिती शिंदे यांनी उपस्थित केला.
पुढे बोलताना प्रणिती शिंदे म्हणाल्या, आमच्या भाषणामुळे त्या सव्वीस मृतांच्या कुटुंबीयांना वाईट वाटले असेल, तर हजार वेळा माफी मागू, पण भाजपचे ट्रोल्स, ट्रोलिंग आर्मी आणि अंधभक्तांची मी कधीच माफी मागणार नाही. तसेच ऑपरेशन सिंदूर जे करण्यात आले, त्याचे सर्वस्वी श्रेय हे सैनिकांचे होते पण याचे क्रेडिट भाजप घेत आहे आणि त्याचा एक पीआर स्टंट तयार करण्यात आला असल्याचा आरोप प्रणिती शिंदे यांनी केला आहे.

### हा तर सेनेचा अपमान



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील त्यांच्या या वक्तव्याचा निषेध केला. ऑपरेशन सिंदूरला तमाशा म्हणजे हा सेनेचा अपमान करण्यासारखे आहे, असे विधान करणाऱ्यांचा मी निषेध करतो. या प्रवृत्तीचा मी धिक्कार करतो, असा घणाघात देवेंद्र फडणवीस यांनी प्रणिती शिंदेंवर केला.
सांगली जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते अण्णासाहेब डांगे यांनी आपल्या दोन मुलांसह आज भाजपमध्ये प्रवेश केला. या पक्षप्रवेशानंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी प्रणिती शिंदे यांच्या वक्तव्याचा निषेध केला.
जर सेनेचा अपमान करणारे या देशामध्ये नेते असतील, तर निश्चितपणे अशांच्यासमोर प्रश्न चिन्ह लागणे हे स्वाभाविक आहे, काल पंतप्रधानांनी काँग्रेसला उघडे पाडले, जी भाषा पाकिस्तान बोलतोय, तीच भाषा काँग्रेस बोलत असल्याचे ते म्हणाले.

## शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाचा वाद
# आता १० सप्टेंबर नंतरच निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
शिवसेना पक्ष आणि चिन्हाचा वादावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या संदर्भात आगामी २० ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालय अंतिम निकाल देण्याची अपेक्षा होती. मात्र, आता या प्रकरणाचा निकाल पुन्हा एकदा लांबीवर पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.
वास्तविक या प्रकरणाचा निकाल देणारे न्यायमूर्ती सूर्यकांत हे आता सर्वोच्च न्यायालयाच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या घटना पीठामध्ये असल्यामुळे शिवसेना चिन्ह बाबतीत असलेल्या प्रकरणाचा निर्णय आणखी पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.
राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्या वादामध्ये राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाकडे सल्ला मागितला आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने घटना पीठाची स्थापना केली आहे. हे घटना पीठ १९ ऑगस्ट पासून सुनावणी करणार आहे. त्यामुळे आता शिवसेना वादाचा निकाल आणखी काही दिवस पुढे जाण्याची शक्यता आहे.

## निवडणूक आयोगाच्या यादीवर
# आता काँग्रेसचा 'वॉच'

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली समिती

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :**
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाच्या वतीने जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे.



निवडणूक आयोगाच्या मतदार यादीवर आता काँग्रेस पक्षाचा वतीने वॉच ठेवण्यात आले आहे. त्यासाठी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी महाराष्ट्र निवडणूक आयोगावर केलेल्या आरोप संदर्भातले पुरावे शोधले जाणार आहेत.
याबाबतची माहिती देण्यासाठी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी पत्रकार परिषदेत घेतली. या पत्रकार परिषदेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२० मध्ये केलेल्या आचारसंहिता भंगाची देखील माहिती देण्यात आली. यासंदर्भात देखील काँग्रेस लवकरच उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.
नरेंद्र मोदींचे पंतप्रधानपद आणि लोकसभा सदस्यत्व रद्द करण्याच्या मागणीसाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती चव्हाण यांनी दिली.
मोदींनी २०२० मध्ये आचारसंहितेचा भंग केला असल्याचा दावा काँग्रेसच्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भात निवडणूक आयोगाने देखील अंशतः सदरील प्रकरण मान्य केले असल्याचा दावा चव्हाण यांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले जात आहे.
राहुल गांधी महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीवर आक्षेप घेत आहेत. त्या माहितीच्या आधारावर एक कमिटी स्थापन केली आहे. अहवाल लवकरच सादर करणार असल्याचे चव्हाण यांनी म्हटले आहे.

## विरोधकांचा सभात्याग

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :**
राज्यसभेत ऑपरेशन सिंदूरवर विशेष चर्चा सुरू असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सभागृहात भाषण करण्यासाठी आले. यावर विरोधकांनी गोंधळ घातला आणि पंतप्रधान मोदींना बोलावण्याची मागणी केली.
यावर शाह म्हणाले, विरोधक विचारत आहेत की पंतप्रधान कुठे आहेत? पंतप्रधान सध्या कार्यालयात आहेत, त्यांना जास्त ऐकण्यात रस नाही. जर माझ्याने होत आहे, त्यांना का बोलवायचे?
यावर मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, 'पंतप्रधान दिल्लीत असूनही येथे येत नाहीत, हा सभागृहाचा अपमान आहे. सभागृहातील सदस्यांचा अपमान करणे योग्य नाही.' यानंतर, विरोधकांनी राज्यसभेतून सभात्याग केला.
शहा म्हणाले, पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेल्या नुकसानाला प्रत्युत्तर म्हणून, भारत सरकार आणि सैन्याने ऑपरेशन सिंदूरने जोरदार प्रत्युत्तर दिले. ऑपरेशन महादेवमध्ये तीन दहशतवादी मारले गेले.
अमित शहा म्हणाले, चिदंबरम म्हणाले की ऑपरेशन सिंदूर निर्णायक होते असे म्हणता येणार नाही. ते सध्या येथे उपस्थित नाहीत, परंतु मी त्यांना उत्तर देऊ इच्छितो. १९६५ आणि १९७१ ची युद्धे निर्णायक होती का? जर हो, तर दहशतवाद का पसरत राहिला? जोपर्यंत शत्रू घाबरत नाही किंवा सुधारणा करत नाही तोपर्यंत निर्णायक अंत होणार नाही. इतक्या वर्षात त्यांना घाबरवण्यासाठी कोणतीही कारवाई केलेली नाही, मग ते का घाबरतील?
राज्यसभेत सलग दुसऱ्या दिवशी ऑपरेशन सिंदूरवर चर्चा झाली. शहा यांच्या आधी भाजप खासदार जेपी नड्डा म्हणाले की, २०१४ पूर्वी सर्वत्र बॉम्बस्फोट होत होते, परंतु यूपीए सरकार पाकिस्तानी लोकांना मिठाई देत राहिले.

## राज्यातील ५ लाख विस्थापित सिंधी परिवारांना
# मालमत्तापत्र मिळणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
राज्यात ठाणे आणि उल्हासनगर वगळता इतर ३५ शहरांमध्ये सुमारे पाच लाख विस्थापित सिंधी परिवार राहतात. या परिवारांना मालमत्तापत्र देण्यात येणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



राज्यातील प्रत्येक शेतरस्त्याचे वाद मिटवून येत्या पाच वर्षात प्रत्येक शेताला १२ फुटांचा रस्ता उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. येत्या १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत आयोजित होणाऱ्या महसूल सप्ताहाबाबत मंत्री बावनकुळे यांनी माहिती दिली. त्यावेळी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना ते बोलत होते.
महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांसाठी ५०० रुपयांचा स्टॅम्प पेपर लागत होता, आता याची आवश्यकता राहणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यांसह लाभार्थ्यांना महसूल विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यामध्ये उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा तसेच उत्कृष्ट निवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचा १ ऑगस्ट रोजी सत्कार करण्यात येणार आहे.
शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन राहत असलेल्या ३१ डिसेंबर २०११ पूर्वीच्या नागरिकांना त्यांच्या घराचा पट्टा वाटप करण्यात येणार आहे. पंतप्रधानांच्या सर्वांसाठी घरे योजनेअंतर्गत सुमारे ३० लाख नागरिकांना याचा लाभ मिळेल.
शेतासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असलेल्या पांदण / शिवपांदण रस्त्यांचे वाद वर्षानुवर्षे सुरू राहतात. हे वाद मिटविण्यासाठी आदर्श कार्यप्रणाली निश्चित करण्यात येत आहे. यानुसार तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी यांच्यास्तरावर दोन अपिल होऊन ३ ऑगस्ट रोजी अंतिम निर्णय होईल. त्यानंतर शेताच्या बांधावर १२ फुटांचा रस्ता तयार करुन त्यांना क्रमांक दिले जातील.
या रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लागवड केली जाईल. ही झाडे तोडल्यास वन विभागाच्या कायद्यानुसार गुन्हा दाखल होईल, असे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले. येत्या पाच वर्षात रस्ता नाही असे एकही शेत शिल्लक राहणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
महसूल विभागांतर्गत प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी ४ ऑगस्ट रोजी महसुली मंडळात शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## सर्वोच्च न्यायालयाचा
# सरकारला दणका

सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरण





■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
परभणी जिल्ह्यातील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी उच्च न्यायालयाने पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले होते. आता सर्वोच्च न्यायालयाने देखील या प्रकरणात उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला असल्याची माहिती ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिली आहे.
प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य आणि इतर विरुद्ध विजयबाई वेंकट सूर्यवंशी या खटल्यात माननीय सर्वोच्च न्यायालयाने आमच्या बाजूने निकाल दिला आहे आणि उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आहे.



## एसटीला मिळाली दिलासादायक बचत

### प्रताप सरनाईक यांच्या पुढाकारामुळे वर्षाला १२ कोटींची बचत

**मुंबई प्रतिनिधी :** आर्थिक अडचणीत सापडलेल्या एसटी महामंडळाला आता दिलासा मिळणार आहे. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या व्यावसायिक दृष्टिकोनातून आणि कणखर भूमिकेमुळे एसटी महामंडळ दरवर्षी तब्बल १२ कोटी रुपये वाचवणार आहे. इंधनाच्या दरांमध्ये सवलत मिळवून देण्यात मंत्री सरनाईक यशस्वी ठरले आहेत.

**डिझेलवरील सवलतीत वाढ ; दरवर्षी कोट्यवधींची बचत**

इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या दोन सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांनी एसटी महामंडळाला पुरवण्यात येणाऱ्या डिझेल इंधनावर मिळणाऱ्या सवलतीत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. १ ऑगस्टपासून लागू होणाऱ्या नव्या निर्णयानुसार, डिझेलच्या प्रति लिटर सवलतीत ३० पैशांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे दररोज सुमारे ३.२३ लाखांची तर वर्षाला सुमारे ११.८० कोटी रुपयांची बचत होणार आहे.

**७० वर्षांचा जुना करार आणि नव्या वाटाघाटींचे यश**

एसटी महामंडळ गेली अनेक दशके इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियमकडूनच डिझेल खरेदी करत आहे. सध्या दररोज एसटी महामंडळाला १० कोटी ७८ लाख लिटर डिझेल लागते. महामंडळ हा या कंपन्यांचा मोठा ग्राहक असतानाही सवलत दरात फार काळ बदल करण्यात आला नव्हता. मात्र प्रताप सरनाईक यांनी या प्रश्नावर मंत्रालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठकांचे आयोजन केले. खाजगी इंधन कंपन्यांशीही चर्चा करत स्पर्धात्मक निविदा काढण्याची तयारी दाखवली, ज्यामुळे दबाव वाढला आणि अखेर कंपन्यांनी सवलतीत वाढ करण्यास होकार दिला.

**भावी काळात अधिक बचतीची संधी**

सध्या एसटीच्या २५१ आगारांमधून इंधन पुरवठा केला जातो. भविष्यात बससेवेचा विस्तार आणि खप वाढल्यास सवलतीचा लाभ आणखी वाढू शकतो.

**सरनाईक यांचा विश्वास -'एसटीला आर्थिक उभारी मिळणार!'**

'एसटी महामंडळाची स्थिती सावरण्यासाठी जिथे शक्य असेल तिथे काटकसर केली पाहिजे. तसेच तिकीट विक्रीव्यतिरिक्त उत्पन्नाचे नवे मार्ग शोधले पाहिजेत. हे दोन्ही प्रयत्न एकत्र केल्यास एसटी भविष्यात आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल,' असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. सरनाईक यांच्या या पुढाकारामुळे एसटी महामंडळाला आर्थिक दिलासा मिळणार असून ही धोरणात्मक यशस्वी वाटचाल आहे, असे सांगण्यात येत आहे.

## राज्यातील ७० आयटीआयमध्ये नवीन अभ्यासक्रमांची क्रांती

**मुंबई, ३० जुलै :** महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये क्रांतिकारी बदलांची नांदी होत असून राज्यातील ७० शासकीय आयटीआय संस्थांमध्ये 'सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिक)' आणि 'ईव्ही मेकॅनिक (इलेक्ट्रिक व्हेईकल)' हे रोजगाराभिमुख नवीन अभ्यासक्रम सुरू होणार आहेत. याबरोबरच अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या सक्षमीकरणासाठी चेंबूर येथे उच्चस्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यासही केंद्र सरकारने मान्यता दिली आहे, अशी माहिती कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

या निर्णयामुळे बदलत्या औद्योगिक गरजांशी सुसंगत कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याचा मार्ग मोकळा होणार असून सौर ऊर्जेशी संबंधित आणि इलेक्ट्रिक वाहन दुरुस्ती क्षेत्रात प्रचंड संधी निर्माण होतील, असेही मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले. राज्य सरकारने पर्यावरणपूरक व नव्या तंत्रज्ञानाधारित अभ्यासक्रमावर भर दिला असून, उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊनच हे अभ्यासक्रम सुरू केले जात आहेत. या अभ्यासक्रमांची मागणी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने केंद्र शासनाकडे केली होती, त्याला केंद्राकडून मान्यता मिळाली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉ. रघुनाथ माशेलकर व प्रवीण परदेशी यांच्या सल्ल्यानुसार नविन अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

चेंबूर येथे उभारण्यात येणाऱ्या नव्या आयटीआय संस्थेमध्ये रेफ्रिजरेशन ॲण्ड एअर कंडिशनिंग टेक्निशियन, इलेक्ट्रिशियन, वायरमन, आयओटी टेक्निशियन (स्मार्ट सिटी) आणि इलेक्ट्रिक मेकॅनिक हे अभ्यासक्रम शिकवले जाणार आहेत. या उपक्रमामुळे मागास वर्गातील तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळून त्यांना रोजगाराच्या नव्या संधी मिळणार आहेत.

राज्यातील ३६ जिल्हा स्तरीय आयटीआय संस्थांमध्ये खाजगी औद्योगिक आस्थापनांच्या सहभागातून दर्जावाढ केली जात आहे. यामुळे प्रशिक्षण सुविधा अधिक सक्षम होत असून, राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगानेही उपयुक्त कौशल्य अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत.

राज्यातील तरुणांमध्ये कौशल्य व उद्योजकतेचा विकास घडवून आणत आयटीआय संस्थांना 'हाय स्किल ब्रँड' म्हणून उभं करण्याचा संकल्प कौशल्य विकास विभागाने केला असून, तंत्रप्रदर्शन व करिअर मार्गदर्शन शिबिरांद्वारे विद्यार्थ्यांना अधिकाधिक रोजगाराभिमुख बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे, असेही मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले.

## १ ते १० ऑगस्टदरम्यान तुळजाभवानीचे गाभाऱ्यातील दर्शन बंद

**भाविकांना फक्त मुखदर्शनाची परवानगी**

**तुळजापूर :** श्री तुळजाभवानी मंदिरात देवीच्या सिंहासन मंडपात (मुख्य गाभाऱ्यात) सध्या जीर्णोद्धाराचे काम सुरू असून, या पार्श्वभूमीवर १ ते १० ऑगस्टदरम्यान देवीचे गाभाऱ्यातील दर्शन बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत भाविकांना केवळ मुखदर्शनाची मुभा देण्यात आली आहे.

या दरम्यान देवीच्या सिंहासन गाभाऱ्यात कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. मंदिरातील शिल्पकलेचे संरक्षण आणि ऐतिहासिक वास्तूंच्या टिकावासाठी पुरातत्त्व विभागामार्फत जीर्णोद्धाराचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. हे काम पूर्ण होईपर्यंत सुरक्षा कारणास्तव गाभाऱ्यातील थेट दर्शन बंद ठेवण्यात आले आहे.

देवस्थान समिती व प्रशासनाने भाविकांनी संयम बाळगावा, गर्दी टाळावी व मंदिर प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन केले आहे. यासोबतच मुखदर्शनाची व्यवस्था सुयोग्य पद्धतीने करण्यात आली असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरवर्षी श्रावण मासात आणि सप्ताहांतामध्ये लाखो भाविक तुळजाभवानीच्या दर्शनासाठी येतात. त्यामुळे या निर्णयामुळे काही काळ भाविकांची निराशा होण्याची शक्यता आहे. मात्र देवीच्या मूळ स्थापनेचे जतन हेच उद्दिष्ट असल्याने सर्वांनी सहकार्य करावे, असेही देवस्थान समितीने स्पष्ट केले.

# पाच लाख सिंधी कुटुंबांना मालमत्तापत्रांचा दिलासा

### अतिक्रमणधारकांना मिळणार घराचा हक्क

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई , दि. ३०:** राज्यात ठाणे आणि उल्हासनगर वगळता इतर ३५ शहरांमध्ये वास्तव्यास असलेल्या सुमारे ५ लाख सिंधी विस्थापित कुटुंबांना मालमत्तापत्र मिळणार असल्याची मोठी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. याचबरोबर राज्यातील प्रत्येक शेतापर्यंत १२ फूट रस्ता पोहोचवण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना महसूल मंत्री बावनकुळे यांनी १ ते ७ ऑगस्ट २०२५ दरम्यान साजऱ्या होणाऱ्या 'महसूल सप्ताह' संदर्भातील माहिती दिली. यावेळी विविध योजना, निर्णय व कार्यक्रमांची माहिती देत त्यांनी महसूल विभागाच्या कार्यपद्धतीतील आमूलाग्र बदल जाहीर केले.



**विद्यार्थ्यांना स्टॅम्पपेपरमधून दिलासा**

विद्यार्थ्यांना विविध शासकीय प्रमाणपत्रांसाठी लागणारा ५०० रुपयांचा स्टॅम्प पेपर आता लागणार नाही, असा दिलासादायक निर्णयही त्यांनी यावेळी घोषित केला.

३१ डिसेंबर २०११ पूर्वीच्या अतिक्रमण धारकांना घरपट्टा

२ ऑगस्ट रोजी ३१ डिसेंबर २०११ पूर्वी शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून राहत असलेल्या कुटुंबांना त्यांच्या घराचा पट्टा वाटप केला जाणार आहे. यामुळे सुमारे ३० लाख नागरिकांना लाभ होणार आहे.

**शेत रस्त्यांचा कायमस्वरूपी तोडगा**

राज्यात अनेक ठिकाणी पांदण/शिवपांदण रस्त्यांवरून वाद सुरू असतात. हे वाद मिटवण्यासाठी नवीन कार्यपद्धती राबवण्यात येणार आहे. यानुसार ३ ऑगस्ट रोजी अपिलीनंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल आणि त्यानंतर प्रत्येक शेताला १२ फूट रस्ता दिला जाईल. या रस्त्यांच्या दोन्ही बाजूंनी झाडे लावण्यात येणार असून त्यांची तोड केली तर गुन्हा दाखल केला जाईल.

**महसुली प्रलंबित प्रकरणांसाठी शिबिरे**

४ ऑगस्ट रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी महसुली मंडळात शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. याशिवाय ५ ऑगस्ट रोजी तलाठी थेट लाभार्थ्यांच्या घरी जाऊन डीबीटी अडचणी सोडवतील.

**शर्तभंग झालेल्या जमिनी सरकारकडे परत**

६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीच्या शर्तभंगाचे सर्वेक्षण होणार असून शर्तभंग झालेल्या जमिनी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून सरकारकडे परत घेतल्या जातील.

**कृत्रिम वाळू धोरणाची अंमलबजावणी**

एम-सँड(कृत्रिम वाळू) वापरास प्राधान्य देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले असून ७ ऑगस्ट रोजी कार्यशाळा व शिबिरे आयोजित करून या धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

**'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' अभियान**

१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' अभियान राबविले जाणार आहे. महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी फेस ॲपच्या माध्यमातून उपस्थिती नोंदवण्याची नवी व्यवस्था लागू केली जाणार आहे.

## पंतप्रधान मोदीं विरोधात आचारसंहिता भंगाची कारवाई करा

### अन्यथा उच्च न्यायालयात जाणार: पृथ्वीराज चव्हाण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई , दि. ३०:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२० साली आदर्श आचार संहितेचे उल्लंघन केले पण त्याविरोधात केलेल्या तक्रारीवर कारवाई करण्यास राज्य निवडणूक आयोगाने टाळाटाळ केली आहे. आचारसंहितेचा भंग केल्याचे आयोगाने मान्य करत केवळ रेल्वे प्रशासनाला समज दिली पण मोदींवर कारवाई केलेली नाही. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यावरही कठोर कारवाई करण्यात आली होती.

कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही मग नरेंद्र मोदींवर आयोग कारवाई का करत नाही असा प्रश्न काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. याप्रकरणी उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचेही ते म्हणाले.

२८ डिसेंबर २०२० रोजी सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदार संघात पंतप्रधान नरेंद्र मोदी, तत्कालीन रेल्वे मंत्री, कृषी मंत्री यांनी सांगोला ते पश्चिम बंगालमधील शालिमार या किसान रेल्वेच्या १०० व्या गाडीचा शुभारंभ केला.

यावेळी महाराष्ट्रात ग्रामपंचायत निवडणुका व पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुका सुरु होत्या.

हा कार्यक्रम देशभर टीव्हीवर प्रसारित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी निवडणूक आयोग व जिल्हा प्रशासन यांची कोणतीही परवानगी घेतली नव्हती.

याविषयी प्रफुल्ल कदम या कार्यकर्त्याने निवडणूक आयोगाकडे तक्रार केली असता सुरुवातीला वेळकाढूपणा करण्यात आला पण शेवटी आचारसंहिता भंग झाल्याचे मान्य करत केवळ रेल्वे प्रशासनाला समज देण्यात आली.

या प्रकरणी सरळ सरळ कायदा धाब्यावर बसवण्यात आलेला आहे हे स्पष्ट दिसत असतानाही नरेंद्र मोदी यांच्यावर कारवाई केली जात नाही, असे चव्हाण म्हणाले. नरेंद्र मोदी यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## शालेय वाहतूक धोरणातील विसंगतीमुळे स्कूल व्हॅन चालकांना मनस्ताप

### स्कूल व्हॅन चालकांचा पत्रपरिषदेत आक्रोश



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या ४२ आसनी खासगी स्कूल बसला प्रतिविद्यार्थी ४ हजार २०० रुपये रस्ते कर आकारला जातो. मग ७ आसनी स्कूल व्हॅनला प्रतिविद्यार्थी ७ हजार -रुपये कर का, असा सवाल स्कूल व्हॅन चालकांच्या विविध संघटनांकडून उपस्थित करण्यात आला. ही विसंगती दूर न केल्यास २३ ऑगस्टला आंदोलनाची घोषणा करू, असा इशारा स्कूल व्हॅन चालकांच्या संघटनेकडून दिला गेला. वाहतूक आघाडी वेलफेअर असोसिएशन आणि स्कूल व्हॅन चालक संघटना, नागपूर शहरतर्फे प्रेस क्लबमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत असोसिएशनचे सचिव उदय आंबूलकर म्हणाले, शासनाच्या २०११ च्या शालेय वाहतूक धोरणातील विसंगतींमुळे स्कूल व्हॅन चालकांवर आर्थिक आणि मानसिक ताण निर्माण झाला आहे. शैक्षणिक संस्थांच्या मालकीच्या वाहनांसाठी वयोमर्यादा २० वर्षे असून खासगी स्कूल व्हॅनसाठी ती १५ वर्षे आहे. ही तफावत अन्यायकारक आहे. सर्वांसाठीच ही वयोमर्यादा २० वर्षे हवी. मोठ्या स्कूल बस एका फेरीत ३० ते ३५ विद्यार्थी वाहतूक करू शकतात, तर ७ आसनी व्हॅन ८-१० कि.मी.च्या परिसरात मर्यादित फेऱ्या करतात. त्यामुळे दोघांवर एकसमान नियम लावणे चुकीचे आहे. रस्ते कराबाबतही मोठ्या बसला प्रति सीट ४ हजार २०० रुपये आकारले जाते तर सात आसनी खासगी स्कूल व्हॅनला प्रतिविद्यार्थी ७ हजार रुपये आकारून गरिबांची लूट केली जाते. शासनाने कररचना सुलभ करून एकसूत्रीय पद्धत लागू करायला हवी. सध्याच्या नियमावलीत केवळ खाजगी चालकांनाच दोषी ठरवले जाते, परंतु विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उत्तरदायी असलेल्या पालक, शिक्षक, स्थानिक प्रशासकीय समिती यांची जबाबदारी मात्र विचारात घेतली जात नाही.

प्रत्येक वर्षी फिटनेससाठी पासिंग दरम्यान नवनवे नियम लादले जातात. एकाच विभागातील अधिकाऱ्यांकडून भिन्न भिन्न मागण्या केल्या जातात, जेणेकरून चालकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. तातडीने न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा यावेळी दिला गेला. पत्रपरिषदेला श्यामसुंदर सोनटक्के, विलीन पात्रीकर, अफसर खान, प्रकाश देवतळे आणि इतरही पदाधिकारी उपस्थित होते.

### प्रवाशांच्या सोयीसाठी आधुनिक प्रतीक्षा कक्ष व विश्रांती गृहांची निर्मिती



**नागपूर, ३० जुलै :** अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत नागपूर विभागाकडून नागपूर रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास जलद गतीने सुरू आहे. प्रवाशांच्या सोयी व आरामाला प्राधान्य देत आधुनिक प्रतीक्षालये व विश्रांती गृहांच्या माध्यमातून प्रवासाचा अनुभव अधिक सुखद करण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्थानकाच्या पूर्वेकडील बाजूस आधुनिक व प्रशस्त प्रतीक्षा कक्षाची निर्मिती सुरू असून त्यामध्ये उत्कृष्ट दर्जाचे टाइल फ्लोअरिंग, भिंतींवर आकर्षक क्लॅडिंग, सुधारित वेंटिलेशन प्रणाली व ऊर्जा बचतीची प्रकाशयोजना करण्यात येत आहे. फॉल्स सीलिंग व लूव्हर्स बसवण्याचे काम प्रगतीपथावर आहे. पश्चिमेकडील भागात लांब पल्ल्याच्या प्रवाशांसाठी सुसज्ज विश्रांतीगृह तयार केले जात आहे, जिथे प्रीमियम बसण्याची व्यवस्था, दिव्यांग प्रवाशांसाठी सोयीसुविधा आणि उत्कृष्ट स्वच्छता सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.



## शहरातील रस्त्यांना 'हेल्दी स्ट्रीट्स'चे रूप देण्याचा निर्धार

### मनपा व आयटीडीपीची विशेष कार्यशाळा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** नागपूर शहरातील रस्ते पादचारी, वाहनचालकांसाठी सुरक्षित, सर्वसमावेशक आणि सुलभ व्हावेत याकरिता शहरातील रस्त्यांना 'हेल्दी स्ट्रीट्स' रूप देण्याचा निर्धार नागपूर महानगरपालिका आणि आयटीडीपी (खढऊझ ळपवळर -इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्टेशन अँड डेव्हलपमेंट पॉलिसी इंडिया) यांच्या संयुक्त विद्यमाने 'हेल्दी स्ट्रीट्स' या उपक्रमाअंतर्गत बुधवारी (ता.३०) वनामती सभागृह येथे आयोजित विशेष कार्यशाळेत उपस्थितांनी केला. कार्यशाळेला नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंघल, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्त श्री संजय मीना, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, पोलीस उपायुक्त (वाहतूक) श्री. लोहित मतानी आणि नागपूर महामेट्रोचे श्री. महेश मोरोने उपस्थित होते. उपस्थितांना मार्गदर्शन करताना मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले की, नागपूर शहरातील रस्त्यावर चालताना पादचाऱ्यांना सुरक्षित वाटले पाहिजे. रस्ते हे पादचाऱ्यांसाठी सुयोग्य, सुरक्षित आणि अतिक्रमणमुक्त असायला हवे.

## गंगाझरीकाचेवानी रेल्वे विभागातील समपार फाटक क्रमांक ५१४ कायमचा होणार बंद

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** नव्याने बांधलेल्या मर्यादित उंचीच्या सबवेमधून वाहतूक सुरळीत होईल. दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे उद्दिष्ट प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास अनुभव प्रदान करणे आहे.

रस्ते वाहतूक आणि रेल्वे वाहतूक जलद आणि अखंडित करणे हे देखील त्यांच्या प्राधान्यांपैकी एक आहे. सुरक्षितता आणि सुरक्षेच्या दृष्टिकोनातून, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभाग टप्प्याटप्प्याने सर्व उपलब्ध समपार फाटक बंद करत आहे आणि त्या जागी अंडरपास/रोड ओव्हर ब्रिज बांधले जात आहेत.

त्याच क्रमाने, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभागाअंतर्गत गंगाझरीम काचेवानी रेल्वे विभागात स्थित मानव संरक्षित समपार फाटक क्रमांक ५१४ (किमी १०१५/२७-२९) नव्याने बांधलेल्या मर्यादित उंचीच्या सबवे (डकड) च्या बांधकामानंतर ३१ जुलै २०२५ रोजी सकाळी ०६:०० वाजल्यापासून सर्व प्रकारच्या रस्ते वाहतुकीसाठी कायमचे बंद करण्यात येत आहे. हे समपार फाटक गंगाझरी-जुनवणी रोडवर आहे.

हे फाटक बंद झाल्यानंतर, रस्त्याची वाहतूक नव्याने बांधलेल्या मर्यादित उंचीच्या सबवेमधून वळवली जाईल, जेणेकरून वाहतूक पूर्वीसारखी सुरळीत आणि सुरक्षित राहील. दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभाग प्रवाशांना आणि सर्वसामान्यांना गैरसोय टाळण्यासाठी आणि रेल्वे प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी नियुक्त केलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करण्याची विनंती करतो.

### नौशाद ते अजय अतुल' संगीत प्रवास २ ऑगस्ट रोजी

**मैत्री दिनानिमित्त सप्तक व राम गणेश गडकरी स्मृती प्रतिष्ठानचे आयोजन**

**नागपूर, ३० जुलै :** सप्तक व राम गणेश गडकरी स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मैत्री दिनानिमित्त 'नौशाद ते अजय-अतुल' या चित्रपट संगीत प्रवासावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, २ ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे. धरमपेठ येथील व्ही. आय. पी. रोडवरील वनामती हॉल, वसंतराव नाईक स्मृती सभागृह येथे संध्याकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होईल. मुंबई स्थित ज्येष्ठ गायिका आणि सुगम संगीताच्या अभ्यासक मृदुला दाढे-जोशी यांनी अभिनव कार्यक्रमाची संहिता लिहिली असून त्याच हा कार्यक्रम सादर करणार आहेत. समाजाचा आरसा असलेल्या चित्रपटातील गाणी आणि संगीतकारांनी त्याला दिलेले संगीत कसे बदलत गेले, त्यात त्यांनी कसे प्रयोग केले इत्यादीची अतिशय रोचक माहिती व्याख्यान रुपात तसेच, गाणी तानपु-याच्यासंगतीने सादर करणार आहे. या अभिनव कार्यक्रमाचा आस्वाद घेण्याकरिता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सप्तक, नागपूर आणि राम गणेश गडकरी स्मृती प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे.

## सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ५२ प्रकरणांची नोंद उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. (ता.३०) बुधवार रोजी शोध पथकाने ५२ प्रकरणांची नोंद करून २९,३००/-रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/-दंड) या अंतर्गत १८ प्रकरणांची नोंद करून ७,२००/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. १००/-दंड) या अंतर्गत ०५ प्रकरणांची नोंद करून ५००/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/-दंड) या अंतर्गत ३ प्रकरणांची नोंद करून रू. १,२००/-चे दंड वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे,



लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत ०२ प्रकरणांची नोंद करून ४,०००/-रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ९ प्रकरणांची नोंद करून ५,०००/-रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास २७ प्रकरणांची नोंद करून ५,४००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ६ प्रकरणांची नोंद करून रु. ६,०००/- चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. श्री सुपर बाजार यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००/-चे दंड वसूल करण्यात आले. धरमपेठ झोन अंतर्गत मे. एम.आर.व्ही. कंस्ट्रक्शन यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. १०,०००/-चे दंड वसूल करण्यात आले.

धंतोली झोन अंतर्गत मे. आयुष आशियाना यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. १०,०००/-चे दंड वसूल करण्यात आले. गांधीबाग झोन अंतर्गत मे. अरविंद किराणा स्टोअर्स यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००/-चे दंड वसूल करण्यात आले. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. परी स्विट्स यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००/-चे दंड वसूल करण्यात आले. आसीनगर झोन अंतर्गत मे. महालक्ष्मी सेल्स यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००/-चे दंड वसूल करण्यात आले. उपद्रव शोध पथकाने ०६ प्रकरणांची नोंद करून रू. ४०,०००/-दंड वसूल केला.

# यादव बंधूंसह ४ पोलिस सेवेतून बडतर्फ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** बदनामीची भीती दाखवून पीडितांना लुटणाऱ्या यादव बंधूसह चौघांना पोलिस सेवेतून बडतर्फ करण्यात आले, तर मुख्यालयात तैनात एका कॉन्स्टेबलला निलंबित करण्यात आले. विभागीय चौकशीत दोषी आढळल्यानंतर पोलिस आयुक्तांच्या आदेशावरून ही कारवाई करण्यात आली. या कारवाईने पोलिस खात्यात प्रचंड खळबळ उडाली आहे. बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या पोलिसांमध्ये धडकी भरली आहे. पंकज कैलास यादव (३५), संदीप सागर यादव (३८), सुभाष सार्वे (४६) आणि उमेश आंबेकर (३९) अशी बडतर्फ झालेल्यांची नावे आहेत. तर प्रशांत बांगर (२६) असे निलंबित करण्यात आलेल्या पोलिसाचे नाव आहे. पंकज हा २००९ मध्ये तर संदीप २०१० ला पोलिस दलात कॉन्स्टेबल या पदावर रूजू झाला. घटनेच्या वेळी दोघेही कळमना ठाण्यात तैनात होते. पंकज २०२१ ला तर संदीप २०२० मध्ये कळमना ठाण्यात रूजू झाला. त्यांना २१ एप्रिल २०२४ रोजी निलंबित करण्यात आले. नंतर ते ३१ जानेवारी २०२५ पासून मुख्यालयात रूजू झाले. सुभाष हा २००८ ला तर आंबेकर २०१० ला पोलिस दलात रूजू झाला. सुभाष हा एमआयडीसी तर उमेश आंबेकर हा सक्करदरा वाहतूक शाखेत तैनात होता. क्रिकेट बुकीसोबत हात मिळवणी केल्याच्या आरोपावरून दोघांनाही ८ नोव्हेंबर २०२३ ला निलंबित करण्यात आले. नंतर ५ सप्टेंबर २०२४ ला त्यांना पोलिस मुख्यालयात रुजू करण्यात आले. सध्या ते पोलिस मुख्यालयात कार्यरत होते. त्यांची विभागीय चौकशी सुरू होती. विभागीय चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर चौघांनाही सेवेतून बडतर्फ करण्यात आले. प्रशांत बांगर हा मुख्यालयात तैनात होता. त्याने वरिष्ठांच्या आदेशाची अव्हेलना केली. या कारणावरून त्याला निलंबित करण्यात आले आहे.

पंकज आणि संदीपकडे बीट मार्शलची जबाबदारी होती. ते कळमना ठाण्याच्या हद्दीत पॅट्रोलिंग न करता वाठोडा ठाण्याच्या हद्दीत रिंगरोडवर जाऊन लोकांना खोट्या प्रकरणात अडकविण्याची भीती दाखवून लुटत होते. दोघांचीही कारकीर्द सुरूवातीपासूनच वादग्रस्त होती. अनेकदा त्यांनी अशाच प्रकारे अनेकांना धमकावले होते. फिरायला गेलेल्या युगुलास त्यांनी लुटले होते.

त्या प्रकरणी वाठोडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. नंतर फिर्यादीने प्रकरण मागे घेतले. मात्र, विभागीय चौकशी सुरूच होती. विभागीय चौकशीचा अहवाल पोलिस आयुक्तांकडे पाठविण्यात आला. फिर्यादीने तक्रार मागे घेतली असली तरी हा गंभीर प्रकार असल्याने त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले.

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची जम्बो कार्यकारिणी जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई , दि. ३०:** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसने मंगळवारी रात्री उशिरा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची जम्बो कार्यकारिणी जाहीर केली. या एकूण ३८७ जणांच्या कार्यकारणीत पक्षाने नव्या-जुन्या आणि तरुण चेहऱ्यांना संधी देत समन्वय साधला आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारिणीत ३६ जणांची राजकीय व्यवहार समिती गठीत केली आहे. पक्षाचे प्रभारी रमेश चेन्नीथला हे या समितीचे अध्यक्ष आहेत. खजिनदरपदी अभय छाजेड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून कार्यकारिणीत १६ जणांना संधी देण्यात आली आहे. कार्यकारिणीवर प्रदेश उपाध्यक्ष म्हणून ३८ जणांना नेमण्यात आले आहे. पक्षाच्या प्रदेश प्रवक्तेपदाची जबाबदारी अनंत गाडगीळ, अतुल लोंढे, माजी आमदार धीरज देशमुख, गोपाळ तिवारी आणि सचिन सावंत यांच्यावर सोपवण्यात आली आहे. प्रदेश सरचिटणीस या पदावर १०८ जणांची वर्णी लावण्यात आली आहे. तसेच पक्षाने तब्बल ९५ सचिव नेमले आहेत. माध्यम समन्वयक म्हणून श्रीनिवास बिक्कड यांची नियुक्ती झाली आहे.

## जातीनिहाय जनगणनेसाठी मंडल जनगणना यात्रा

**ओबीसी युवा अधिकारी मंचदवारा लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची मागणी**




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** ओबीसी संघटनेकडून वारंवार करण्यात आलेल्या मागण्या व आंदोलनानंतर २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तोंडावर सरकारने जातिनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे.यामध्ये सरकारने अनुसूचित जाती आणि जमातीप्रमाणे ओबीसीला स्वतंत्र कॉलम देऊन जातगणना करण्यात यावी व लोकसंख्येच्या तुलनेत निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी ओबीसी युवा अधिकार मंचाने पत्रकार परिषदेत केली. ७ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण भारतात मंडल दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाच्या औचित्याने जातीनिहाय जनगणनेविषयी जागृती, ओबीसींचे विविध प्रश्न, भटके विमुक्त,विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी,युवा शेतकरी यांचे जनजागरण करण्याच्या उद्देशाने २ ऑगस्टपासून मंडल जनजागरण यात्रा संविधान चौकातून काढण्यात येणार आहे. यावेळी पत्र परिषदेत उमेश कोराम, खेमेंद्र कटारे, कैलास भेलावे, गोपाल सेलोकर, प्रेम साठवणे इत्यादी उपस्थित होते.

महासागर
●गुरुवार,दि.३१ जुलै २०२५
अकोला
पान 3

# गावंडगाव आश्रम शाळेची विद्यार्थिनी कु. साक्षी चव्हाण हिला मिळाली 'इस्त्रो' भेटीची संधी



**अकोला :** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या खाजगी विजाभज प्रवर्गाच्या उच्च माध्यमिक निवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना इस्त्रो (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) या संस्थेस भेट देण्यासाठी अमरावती विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी चाचणी परीक्षा दि.२७.७.२०२५, रविवारला घेण्यात आली. अकोला जिल्ह्यात परंडा तालुका बार्शीटाकळी येथे घेण्यात आलेल्या चाचणी परीक्षेत स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक संस्था झरंडी द्वारा संचालित, बाबासाहेब नाईक उच्च माध्यमिक आश्रम शाळा गावंडगाव ची विद्यार्थिनी कु. साक्षी सुरेश चव्हाण १२ वी विज्ञान हीची चाचणी परीक्षेत गुणवत्ता यादीत आल्याने इस्त्रो भेटीसाठी निवड झाली आहे. शिक्षण संस्थेचे सचिव मा रामसिंगजी जाधव साहेब व प्राचार्य सुरेश चव्हाण सर, मुख्या. रमेश चव्हाण सर व सर्व शिक्षक यांनी कु. साक्षी चव्हाण हीचे अभिनंदन करुन इस्त्रो या संस्थेस भेटीसाठी शुभेच्छा दिल्या. कु. साक्षी चव्हाण चे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# लिंगनिदान प्रतिबंधासाठी 'ट्रॅकिंग सिस्टीम' राबवावी : जिल्हाधिकारी अजित कुंभार

## जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत आरोग्य विभागाच्या विविध बैठका



**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
सीआरएस अहवालानुसार अकोला जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर प्रमाणात सुधारणा होऊन एक हजार पुरूषांमागे ९४० महिला इतके प्रमाण झाले आहे. या कार्यात अधिक सुधारणांसाठी सोनोग्राफी सेंटरच्या अचानक तपासण्या, धाडी यांची संख्या वाढवावी, तसेच 'ट्रॅकिंग सिस्टीम' राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.

पीसीपीएनडीटी जिल्हा टास्क फोर्स, जिल्हा एड्स नियंत्रण समिती, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण बैठक, राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम आदी विविध बैठका जिल्हाधिका–यांच्या अध्यक्षतेत जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीच्या तिस–या मजल्यावरील सभागृहात झाल्या, त्यावेळी ते बोलत होते. जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, डॉ. आशा मिरगे, मोहन खडसे, डॉ. सीमा तायडे, प्रतिभा अवचार, समितीच्या विधी समुपदेशक ॲड. शुभांगी ठाकरे आदी यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, लिंगनिदान प्रतिबंधासाठी तपासण्यांबरोबरच ट्रॅकिंग करणेही गरजेचे आहे. त्यासाठी आशा सेविकांची भूमिका महत्वपूर्ण आहे. याबाबत जाणीवजागृती होणे आवश्यक आहे. गरोदर मातांविषयीचा डेटा, आवश्यक ट्रॅकिंग ही जबाबदारी, तपासण्या व मागोवा ही जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी. सोनोग्राफी केंद्रांना अचानक भेटी, धाडी यांची संख्या वाढवावी. प्रारंभी ॲड. ठाकरे यांनी सोनोग्राफी केंद्रांच्या मान्यता, नूतनीकरण, यंत्रणा हस्तांतरण आदींबाबतचे अर्ज, नियम यांची माहिती सादर केली.

### तंबाखूमुक्त शाळांसाठी मोहिम राबवा : जिल्हाधिकारी

प्रत्येक शाळेचा परिसर तंबाखूमुक्त होण्यासाठी मोहिम राबविण्याचे निर्देश जिल्हाधिका–यांनी जिल्हा समितीच्या बैठकीत दिले. ते म्हणाले की, पोलीस व विविध विभागांचे सहकार्य घेऊन शाळा–शाळांचे सर्वेक्षण करावे. जागृतीसाठी मेळावे घ्यावेत. आवश्यक तिथे कारवाई करावी.

सर्व तालुक्यात तंबाखू नियंत्रण समित्यांची स्थापना करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रमात तंबाखूजन्य पदार्थ सेवन करणा–या किंवा जोखमीतील व्यक्तींच्या तपासण्या होतात. त्यात जून महिन्यातील २६५ तपासण्यांत २२ व्यक्तींना कर्करोगपूर्व स्थितीचे निदान झाले. त्यांना उपचार, मार्गदर्शन मिळवून देण्यात आले.

जिल्हा एड्स नियंत्रण कार्यक्रमात २०२४–२०२५ या वर्षात ९५ हजार ३५२ तपासण्या झाल्या.त्यात २१८ एचआयव्हीबाधित आढळून आले. जोखमीच्या व अतिजोखमीच्या क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवावी व व्यापक तपासण्या कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिका–यांनी दिले.

## मानव तस्करी विरोधी दिनानिमित्त
# मुलांचे संरक्षण करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम



**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
मानव तस्करी विरोधी दिनानिमित्त,जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, रेल्वे विभाग आणिॲसेस टू जस्टीस प्रकल्प खडथड, अकोला ने रेल्वे स्थानक अकोला येथे आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात अकोला मधील बाल संरक्षण आणि बाल हक्क क्षेत्रातील सर्व प्रमुख भागधारकांना एकत्र आणले. जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, बाल कल्याण समिती , जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बालकल्याण जिल्हा परिषद, रेल्वे विभाग, रेल्वे सुरक्षा बल, रेल्वे पोलीस स्टेशन,

### पथनाट्य च्या माध्यमातून जनजागृती

जिल्हा बाल संरक्षण कक्ष , चाईल्ड लाईन सिटी व रेल्वे आणिॲसेस टू जस्टीस प्रकल्प ISWS, अकोला येथील प्रतिनिधींनी या कार्यक्रमात भाग घेतला आणि सर्व एजन्सी आणि विभागांनी एकत्रितपणे बाल तस्करीचा सामना करण्यासाठी कारवाई करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे एकमताने मान्य केले.

## शेतीला दिवसा वीजपुरवठ्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजना
# पुढील तिमाहीत उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रयत्न व्हावेत : 'महावितरण'चे अध्यक्ष लोकेश चंद्र

**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याचे स्वप्न पूर्ण होत आहे. अकोला जिल्ह्यात ६३ प्रकल्पांद्वारे २०५ मेगावॅट वीजनिर्मिती होणार असून, येत्या तिमाहीत हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रयत्न व्हावेत. लोकसंवाद व पाठपुराव्यातून कामाला गती द्यावी, असे निर्देश 'महावितरण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी आज येथे दिले.नियोजनभवनात आयोजित मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनीच्या जिल्हास्तरीय टास्क फोर्सच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी अजित कुंभार, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, 'महावितरण'चे संचालक सचिन तालेवार, सौर सल्लागार श्रीकांत जलतारे आदी यावेळी उपस्थित होते.श्री. लोकेश चंद्र म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने सुरू झालेली 'मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०' अन्य राज्यांसाठी मार्गदर्शक ठरली आहे. जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे पुढील एक वर्षात




१६ हजार मेगावॅट वीज शेतीला दिवसा पुरवठ्यासाठी मिळणार आहे. अकोला जिल्ह्यात ६३ उपकेंद्राच्या क्षेत्रात २०५ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प निर्माण होणार आहेत.

### जिल्ह्यात १२ प्रकल्प कार्यान्वित

सध्या जिल्ह्यात १२ ठिकाणी ५५ मेगावॅट सौर प्रकल्पांची कामे पूर्ण झाली आहेत. त्याद्वारे १९ हजार शेतक–यांना दिवसा वीजेचा लाभ मिळत आहे. उद्दिष्टानुसार उर्वरित काम पूर्णत्वास जाण्यासाठी टास्क फोर्सने पुढाकार घ्यावा. त्यासाठी लोकसंवाद व प्रबोधन करावे. सौर प्रकल्पांसाठी आवश्यक शासकीय व खाजगी जमीन उपलब्ध करून घेणे, भूसंपादन व सौर प्रकल्पांसाठी आवश्यक पायाभूत सेवेत सुधारणा आदी कामांना गती द्यावी, स्वातंत्र्यदिनी ग्रामसभेत याबाबत जागृती करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.
प्रकल्पांसाठी शासकीय जागा मिळवून देण्यात अकोला जिल्हा आघाडीवर आहे. शासकीय इमारतींवरील सौर–विद्युतीकरणातही गती देण्यात आली आहे. जिल्ह्यात ८५० इमारतींवर सोलरायझेशनसाठी प्रयत्न होत आहेत. त्याचप्रमाणे, मॉडेल म्हणून २८ गावांना सौर–ग्राम करण्याचाही प्रयत्न आहे.

## थोडक्यात

### शहरातील गुंड प्रवृत्तीचे सराईत आरोपीला केले हद्दपार




**अकोला :**अकोला शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये तसेच विवीध प्रकारचे वारंवार गुन्हे करणा–या ईसमांवर कायदयाचे धाक रहावे याकरीता पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक, अपर पोलीस अधिक्षक श्री. बी चंद्रकांत रेड्डी साहेब यांचे मार्गदर्शनामध्ये प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणुन पो.स्टे. सिटी कोतवाली व पो.स्टे. अकोट फाईल. हद्दीतील १) गुलाम अली औलाद हुसेन वय ३५ वर्ष रा. ईराणी झोपडपट्टी, अकोला, २) अंबादास उर्फ सोनु रोहीदास थोरात वय २५ वर्ष रा. अण्णाभाउ साठे नगर, अकोट फाईल, अकोला या आरोपी विरुध्द दाखल गुन्हयांचे स्वरूप पाहता त्यांचे विरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ अन्वये अकोला जिल्हयातुन हद्दपार करण्या बाबत प्रस्ताव तयार करून उपविभागीय दंडाधिकारी, अकोला यांचे कडे सादर करण्यात आला होता.त्यानुसार उपविभागीय दंडाधिकारी, अकोला यांचे आदेशान्वये उपरोक्त वर नमुद ०२ गुन्हेगारी प्रवृत्तीच्या ईसमांना अकोला व बाळापुर तालुक्यातुन सहा महिण्याकरीता हयार करण्यात आले आहे.मा. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक साहेब यांनी अकोला आगामी सण–उत्सव काळात जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहुन शांतता रहावी या करीता अश्या प्रकारचे गुन्हे करणारे व कारवाईस न जुमानणा–या सराईत गुन्हेगारी प्रवृत्तीचे ईसमांची माहिती संकलीत करण्याचे आदेश दिले असुन त्यांचे विरूध्द वरील प्रमाणे प्रभावी प्रतिबंधक कारवाई करणे सुरू आहे.

### अल्पशा आजाराने तरुणाचा मृत्यू!

**वाडेगांव :** येथील अशोक नगरातील रहिवासी निलेश प्रकाश वानखडे वय ३३ वर्षे अल्पशा आजाराने दगावला. घरची परिस्थिती बेताची असून त्याचे अचानक जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे. एक निर्व्यसनी तरुण घर प्रपंच चालवत असतांना सामाजिक कार्यात धावून यायचा. कुणाच्या ही सुख दुःखात सहभागी होत होता. त्याचे पश्चात आई वडील, पत्नी, एक छोटी मुलगी आणि मोठा आप्त परिवार आहे. वाडेगाव पत्रकार संघाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

# शिक्षकाकरिता क्षयरोग विषयी संवेदीकरण कार्यशाळा संपन्न

**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम शहर क्षयरोग कार्यालय अकोला महानगरपालिकेच्या वतीने टीबी मुक्त भारत अभियान दि. १ जुलै ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत मनपा कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने भारत स्काऊड गाईड जिल्हा कार्यालय येथे जिल्हातील सर्व उपस्थित शिक्षणाकरीता क्षयरोग विषयी संवेदीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रमुख मार्गदर्शन दिपक पाटील वरीष्ट क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक क्षयरोग विभाग यांनी टीबी मुक्त भारत अभियानाबाबत सविस्तर माहिती दिली. व प्रत्येक शाळेमध्ये शिक्षकांनी या अभियानाची माहिती विद्यार्थीना द्यावी व संशयीत क्षयरुग्णाची मोफत एक्सरे




तपासणी व नॅट तपासणी करावी जेणे करुन जास्तीत जास्त क्षयरुग्णांना शोधून त्यांना उपचाराखाली आणता येईल व टीबी मुक्त करण्याच्या दुष्टीने वाटचाल करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. तर क्षयरुग्णांना मिळणा–या सुविधा जसे एक्सरे, नॅट तपासणी, एचआयव्ही, डायबेटीक तपासणी, औषधी तसेच १०००/– रुपये निक्षय पोषण आहार योजनेअंर्तगत डीबीटी स्वरुपात त्यांना त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.तसेच उमेश पद्मने जिल्हा पिपिएम समन्वयक यांनी प्रधानमंत्री टीबी मुक्त अभियाना बाबत माहिती दिली. भारत सरकारच्या निश्चित केलेल्या लक्षणानुसार वैयकतीक संस्था, मंडळे, ट्रस्ट, शासकीय विभाग, खाजगी मंडळ, खाजगी कंपनी, सामाजिक कार्यकर्तेसुध्दा यामध्ये सामील होईल व नोंदणी करुन किमान ६ महिने जास्तीत जास्त ६ वर्ष निक्षयमित्र नोंदणी करुन क्षयरुग्ण दत्तक घेवू शकतात.त्यांना कोरडी धान्यांची किट्स उपचारादरम्यान देण्यात येईल, तरी जास्तीत जास्त शिक्षकांनी यामध्ये सहकार्य करावयाचे आवाहन यावेळी उमेश पद्मने यांनी केले. कार्यक्रमाचे किरणकुमार लहाने जिल्हा सघंटन यांनी अभियानाला सर्वांनी सहकार्य करण्यात सांगितले यावेळी अरविंद मिश्रा, स्काऊड मास्टर, जावेद खान उपस्थित होते.

## हिपॅटायटिस दिवसानिमित्त स्त्री रूग्णालयात कार्यक्रम

**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
जिल्हा स्त्री रुग्णालयात हिपॅटायटिस दिवसानिमित्त सोमवारी कार्यक्रम झाला.अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वंदना पटोकार, वरिष्ठ तज्ज्ञ डॉ. अस्लम , डॉ. उमेश अग्रवाल, डॉ. वाडेकर, डॉ.अबिद उपस्थित होते.जागतिक हिपॅटायटिस दिन २०२५ ची थीम ' लेट्स ब्रेक इट डाउन' अशी निश्चित करण्यात आली आहे, हिपॅटायटिस निर्मूलन आणि यकृताच्या कर्करोगाला प्रतिबंध करतानाच उपचारातील आर्थिक, सामाजिक अडथळे दूर करण्यासाठी योगदान देऊया, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ मेघना बगडिया यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संपूर्ण एमसीएच टीम, नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थिनी यांनी मोलाची कामगिरी बजावली.

## अकोल्याच्या सुपुत्राला अयोध्येत वीरमरण.... कुरणखेड गावावर शोककळा



**अकोला :** शौर्य, त्याग आणि देशभक्ती यांची परंपरा जपणाऱ्या कुरणखेड गावावर पुन्हा एकदा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावचा सुपुत्र, फाईव्ह मराठा बटालियनमध्ये सेवा देणारे जवान नितेश मधुकर घाटे (वय ३५) अयोध्या येथे आपल्या कर्तव्यावर असताना वीरगतीला प्राप्त झाले आहेत. त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच संपूर्ण कुरणखेड आणि परिसरात शोककळा पसरली असून, गावातील प्रत्येक व्यक्ती हळहळत आहे.कुरणखेड गावाचे सुपुत्र नितेश घाटे गेल्या पंधरा वर्षांपासून भारतीय सैन्यात कार्यरत होते. पुलगाव अंतर्गत येणाऱ्या अकोला जिल्ह्यातील या शेतकरी कुटुंबातील नितेश यांनी फाईव्ह मराठा बटालियनमध्ये आपली शौर्यगाथा लिहिली होती. सध्या अयोध्या येथे त्यांची ड्युटी सुरू होती. मात्र दिनांक २८ जुलै रोजी अचानक शॉक लागल्याने त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या वीरमरणाची खबर गावात पोहोचताच काळजाला चटका लावणारा शोक पसरला.नितेश यांचे वडील मधुकर घाटे हे शेतकरी असून त्यांनी आपल्या तीन मुलांना शिकवले. त्यांच्या थोरल्या मुलानेही भारतीय लष्करात सेवा केली होती, मात्र सेवा संपल्यानंतर तो अपघातात मरण पावला होता.

आता लहान मुलगा नितेश घाटे यांच्याही वीरगतीमुळे घाटे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या कुटुंबाने देशासाठी दोन सुपुत्र गमावले आहेत, ही बाब प्रत्येकाच्या काळजात खोलवर घाव घालणारी आहे.

# आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धांचे उद्घाटन

**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
कृषी महाविद्यालय, अकोला येथे तीन दिवसीय आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धांचे उद्घाटन आज उत्साहात पार पडले. या स्पर्धेचे उद्घाटक म्हणून डॉ. डी. एम. पंचभाई (अधिष्ठाता, कृषी पं. दे. कृ. वि. अकोला) उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी डॉ. संजय भोयर (सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, अकोला) यांनी स्थान भूषवले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अरविंद सोनकांबळे (अधिष्ठाता, उद्यानविद्या), डॉ. ययाती तायडे (सहयोगी अधिष्ठाता – पी. जी. आय.), डॉ. शेषराव चव्हाण (सहयोगी अधिष्ठाता), डॉ. शैलेश हरणे (सहयोगी अधिष्ठाता, वनविद्या महाविद्यालय), डॉ. संदीप हाडोळे (विद्यार्थी कल्याण अधिकारी) आणि डॉ. जे.पी. देशमुख (शास्त्रज्ञ, कृषी विद्या) आदी मान्यवर उपस्थित होते.या बुद्धिबळ स्पर्धेत एकूण २६ कृषी महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला असून, त्यामध्ये मुलींच्या गटातून १३ आणि मुलांच्या गटातून २६ संघ सहभागी झाले




आहेत. ही स्पर्धा पुढील तीन दिवस चालणार आहे.उद्घाटनपर भाषणात डॉ. डी. एम. पंचभाई यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.देत, त्यांना खिलाडूवृत्तीने खेळण्याचे आवाहन केले.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## ई-निविदा सूचना- ३१/२०२५-२६

१. **उ वि ई.नि २१५ कोड. ३००००६०४९५ :-** औ. वि. के. पारस २५० मे. वॅ. संचाचे सतत २४ तास शिफ्ट ड्यूटीमध्ये सी ॲन्ड आय सिस्टिमचे मेन्टेनस् करिता द्विवार्षिक कंत्राट. (**Esti.** रू.:- ५२.२४ लाख, **EMD** रू.:- ५५७४७ /-)
२. **मु.भा ई.नि २१६ कोड ३००००६०५१५ :-** औ.वि.के. पारस येथे मुख्य भांडार स्टाफ यांच्या दैनंदिन कामाकरिता असिस्टन्ट पुरविण्याचा द्विवार्षिक कामाचा कंत्राट. (**Esti.** रू.:- २८.८१ लाख, **EMD** रू.:- ३२३१४/-)
३. **रा हा वि ई. नि २१७ कोड. ३००००६०४५९ :-** औ.वि.के. पारस येथील राख हाताळणी विभागाचा आऊटडोअर वर्कशॉप मध्ये प्रती तास तत्वावर मशिनवरील विविध काम करण्याचा कंत्राट. (**Esti.** रू.:- ८.५६ लाख, **EMD** रू.:- १२०६८/-)
४. **Safety ई.नि २१८ कोड ३००००६०४८७ :-** औ.वि.के. पारस येथे सुरक्षित / मानक कार्यप्रणाली आणि सुरक्षा नियमावली तयार करण्याचा कंत्राट. (**Esti.** रू.:- ३.१० लाख, **EMD** रू.:- ६६००/-)
५. **Safety ई.नि २१९ कोड. ३००००६०४२२ :-** औ.वि.के. पारस २५० मे वॅ येथे प्रदीपन आणि वायुविजन सर्वेक्षणाच्या कामाचा कंत्राट. (**Esti.**रू.:- ९.६० लाख, **EMD**रू.:- १३१००/-)
६. **रा हा वि ई. नि २२० कोड ३००००६०५४१ :-** औ.वि.के. पारस राखड हाताळणी विभाग येथे ट्रान्सपोर्ट एअर कंप्रेसर (मॉडेल नं. टिबी-टिडी क्युएल बेल्ट ड्रईव्हन) करिता सुटे भाग पुरविणे. (**Esti.**रू.:- ३१.२८ लाख, **EMD**रू.:- ३४७८९/-)
७. **बा सं ई.नि २२१ / कोड ३००००६०४१९ :-** औ.वि.के. पारस २५० मे वॅ संचाचे ओव्हरहॉल देखभाली मध्ये एच पी गेट / ग्लोब व्हॉल्वच्या सर्व्हिसिंगच्या कामाचा कंत्राट- (**Esti.** रू.:- २.५५ लाख, **EMD** रू.:- ६०५९/-)
८. **बा सं ई.नि २२२ कोड. ३००००६०५४४ :-** औ.वि.के. पारस २५० मे वॅ संच ४ COH दरम्यान दुरूस्तीच्या कामाच्या देखरेखीसाठी आणि अंमलबजावणीसाठी एक्सपर्ट सर्व्हिसेस नियुक्त करण्याचा कंत्राट. (**Esti.** रू.:- २.८८ लाख, **EMD** रू.:- ६३९०/-)
९. **बा सं ई.नि २२३ कोड ३००००६०५४३ :-** औ.वि. के. पारस २५० मे वॅ संचाचे ओव्हरहॉल देखभाली मध्ये बॉयलर कडील क्रिटीकल हाय प्रेशर गेट I ग्लोब व्हॉल्वस, कन्ट्रोल व्हॉल्वस् आणि सेफ्टी व्हॉल्वस् चे सर्व्हिसिंग कामाचा कंत्राट- (**Esti.** रू.:- १५.०७ लाख, **EMD** रू.:- १८५७८/-)
१०. **बा सं ई.नि २२४ / कोड ३००००६०५४५:-** औ.वि.के. पारस २५० मे वॅ संच ४ COH दरम्यान बॉयलर मध्ये एअर प्रिहिटर ४ए च्या प्रायमरी आणि सेकंडरी एअर आउटलेट डक्टच्या मेटॅलिक एक्सपेंशन जॉइंटचा पुरवठा आणि स्थापनेचा कंत्राट (**Esti.** रू.:- ९.४६ लाख, **EMD** रू.:- १२९६६/-)
११. **वि सं वि ई. नि २२५ कोड ३००००६०५४२ :-** औ.वि.के. पारस येथे एच बी एल चे सुटे भाग मेक २२०V आणि २४V DC बॅटरी चार्जर चा पुरवठा करणे. (**Esti.** रू.:- ४.९२ लाख, **EMD** रू.:- ८४२३/-)

**१) ई निविदा अ.क्र. १ ते ५ विक्रिचा कालावधी दि. ३१.०७.२०२५ ते २०.०८.२०२५ सादर करण्याची दि २१.०८.२०२५ वेळ १६.00 वा.**

**२) ई निविदा अ.क्र. ६ विक्रिचा कालावधी दि. ३१.०७.२०२५ ते १४.०८.२०२५ सादर करण्याची दि १५.०८.२०२५ वेळ १६.00 वा.**

**३) ई निविदा अ.क्र. ७ ते ९ विक्रिचा कालावधी दि. ३१.०७.२०२५ ते ०९.०८.२०२५ सादर करण्याची दि १०.०८.२०२५ वेळ १६.00 वा.**

**४) ई निविदा अ.क. १० ते ११ विकिचा कालावधी दि. ३१.०७.२०२५ ते ०४.०८.२०२५ सादर करण्याची दि ०५.०८.२०२५ वेळ १६.00 वा.**

टीप. सविस्तर माहिती करीता कृपया आमची वेबसाईट पहावी **https://eprocurement.mahagenco.in**

**मुख्य अभियंता औ.वि. केंद्र, पारस**

# भविष्याचा वेध घेऊन अनेकांच्या जीवनाला परीसस्पर्श देणारा कर्मयोगी

## स्व. वा. मो. उपाख्य दादासाहेब काळमेघ

वऱ्हाड अन सोन्याची कऱ्हाड असं म्हंटलं जाणाऱ्या वऱ्हाडात कर्मयोगित्व पत्करलेले अनेक पुण्यपुरुष उदयास आलेत, कुटुंबवत्सलता, भगवद्भक्ती, माणूसपण जपणारी आणि जोपासणारी ही वैदर्भीय माणसे याच आगळ्या वेगळ्या वऱ्हाडात जन्माला आलीत. याच विदर्भाच्या कुशीत पिता मोतीरामजी आणि माता मंजुळेच्या पोटी ८ नोव्हेंबर १९३२ कार्तिक एकादशीच्या दिवशी एक बाळ जन्माला आलं, त्या बाळाचं नाव वासुदेव ठेवलं गेलं. पंढरीचा सावळाराजा, वासुदेवाच्या वडिलांचा भारीच प्रिय. वासुदेव सारखीच इतर भावंडांची नावे देखील तशीच विठ्ठलाला आपलीशी असणारी. वासुदेव, सुखदेव, नामदेव, रामदास आणि वत्सलाबाई. वासुदेवाची चमक मात्र काही विलक्षण अशीच होती. हाच इवलासा वासुदेव म्हणजेच आपले स्व. दादासाहेब काळमेघ. पूर्वीचे दर्यापूर व आताच्या अंजनगाव तालुक्यातील चौसाळा हे गाव ही दादांची जन्मभूमी.

---------------

जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरीयसी... या अर्थाने आपल्या जन्म भूमीचे आणि जननीचे पांग फेडणे ही प्रत्येकाच्याच आवाक्यातील बाब नव्हे; परंतु हे या असामान्य व्यक्तित्व असलेल्या या अनासक्त कर्मयोग्यानी आपल्या आचरणाने, कृतीने, आणि कर्तुत्वाने समाजाला विधायकतेचे वळण दिले.

वासुदेव स्वतःच्या घरातील घरकामे करून,कधी शाळा झाडून, नियमित शाळेत जाणारा एक शिस्तप्रिय टोपीवाला शाळकरी मुलगा बनून तर कधी कठीण वेळ आलीच तर तिचा निभाव कसा लावावा हे अवगत असणारा लहानगा वासुदेव भातक्याचं दुकान लावून परिस्थितीवर मात करीत असे.

अठराविश्वे दारिद्रय दाखविणारी गरिबी असली तरी तिला हतबल न होता स्वकर्तुत्वाने पुढे जाणाऱ्या या वासुदेवावर वडिलांच्या वारकरी संस्कारांचा, संतांचा आणि विठुरायाचे पारमार्थिक संस्कार नकळतच बिंबवले गेले. म्हणूनच शून्यातून विश्व निर्माण करणारे हे दादासाहेबांचे व्यक्तीमत्त्व साकारल्या गेले.

पुढे याच कर्मयोगी व्यक्तीची आपल्या कुटुंबाशी असलेली आस्था हळूहळू मला समजू लागली. कविवर्य मंगेश पाडगावकरांचे एक भावगीत या अनुषंगाने आठवते,

*अशी पाखरे येती आणि*
*स्मृती ठेवुनी जाती*
*दोन दिसांची रंगत संगत*
*दोन दिसांची नाती*
*कुठे कुणाच्या घडल्या भेटी,*
*गीत एक मोहरले ओठी*
*त्या जुळल्या हृदयांची गाठ,*
*सूर अजूनही गाती...*

या ओळी ऐकल्या की सहज माझ्या मनात येते की आपण आपल्या रोजच्या जीवनात अश्या व्यक्तींच्या सहवासात येतो, ज्यामुळे आपले जीवन नकळतच सोन्याचे होऊन जाते. माझ्या जीवनात दादासाहेब काळमेघ यांचे स्थान हे म्हणजे माझ्यासारख्या लोखंडाला स्पर्श करून सोन्याचे बनवणाऱ्या परिसाचे. किंबहुना केवळ माझ्याच नव्हे तर अनेकांच्या जीवनाचे सोने करणारे अलौकिक व्यक्तीमत्त्व म्हणजे स्व. दादासाहेब काळमेघ.

मी आज जो काही आहे, जो मानमरातब मी आजवर कमावलाय त्यामागचे कारण म्हणजे स्व. दादासाहेब काळमेघ. त्यांची स्मृती आणि त्यांचे माझ्या मनातील स्थान या भावगीताने सार्थ झाल्यासारखे वाटते .

स्व. दादाच्या घराशी माझं जुळलेलं नातं शरददादा व हेमंतभाऊ हे दोघे आजही जितक्या समर्थपणे निभावतात हे बघून निश्चितच आपलं काही पूर्वजन्माचे संचित असाव हे प्रकर्षाने जाणवत राहतं. स्व. दादांशी असलेला आमच्या घराचा ऋणानुबंध ही सुद्धा एक कथाच म्हणावी असा विलक्षण आहे.

चौसाळ्याच्या काळमेघ परिवारातील अत्यंत उच्चशिक्षित तडफदार परंतु आर्थिक परिस्थिती बेताचीच असलेल्या दादासाहेबांचा विवाह, आमचे वडील स्व. रामकृष्ण पाटील गावंडे यांचे मावसभाऊ दहीगाव रेचा या गावचे गर्भश्रीमंत घराण्यातील स्व. विष्णुपंत पाटील साबळे यांची मुलगी प्रमिलाताई यांचेशी झाला. या नात्याने दादासाहेब हे आमचे जावई.

ज्या घरी प्रत्यक्ष रिद्धी सिद्धी पाणी भरतात त्या घरात जन्म घेतलेली ही राजकन्या प्रमिलाताई अन अत्यंत साधारण परिस्थिती असलेला वासुदेव, नातेवाईकांना काही केल्या पटेना, या लग्नाला नातेवाईकांचा असणारा विरोध बाजूला सारून विष्णुपंत साबळे यांनी हेरला तो वासुदेवामध्ये असलेला निश्चयी, आभाळास गवसणी घालणारा आत्मविश्वास. अखेरीस ही अनोखी गाठ बांधली गेली. जणू ऊन अन सावलीच एक झाली.



स्व. दादांच्या उन्हासम तापट, कणखर पण दृढ निश्चयी स्वभावावर आपुलकीची सावली आणि मायेचा ओलावा देण्याचे मौल्यवान कार्य स्व. प्रमिलाताई यांच्या हातून घडले. म्हणतात ना जातीचाच निश्चयी माणूस, मिळालेल्या आपुलकी आणि प्रेमाच्या आधाराने प्रगतीची अनेक शिखरे पादाक्रांत करू शकतो, त्याच्या पाठीमागे एक स्त्री असते जी नवऱ्याचे सुख-दुःख, कर्म स्वतःचे मानून त्यासाठी नकळतच लढत असते. अशीच तडफदार आमची प्रमिलाताई होती.

दादा जेंव्हा नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू झाले, त्यावेळी दादांच्या बंगल्यावर असणारा स्नेहीजनांचा गोतावळा, त्यांचे राहणे, खाणे, पिणे व इतर सगळी सोय प्रमिलाताईच बघायच्या. माहेरी कष्टाचे कोणतेही काम करण्याची गरज न पडलेली ही प्रमिला तीच प्रमिला आहे की काय? असा प्रश्न सगळ्यांना पडत असे.

गरिबीचा चटका खाऊन मोठे होत जातांनाच दादांच्या म्हणजेच लहानग्या वासुदेवाच्या मनात शिक्षणा बद्दल विशेष आवड दिसून येऊ लागली, चड्डी टोपी घालणारा वासुदेव शाळेत जाऊ लागला पहिल्या नंबरने पास होत गेला . त्याची शिक्षणाची आवड वाढू लागली. पुढे एक नवी घटना घडली.

चौसाळ्याच्या शाळेत सातवीत असलेल्या कुशाग्र बुद्धीच्या लहानग्या वासुदेवाला शाळेमध्ये पाचवी पासून इंग्रजी भाषा नव्याने आली म्हणून त्याच्या शिक्षकांनी सातवीतून पुन्हा पाचव्या वर्गात बसायला लावले. हे होताच मोतीराम अस्वस्थ झाले, घरात खाणारे आठ जीव होते, त्यांच्या विचाराने वासुदेव जर दहावी पास झाला आणि कुठे ग्रामसेवक किंवा पटवारी म्हणून लागला असता तर सर्व कुटुंबाचे भले झाले असते, पण नियतीच्या मनात काही औरच होते,

आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असणाऱ्या घरातील पण जन्मजात हुशार वासुदेवाने नव्या आलेल्या इंग्रजी भाषेत प्राविण्य पटकावून, प्रत्येकवेळी पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन त्यावेळी चौसाळ्याच्या सर्व तालेवार घरातील कर्त्या-सवर्त्यांच्या अभिमानाला नकळत ठेच पोहचवली आणि त्यामुळे होणाऱ्या त्रासाला, जाचाला कंटाळून मोतीरामजी पाटलांनी आपले संपूर्ण बिऱ्हाड आपल्या पंढरपूर वारीतील दरवर्षीचे सोबती वरुड्यातील बोंद्रे पाटील यांचे पडवीत हलवला. तेथे पडेल ती कामे करून उदरनिर्वाह करू लागले; परंतु वासुदेवाच्या शिक्षणात कुठलाही खंड नियतीने पडू दिला नाही.

**प्राचार्य केशवराव रामकृष्ण गावंडे**
**कार्यकारिणी सदस्य,**
**श्री शिवाजी शिक्षण संस्था,**
**अमरावती.**

वासुदेव ते दादासाहेब असा जो प्रवास झाला तो हे असे अनेक अडथळे पार करूनच. अशा असंख्य प्रसंगातून तावून सुलाखून निघालेल्या, प्रगतीची अनेक शिखरे पादाक्रांत करणाऱ्या दादासाहेबांना आपल्या बालपणी आपण दारिद्र्य आणि गरिबीची झळ सोसलेल्या, रुढींचा विळखा, हीनत्व व अज्ञान यामुळे भोगाव लागणार जीवन कसं वेदनादायी आणि भयावह असतं याची आठवण त्यांनी आयुष्यभर ठेवली. आपण भोगलेलं जीवन इतरांच्या वाट्याला येऊ नये अशा भावनेतून केलेलं त्यांच मानवतावादी सामजिक कार्य प्रकाशासारखं दीपवून टाकणारं आहे.

तळागाळातून आलेल्या हीन-दीनदुबळ्यांनाच नव्हे तर, दादा अशी हाक मारून मदतीची अपेक्षा करणाऱ्या तसेच गत आयुष्यात आपल्याला मदत केलेल्या प्रत्येकालाच खंबीरपणे आयुष्यात समर्थपणे उभं करण्याची तळमळ दादांमध्ये होती.

याचे मी अनुभवलेल्या अनेक प्रसंगापैकी एक उदाहरण म्हणजे स्व. दादा जेंव्हा आमदारकी साठी दर्यापुरातून उभे होते, त्यांच्या एका बुथची जबाबदारी माझ्याकडे होती. एके दिवशी आराळा येथे सभेसाठी स्व. दादांना लवकर घेऊन या असा निरोप आलेला, त्याच घाईत आम्ही गाडीमध्ये बसलो अन त्याच वेळी सभोवतीच्या गर्दीत दादांना, भिरभिरत्या नजरेने बघणारा एक चेहरा दिसला अन दादा गाडीतून उतरले.

आता दादा सभेला आणखी किती उशीर करतात हा विचार आमच्या मनात येतो न येतो तोच दादा एका वयोवृद्ध म्हातारीच्या पाया पडून तिला आपल्या कवेत घेत म्हणाले अवो माय तू इथं काय करत आहेस?

त्यावर ती आजीबाई म्हणाली बाबू वासुदेवा, तू इलेक्शनले उभा आहेस हे समजलं म्हणून तुया भेटीसाठी आली मी... दादासाहेबांनी गहिवरून खिशात हात घालून जी नोट हातात आली ती तिच्याहाती कोंबली व आम्हाला म्हणाले कि ही तीच माऊली आहे जिन्हे आम्ही वरुड्याला बोंद्रे पाटलांकडे असतांना मला म्हणजे लहानग्या वासुदेवला त्यांच्या गोठ्यात काम करतांना शेणाचे घमीले उचलण्यासाठी सतत मदत केली, मी आज जो तुमच्या समोर उभा आहे तो याच माऊल मुळे.

त्या माय माउलीला वरुड्याला स्पेशल गाडीने पोहचते करून दिले. पद प्रतिष्ठेपेक्षा मानवता जोपासून माणूसपण कसं जपलं पाहिजे हा फार मोठा उदारमतवादी दृष्टीकोन स्व, दादासाहेबांचा होता.

असे हे दादा... एक एक स्मृती उलगडत जाते आणि आपला सभोवताल सुगंधित करून जाते. दादा म्हणजे एकदम फणसासारखे प्रथमदर्शनी कणखर काटेरी पण आतून एकदम गोड गऱ्यासारखे. एखादे अपूर्ण काम त्यांना चैन पडू देत नसे याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे माझा प्राध्यापक पदापासून ते प्राचार्य पदापर्यंतचा प्रवास.

समाजाच्या निरनिराळ्या स्तरातील माणसे आपलीशी करावी अन तो आपलेपणा - ते प्रेम आयुष्यभर जपण्याचा दादांचा अट्टाहास याचा अनुभव मी स्वतः घेतला आहे. मला तेल्हाऱ्याला प्राध्यापक म्हणून रुजू करून मला पहिली नोकरी देण्यापासून ते त्याच्या कार्यकाळात अपूर्ण राहिलेले मला दर्यापूरच्या जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती देण्याचे काम स्व. वसंतराव धोत्रे साहेबांकडून करून घेऊन दिलेला शब्द पूर्ण करण्याची त्यांची विशेषता, त्यांना इतर सर्वांपासून वेगळं ठरवते.

या अशा वेगळेपणाचा आणखी एक किस्सा म्हणजे दादा नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू असतांना एकदा कार्यकारिणीच्या सभेच्या वेळी दादांना भेटण्याकरिता आलेले त्यांचे चौसाळ्याच्या शाळेतील गुरुजी. जेंव्हा दादांना दिसले तेंव्हा दादांनी त्यांना त्या विद्यापीठाच्या सभेमध्ये स्वतः बाजूच्या खुर्चीत बसवून त्यांचा आदर सत्कार केला होता.

त्यवेळी सभेला उपस्थित असणारे इतर पदाधिकारी त्याबाबत बोलायला लागताच दादा म्हणाले हा जो दादासाहेब तुमच्यासमोर उभा आहे ते केवळ या माझ्या अशा गुरुजींमुळे ज्यांनी मला शिक्षणासोबतच मानवतेचे सुद्धा धडे दिले. त्यामुळे हे आता असेच चालणार आणि याची सवयही आता तुम्हाला करून घ्यावी लागणार. हा असाच प्रसंग दादांचे गुरू श्री. संत सत्यदेव महाराजांना स्वतःच्या कुलगुरूच्या खुर्चीत बसवण्याबद्दलही घडला होता.

आपल्या नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूपदाच्या कार्यकाळात सुद्धा उपजतच असणारी समाजकार्याची ओढ दादांना स्वस्थ बसू देत नव्हती, त्या दृष्टीने त्यांचे कार्य सातत्याने चालू होते, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून श्रमदानाचे व सामाजिक बांधिलकीचे महत्त्व विद्यार्थ्यासमोर मांडून त्याचा देश विधायक कायार्साठी वापर करत यावा म्हणून ते सतत प्रयत्नशील असत.

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा वारसा चालवतांना श्री शिवाजी शिक्षण संस्थेसारखी तळागाळातल्या उपेक्षितांना सुद्धा शिक्षण मिळाले पाहिजे या हेतूने उभी राहिलेली प्रचंड मोठी संस्था हीच या विदर्भ परिसरातील गोरगरीब जानेतेचा आधारवड आहे हे जाणून दादासाहेबांनी समाजातील सर्व स्तरात शिक्षणाची गंगा पोहचली पाहिजे हा ध्यास आपल्या मनामध्ये धरला होता. त्यांच्यावर अध्यात्माचा फार मोठा प्रभाव होता आणि त्यामधूनच त्यांनी संत तुकारामांची वाट चोखाळत कीर्तन हे समाज प्रबोधनाचे माध्यम बनविले.

प्रचलित पद्धतींना न जुमानता आपल्या तत्त्वांवर जगणाऱ्या दादांना यामुळे अनेकदा विरोधाचा सामना सुद्धा करावा लागला. प्रस्थापितांच्या व्यवस्थेला, दादांच्या विरोधकांना हादरे बसू लागले होते, दादांची लोकप्रियता त्यांना अस्वस्थ करत होती. अन त्यामुळेच दादांना कुलगुरूपद सोडावे लागले, खोट्या कोर्ट केसेसचा सामना करतांना हुकुमी असणारे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे तिसऱ्यांदाचे अध्यक्षपद सोडावे लागले. पण या सर्वामुळे खचतील ते दादा नव्हते.

अशा कठीण प्रसंगी अध्यात्माची जोड त्यांना आधार देत असे. आणि मग त्याही परीस्थितीत स्व. दादांचे विज्ञान अध्यात्माची सांगड घालून समाजप्रबोधनाचे कार्य सुरू रहात असे. अनेक संताच्या रचना, त्यांचे अभंग स्व. दादांना मुखोद्गत होते. स्व. दादांची तेवढीच लेखणीवर सुद्धा हुकुमत होती. अनेक स्वरचीत अभंग, रचना त्यांनी लिहिल्या. विद्यार्थी दशेत असल्यापासून बघितलेल्या, अनुभवलेल्या गरिबीची, अज्ञानाची, दारिद्र्याची जाणीव आपल्या अंतःकरणात ठेऊन कीर्तनातून जनजागृती हा कर्मयोगी संत गाडगेबाबांचा आदर्श त्यांनी पत्करला, आणि अध्यात्मिक क्षेत्रात देखील आपले वासुदेव हे नाव सार्थ करतांना स्व. दादासाहेबांनी आपल्या आयुष्याच्या माध्यमातून सातत्याने एक संदेश दिला तो म्हणजे.....

*आम्ही बी घडलो तुम्ही बी घडाना*
*जे जे बी घडले ते देवची झाले*
*परिसाच्या संगे लोह बी घडला*
*जे जे बी घडले ते सुवर्णची झाले...*

अशा या विदर्भातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि अध्यात्म क्षेत्रातील बहुआयामी व चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाचे धनी असणाऱ्या स्व. वा. मो. उपाख्य दादासाहेब काळमेघ यांना त्यांच्या २८ व्या पुण्यस्मरणा निमित्त विनम्र अभिवादन...!

■ ■ ■

# प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस
## शिक्षणाच्या व्यापारीकरणाचा नवा उद्योग?

स्वातंत्र्योत्तर भारताने शिक्षणाच्या माध्यमातून केवळ प्रगतीचा मार्गच आखला नाही, तर सामाजिक न्याय, मूल्यनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकशाही आदर्शांचा पाया सुदृढ केला. पंडित नेहरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मौलाना आझाद, डॉ. झाकीर हुसेन, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्यासारख्या दूरदृष्टी असलेल्या नेत्यांनी शिक्षणाला राष्ट्रीय विकासाचे साधन मानले. शिक्षण ही एक सामाजिक गुंतवणूक आहे, अशी धारणा अनेक दशकांपर्यंत भारतात अस्तित्वात होती. परंतु मागील पंधरा वर्षांच्या कालखंडात या व्यवस्थेचे झपाट्याने होत चाललेले उद्योगीकरणह किंवा खाजगीकरण सर्वसामान्य नागरिकांच्या डोळ्यात खुपणारे आहे.

--------------

**शिक्षणाचा मूळ उद्देश आणि नवी दिशा**

शिक्षण म्हणजे केवळ रोजगार मिळवण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जाणिवा, सांस्कृतिक समृद्धी आणि राष्ट्रनिर्मिती हे त्याचे व्यापक उद्दिष्ट असते. परंतु राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० अमलात आल्यानंतर शिक्षण आणि उद्योग यामधील सुसंवाद या नावाखाली शिक्षण अधिकाधिक रोजगाराभिमुख करण्यात येत आहे. हे ऐकायला सकारात्मक वाटत असले, तरी त्यामागची धोरणात्मक दिशा उद्योगासाठी कुशल कामगार घडवणे एवढ्यावरच सीमित असल्याने व्यवसाय प्राध्यापक संकल्पना भविष्यात घातक ठरू शकेल.



**डॉ. प्रशांत विघे**
**सिनेट सदस्य,**
**संत गाडगे बाबा विद्यापीठ,**
**अमरावती.**
**९३२६८७७७४९**

**विद्यापीठ अनुदान आयोगाचा नवा उद्योग व्यवसाय प्राध्यापक**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020 हे उच्च शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र या व्यापक बदलांच्या पार्श्वभूमीवर, विद्यापीठ अनुदान आयोगाने सुरू केलेली 'Professor of Practice' ( व्यवसाय प्राध्यापक) ही योजना ऑगस्ट २०२२ मध्ये UGC ने जाहीर केली आणि सप्टेंबर २०२२ मध्ये अधिकृतपणे सुरू करण्यात आली.

यामागील उद्देश स्पष्ट आहे की, शिक्षण क्षेत्रात प्रत्यक्ष व्यावसायिक अनुभव असलेल्या व्यक्तींना शैक्षणिक क्षेत्राशी जोडणे हा आहे. उद्योग, प्रशासन, पत्रकारिता, विज्ञान, सामाजिक कार्य, कृषी, टेक्नॉलॉजी आदी क्षेत्रांतील तज्ज्ञांना विद्यापीठांमध्ये अध्यापनाची संधी देऊन, विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याधारित आणि रोजगारक्षमतेच्या दिशेने प्रगती घडवून आणण्याचा हेतू या योजने मागे असल्याचे जाहीर केले आहे.

या योजनेमध्ये व्यवसाय प्राध्यापक नियुक्त करताना किमान १५ वर्षांचा प्रत्यक्ष कार्यानुभव असलेल्या व्यक्तींना अगदी शैक्षणिक पात्रता नसली तरीही 'व्यवसाय प्राध्यापक' म्हणून उच्च शिक्षण संस्थांमध्ये नेमले जाऊ शकेल.

या प्रक्रियेची अधिक प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी १६ मे २०२३ रोजी युजीसीने 'Professor of Practice Portal' नावाचे ऑनलाइन व्यासपीठही सुरू केले. या पोर्टलवर इच्छुक तज्ज्ञांनी नोंदणी करून आपला अनुभव, क्षेत्र आणि उपलब्धता नमूद करायची असून, उच्च शिक्षण संस्था यावरून त्यांची निवड करू शकतात अशी तरतूद करण्यात आली आहे.

**प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस :**
**उच्च शिक्षणात शैक्षणिक पात्रतेचा अवमान?**

युजीसीने सुरु केलेल्या प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस या योजनेच्या माध्यमातून आता NET, SET किंवा Ph.D. नसतानाही संबंधित क्षेत्रातील १५ वर्षांचा व्यावसायिक अनुभव असलेल्या व्यक्तींना विद्यापीठात शिकवण्याची परवानगी दिली जात आहे.

महाष्ट्रातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात ही योजना सध्या अमलात आणली आहे. एका अर्थाने हे प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षण असेलही, पण या प्रक्रियेमुळे शैक्षणिक पात्रता मिळवण्यासाठी वर्षानुवर्षे मेहनत घेणाऱ्या NET/SET/Ph.D धारक विद्यार्थ्यांना एकप्रकारे न्याय नाकारला जात आहे.

या नवीन संकल्पनेचा अंमलबजावणीचा पवित्र हेतू कितीही चांगला असला, तरी त्या निमित्ताने जेव्हा पदव्युत्तर शिक्षणासाठी पात्रता निकष मागे सारले जातात, तेव्हा संपूर्ण शिक्षणप्रणालीच विकृतीकडे झुकते.

नियमित भरती प्रक्रिया थांबवून कंत्राटी, सत्राधारित आणि तात्पुरत्या स्वरूपाच्या शिक्षक भरतीस प्राधान्य दिले जात असल्याने अनेकदा शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, जबाबदारी आणि बौद्धिक मूल्यमापन या बाबींपासून शिक्षण दूर जाते.

**शिक्षकांची कमतरता : दुर्लक्षित वास्तव**

आज देशभरात विशेषतः उच्च शिक्षण संस्थांमध्ये सुमारे ५०-६०% शिक्षकांची पदे रिक्त आहेत. मागील १०झ१५ वर्षांपासून महाविद्यालयीन स्थायी पदांवरील भरती बंदच असल्यासारखी आहे. विशेषतः कला, वाणिज्य व सामाजिक शास्त्र शाखांमध्ये याचा मोठा परिणाम दिसतो आहे.

--------------

(लेखाचा उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

# निवडक कारवाई की राजकीय बदला?

**शालार्थ प्रकरणातून नागपूर विभागाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न?**

महाराष्ट्रातील शालार्थ आयडी घोटाळा सध्या मोठ्या प्रमाणावर गाजत असताना, नागपूर विभागावर होणारी एकतर्फी आणि आक्रमक कारवाई राज्यात राजकीय संकेतांचे नवे संदर्भ उभे करत आहे. ज्या चौकशीस शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राज्यव्यापी म्हणून संबोधले आहे, त्याच चौकशीतील कठोर पावले मात्र सध्या फक्त नागपूर विभागापुरतीच मर्यादित का, हा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच विधानसभेत स्पष्टपणे म्हटले की, नागपूर विभागाची गुन्हेगारी आकडेवारी कृत्रिमरीत्या वाढवली जाते. या वक्तव्यामुळेच एक नवा वाद उफाळला. हे विधान म्हणजे केवळ आकडेवारीच नव्हे, तर वास्तविकतेला झाकण्याचा प्रयत्न नाही का? अशी शंका नागरिकांपासून ते राजकीय निरीक्षकांपर्यंत आहे.



**अरुण सोपानराव कराळे**
**दत्तवाडी, नागपूर.**
**९०९६३२६२७२**

शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळांच्या बाबतीत प्रक्रियात्मक त्रुटी किंवा प्रशासकीय दुर्लक्ष झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. मात्र, या चुका थेट गुन्हेगारी स्वरूपात सादर करून काही शिक्षकांविरूद्ध कठोर पावले उचलली जात आहेत. ही भूमिका कायद्याचा गैरवापर करत निवडक फौजदारी प्रक्रिया राबवण्यासारखी वाटते.

प्रश्न असा आहे की, जेव्हा शालार्थ घोटाळा राज्यव्यापी असल्याचे सरकारच मान्य करते, तेव्हा नागपूरवरच असा आघात का? ही केवळ चौकशी नव्हे, तर राजकीय सूडाची रणनीती तर नाही ना?

राजकीय वर्तुळात हे देखील चर्चेत आहे की, काही प्रभावी नेते ज्यांना शिक्षकांच्या व शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याचा अभाव भासला होता, त्यांनी याच वर्गाला लक्ष्य करण्यासाठी यंत्रणा वापरण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे, नागपूर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे गृहमतदारसंघ असूनही, इथेच असा एकतर्फी दबाव वाढत असल्यामुळे सामान्य जनता संभ्रमात आहे. या सर्व प्रकारामुळे नागपूर विभागाला जाणीवपूर्वक बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची भावना शिक्षक, स्थानिक नेते आणि राजकीय विश्लेषकांमध्ये अधिक तीव्र होत आहे.

राज्य शासनाने जर हा प्रश्न केवळ प्रशासकीय चौकशीपुरता मर्यादित ठेवायचा असेल, तर मग चौकशीची प्रक्रिया पारदर्शक, समांतर व राज्यभर लागू व्हायला हवी. केवळ नागपूरवरच लक्ष केंद्रित करणे म्हणजे कायद्यांतर्गत असमतोलच नव्हे, तर या भागाच्या प्रतिमेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न आहे. म्हणूनच, शासनाने तत्काळ स्पष्ट आदेश काढून या चौकशीच्या धोरणाला सर्वदूर लागू करावे आणि नागपूरसारख्या प्रामाणिक शैक्षणिक परंपरेला राजकीय झळ पोहोचणार नाही, याची खबरदारी घ्यावी, हीच सध्याची काळाची गरज आहे. ■ ■ ■

# तुळशीमाळ बनविणारे आजोबा काशीनाथ



श्री संत ज्ञानेश्वर माऊलींचे अनन्य भक्त आणि सेवा व्रत्ती आजोबा काशिनाथ खाजाने, वय वर्षे पंच्यांशी. राहणार गाव खैरणगा, तालुका वैजापूर, जिल्हा छ. संभाजीनगर. हे माउलींच्या वरील अनन्य भक्तीने आपले गाव सोडून गेले कैक वर्षे, श्री क्षेत्र नेवासा येथे राहत आहेत. श्री क्षेत्र नेवासा येथे श्री संत ज्ञानेश्वर माऊलींनी श्रीभावार्थदीपिका म्हणजेच श्रीज्ञानेश्वरीचे लेखन केले.

श्री संत ज्ञानेश्वर माऊलीं ज्या दगडी स्तंभाला टेकून श्रीज्ञानेश्वरीचे लेखन करीत असत, त्या दगडी स्तंभाचे जतन करुन ग्रामस्थ मंडळींनी तेथे जे मंदिर बांधलेले आहे, तेथे वर्षभर यात्रेकरू, भक्त मंडळी यांचे दर्शनार्थ आवागमन सुरूच असते. त्यांत वारकरी मंडळींची जास्त संख्या असते. श्रीज्ञानेश्वरीचे लेखन केलेल्या स्तंभाच्या दर्शनानंतर हरिभक्तिने प्रेरित भक्त मंडळी ही ' तुळशीमाळ गळा ' घालण्यास प्रेरित होतात. त्यांना हे पंच्यांशी वर्षे वयाचे वृद्ध आजोबा काशीनाथ खाजाने हे स्वहस्ते, वाळलेल्या तुळशीच्या काड्यांपासुन, स्वतःच बनविलेल्या गिरमिटसारख्या पण आडव्या, धनुकलीने चालणाऱ्या यंत्रावर तुळशीच्या माळा बनवून देतात.

■ राजेंद्र सांभारे, हिंगणा.

# केळीच्या सालीचा चहा प्यायला का? शरीराला मिळतील अगणित फायदे



आपण सहसा केळी खाऊन साल फेकून देतो. आपल्याला वाटतं की, केळीची साल निरुपयोगी आहे, पण तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की, या सालीपासून चविष्ट आणि आरोग्यदायी चहा बनवता येतो! होय, केळीच्या सालीचा चहा आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतो. हा चहा बनवायला फक्त 5 मिनिटे लागतात आणि त्याचे शरीराला अनेक आश्चर्यकारक फायदे मिळू शकतात.

**केळीच्या सालीचा चहा कसा बनवायचा? (रेसिपी):**

1. सर्वप्रथम, एक पिकलेली केळी स्वच्छ धुऊन घ्या आणि तिची साल वेगळी करा. शक्य असल्यास, ऑरगॅनिक केळी वापरण्याचा प्रयत्न करा.
2. एका भांड्यात दीड कप पाणी उकळायला ठेवा.
3. पाणी उकळायला लागल्यावर त्यात केळीची साल आणि एक छोटा दालचिनीचा तुकडा (स्टिक) टाका.
4. हे मिश्रण 10-15 मिनिटे मंद आचेवर उकळा.
5. गॅस बंद करा आणि चहा गाळून घ्या.
6. चवीसाठी तुम्ही यात थोडे मध किंवा लिंबाचे काही थेंब घालू शकता.

अशा प्रकारे तुमचा केळीच्या सालीचा आरोग्यदायी चहा तयार होईल.

**केळीच्या सालीच्या चहाचे अद्भुत फायदे:**

**शांत आणि गाढ झोप:** केळीच्या सालीमध्ये असलेले ट्रिप्टोफॅन आणि मॅग्नेशियम हे घटक झोपेची गुणवत्ता सुधारतात. हे दोन्ही घटक मेंदूला शांत करतात आणि शरीराला आराम मिळवण्यास मदत करतात. ज्यांना निद्रानाशाची समस्या आहे किंवा ज्यांची झोप वारंवार मोडते, त्यांच्यासाठी हा चहा फायदेशीर आहे.

**मजबूत पचनसंस्था:** या चहामध्ये असलेले फायबर पचनक्रिया सुधारण्यास मदत करते. हे बद्धकोष्ठता, गॅस आणि ॲसिडिटीसारख्या समस्यांपासून आराम देते. नियमितपणे एक कप केळीच्या सालीचा चहा प्यायल्याने आतड्यांची स्वच्छता होते आणि शौचास होणारा त्रास कमी होतो.

**हृदयाचे आरोग्य:** केळीच्या सालीत पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात.

**वजन नियंत्रणात मदत:** हा चहा वजन कमी करण्यातही उपयुक्त ठरतो. तो भूक कमी करतो आणि शरीरातील चयापचय क्रिया वेगवान करतो. तसेच, यात कॅलरीज खूप कमी असल्यामुळे, वजन कमी करू इच्छिणाऱ्या लोकांसाठी हा एक उत्कृष्ट नैसर्गिक उपाय ठरू शकतो.

■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



**|| ॐ इग्नोराय नमः ||**

**ज्याला करावी वाटते जनसेवा**
**त्याला खाव्या लागती शिव्या**
**तुमच्याच खिशाला लागेल झळ**
**तरी सोसावे लागे टोमण्याची कळ**

**लोक घोड्यावरही बसू देत नाही**
**व पायीही चालू देत नाही**
**हे पक्क ठेवा ध्यानात**
**तरच स्वप्न येईल प्रत्यक्षात**

**ओम इग्नोराय नमः मंत्राचा जप**
**करत सुरु ठेवा समाजसेवा**
**आज नाही तर उद्या हमखास**
**समाज दखल घेईल देवा**

## सॅमसंग इंडियाकडून एम९, एम८ आणि एम७ स्मार्ट मॉनिटर सिरीजसाठी आकर्षक लाँच ऑफर्स सादर

**मुंबई, ३० जुलै :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने नवीन स्मार्ट मॉनिटर लाइनअप लाँच केली आहे, लाइनअपमध्ये प्रमुख ४के क्यूडी-ओएलईडी मॉनिटर एम९ सह अपग्रेडेड एम८ आणि एम७ मॉडेल्स आहेत. हे सर्व मॉनिटर्स प्रगत व वैयक्तिकृत एआय क्षमतांसह सुसज्ज आहेत, तसेच सर्वोत्तम डिस्प्लेसाठी नवीन मानक स्थापित करतात. या नाविन्यतांसह वापरकर्ते एकाच स्मार्ट डिवाईसवर मनोरंजनाचा, काम करण्याचा आणि गेम्स खेळण्याचा आनंद घेऊ शकतात.

स्मार्ट मॉनिटर एम९ मध्ये क्यूडी-ओएलईडी तंत्रज्ञानासह आकर्षक ३२-इंच ४के डिस्प्ले आहे, जो प्रत्येक टास्कदरम्यान प्रगत रंगसंगती आणि कॉन्ट्रास्ट देतो. काम, गेमिंग व स्ट्रीमिंगसाठी डिझाइन करण्यात आलेला हा मॉनिटर टिकाऊपणाची खात्री देतो, तसेच बर्न-इन प्रोटेक्शन आणि अ‍ॅण्टी-ग्लेअर तंत्रज्ञान अशा वैशिष्ट्यांसह वापरकर्त्यांच्या आरामदायीपणाला प्राधान्य देतो.

दिलेल्या कालावधीदरम्यान सॅमसंग एम९ सिरीज (किंमत १२१,४९९ रूपयांपासून सुरू) ३,००० रूपयांच्या लाँच ऑफरसह उपलब्ध असेल.

सुधारित स्मार्ट मॉनिटर एम८ आणि एम७ मॉडेल्स ३२-इंच ४के यूएचडी स्क्रिन्ससह सॅमसंगची लाइनअप वाढवतात, जेथे अधिकाधिक वापरकर्त्यांना सुधारित अनुभव देतात. दोन्ही मॉनिटर्समध्ये व्हीए पॅनेल्स आहेत, जे व्हिज्युअल दर्जा सुधारण्यासोबत वाढवतात. या मॉनिटर्समध्ये क्लिक टू सर्च आणि टायझेन ओएस होम यासारखी एआय-पॉवर्ड वैशिष्ट्ये आहे, जी वापरकर्त्यांना एक्स्प्लोअर, नेव्हिगेट करण्यास आणि त्यांच्या पसंतीनुसार कन्टेन्ट सहजपणे शोधण्यास मदत करतात.

एम७ सिरीजचे तिन्ही मॉडेल्स (किंमत ३२,९९९ रूपयांपासून सुरू) १,५०० रूपयांच्या लाँच ऑफरसह उपलब्ध असतील आणि एम८ सिरीज (किंमत ४७,५९९ रूपयांपासून सुरू) ३,००० रूपयांच्या लाँच ऑफरसह उपलब्ध असेल. यासह किफायतशीरपणाबाबत जागरूक असलेल्या ग्राहकांना लक्षवेधक पर्याय मिळतील.

बिल्ट-इन मायक्रोसॉफ्ट ३६५ सह ग्राहक प्रत्यक्ष मॉनिटरमधील डॉक्युमेंट्सवर प्रभावीपणे काम करू शकतात, ज्यासाठी पीसीची गरज भासणार नाही. तसेच, वापरकर्ते मल्टी कंट्रोल, मल्टी व्ह्यू आणि स्मार्टथिंग्ज एकीकरणासह अधिक स्थिरता आणि मल्टीटास्किंग क्षमतांचा आनंद घेऊ शकतात, ज्यामुळे हे मॉनिटर्स वैयक्तिक व व्यावसायिक वापरासाठी अनुकूल आहेत.

## 'पीएनजी ज्वेलर्स'च्या 'मंगळसूत्र महोत्सवा'चा एकविसावा वर्षपूर्ती सोहळा

**नागपूर ३० जुलै :** महाराष्ट्रातील घराघरांमध्ये परंपरेसह, विश्वासाने घेतले जाणारे नाव, पीएनजी ज्वेलर्स यांचा प्रतिष्ठित आणि बहुप्रतीक्षित 'मंगळसूत्र महोत्सव' यंदा २१ व्या वर्षात पदार्पण करत आहे. या वर्षी पहिल्यांदाच १८ कॅरेट सोन्यातील मंगळसूत्रे पीएनजी ज्वेलर्सने ग्राहकांसाठी उपलब्ध केली आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मंगळसूत्र महोत्सवात पारंपरिकता आणि आधुनिकतेचा सुंदर संगम पाहायला मिळणार आहे. ७ वेगवेगळ्या प्रकारांत पारंपरिक, आधुनिक, हलक्या वजनाचे, ऐतिहासिक, पोल्की, हिरे आणि गोकाक यांचे २००० हून अधिक डिझाइन्स महाराष्ट्र आणि गोव्यातील पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व शाखांमध्ये सादर करण्यात येणार आहेत.

मंगळसूत्र महोत्सवानिमित्त ग्राहकांना सोन्याच्या मंगळसूत्राच्या घडणावळीवर ५०% पर्यंत सवलत आणि हिऱ्यांच्या मंगळसूत्राच्या घडणावळीवर १००% पर्यंत सवलत मिळणार आहे. त्यामुळे मंगळसूत्र खरेदीसाठी ही एक सुवर्णसंधी आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, २१ वर्षांचा हा प्रवास आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा आहे. यावर्षी प्रथमच आम्ही १८ कॅरेट सोन्याचे मंगळसूत्र बाजारात आणत आहोत. परंपरा आणि आधुनिकता यांचा संगम असलेल्या या महोत्सवातून प्रत्येक स्त्रीचे व्यक्तिमत्त्व, स्टाईल आणि मूल्य यांचा सन्मान करत आम्ही विश्वासार्हतेची आणि उत्कृष्ट कारागिरीची परंपरा जपत राहू.

२५ जुलै २०२५ पासून सुरू झालेला हा महोत्सव म्हणजे पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देणारा एक अद्वितीय उपक्रम आहे. जिथे सौंदर्य, गुणवत्ता आणि संस्कृती यांचे दर्शन घडते.

## ओरा फाइन ज्वेलरीचा 'डायमंड फेस्टिवल' आकर्षक स्टेटमेंट ज्वेलरी आणि अविश्वसनीय सूटसह परतला आहे



**नागपूर ३० जुलै :** पावसाळ्याच्या आगमनासह संपूर्ण वातावरणात उत्साहपूर्ण बदल झालेला असताना ओरा फाइन ज्वेलरीला त्यांचा बहुप्रतिक्षित व अत्यंत प्रशंसित 'डायमंड फेस्टिवल'च्या पुनरागमनाची घोषणा करताना आनंद होत आहे. पुन्हा एकदा ग्राहकांना ब्रँडच्या आकर्षक कलेक्शन्सचा अनुभव घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'डायमंड फेस्टिवल' वर्षानुवर्षे ओरामधील लक्झरीचे सर्वोत्तम सेलिब्रेशन ठरला आहे, जेथे समकालीन फॅशनचे पैलू कॅप्चर करण्यासाठी, तसेच हिऱ्यांची मोहकता व आकर्षकता कायम ठेवण्यासाठी प्रत्येक पीस बारकाईने डिझाइन करण्यात आला आहे. या वर्षी देखील ओरा नवीन कलेक्शनचे अनावरण करत आहे, ज्यामधून सीझनचा वैविध्यपूर्ण उत्साह व्यक्त होतो. तसेच, ओरा सूक्ष्मदर्शी ग्राहकांना अद्वितीय आकर्षकतेसह त्यांच्या ज्वेलरी कलेक्शनमध्ये वाढ करण्याची संधी देत आहे.

ओरा फाइन ज्वेलरीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. दिपू मेहता म्हणाले, ''आमच्या ब्रँडसाठी डायमंड फेस्टिवलचे खूप महत्त्व आहे. हे फेस्टिवल निरंतर अचूकता, कारागिरी आणि विश्वासाला नव्या उंचीवर घेऊन जाण्याप्रती आणि दरवर्षाला ग्राहकांसाठी सादर करण्याप्रती अविरत कटिबद्धतेचे प्रतीक आहे. विश्वास हे महत्त्वपूर्ण मूल्य असलेल्या जगात ओराचा डायमंड फेस्टिव्हल अविस्मरणीय आठवणी घडवण्यात सहभागी असलेला एक विश्वासू साथीदार आहे, जो अपवादात्मक दरांमध्ये वैविध्यपूर्ण दागिने देतो, जी फक्त आभूषणे नाहीत तर आकर्षकता व कालातीत मोहकतेचे प्रतीक देखील आहेत.''

१९ जुलै ते १७ ऑगस्टपर्यंत ग्राहकांना आकर्षक हिऱ्यांच्या आभूषणांचा संग्रह पाहता येणार आहे, ज्यामध्ये प्रत्येक सूक्ष्मदर्शी ग्राहकाला मोहकता व स्टाइलच्या अद्वितीय संयोजनाचा अनुभव मिळेल. सुरू असलेल्या डायमंड फेस्टिवलचा भाग म्हणून ओरा आकर्षक डिझाइन्स असलेले दागिने सादर करेल, ज्यांची किंमत ५०,००० रूपयांपासून ४,९९,९९९ रूपयांपर्यंत आहे. विशेष सूटचा आनंद घेण्यासाठी जवळच्या ओरा फाइन ज्वेलरी स्टोअरला भेट द्या: हिऱ्यांच्या किंमतीवर २५ टक्के सूट, ईएमआय सुविधेवर 0 टक्के व्याज. तुमच्या जुन्या सोन्याच्या दागिन्यांत 0 टक्के घट, 0 टक्के डाऊन पेमेंट *अटी व शर्ती लागू.

## वी ने सुरु केले वी फायनान्स – कर्ज, गुंतवणूक आणि क्रेडिट कार्ड्स यांचे व्यवस्थापन करण्याचा सहजसोपा मार्ग

**मुंबई, ३० जुलै :** भारतातील आघाडीची टेलिकॉम कंपनी वी (वोडाफोन आयडिया) ने वी फायनान्स हा एक सर्वसमावेशक प्लॅटफॉर्म वी ऍपवर सुरु करत असल्याची घोषणा केली आहे. हकांना कर्ज, फिक्स्ड डिपॉझिट्स आणि क्रेडिट कार्ड्स या सुविधा सहजपणे मिळवण्यात मदत करण्यासाठी वी ने हे महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. त्यामुळे आता वी ऍपवरील उपयुक्त वैशिष्ट्ये आणि क्षमता अजून जास्त वाढल्या आहेत. विविध सेवासुविधांची पेमेंट्स, मुव्हीज आणि टीव्ही शो, गेमिंग, ई-कॉमर्सवर खरेदीमध्ये सूट, क्विक कॉमर्स आणि इतर अनेक वेगवेगळ्या सेवा वी ऍपवर आधीपासून उपलब्ध आहेत.

जीवनशैलीसाठी आवश्यक असलेल्या अनेक सेवासुविधा मिळण्याचे वन-स्टॉप सोल्युशन वी ऍप बनावे या विचारावर आधारित वी फायनान्स हे विश्वसनीय आर्थिक संस्थांच्या सहयोगाने सुरु करण्यात आले आहे. व्यक्तिगत कर्ज, फिक्स्ड डिपॉझिट्स आणि क्रेडिट कार्ड्स यासारख्या वेगवेगळ्या सुविधाजनक, सर्वसमावेशक व्यक्तिगत आर्थिक सुविधा प्रदान करणे हा त्यामागचा उद्देश आहे.

वी चे सीएमओ अवनीश खोसला यांनी सांगितले, डिजिटल सुविधांच्या माध्यमातून ग्राहकांच्या जीवनात सुविधा आणण्यासाठी आम्ही वी मध्ये बांधील आहोत. वी ऍपमध्ये वी फायनान्समार्फत आर्थिक सेवासुविधा सहजपणे, जलद गतीने आणि उपलब्ध होण्याजोग्या आर्थिक सुविधा देऊन आम्ही ग्राहकांना नेहमीच्या गुंतागुंती न येता, त्यांचे फायनान्सेस नियंत्रणात ठेवता यावेत यासाठी सक्षम बनवत आहोत. विश्वसनीय आर्थिक संस्थांसोबत आमची भागीदारी असल्याने ग्राहकांना त्यांच्या गरजांनुरूप सुयोग्य उत्पादन मिळू शकेल हे नक्की. आम्ही असे मानतो की, हा डिजिटलला प्राधान्य देणारा, कागदविरहित दृष्टिकोन लाखो भारतीयांची फायनान्सेसचे व्यवस्थापन करण्याची पद्धत बदलेल.

## जागरूकता वाढवा, जीव वाचवा: हेपेटाइटिस नष्ट करण्याची तातडीची गरज

**जारीकर्ता: डॉ. पियूष मरुडवार, सल्लागार गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट आणि लिव्हर ट्रान्सप्लांट फिजिशियन**

**नागपूर ३० जुलै :** प्रत्येक वर्षी २८ जुलै रोजी साजरा केला जाणारा जागतिक हेपेटाइटिस दिवस हा विषाणूजन्य हेपेटाइटिस बद्दल जनजागृती वाढवण्यासाठी आणि प्रतिबंध, निदान आणि उपचारांची गरज अधोरेखित करण्यासाठी एक जागतिक उपक्रम आहे. हा दिवस नोबेल पारितोषिक विजेते डॉ. बारुच ब्लमबर्ग यांचा जन्मदिवसही आहे, ज्यांनी हेपाटायटीस बी विषाणूचा शोध लावला आणि त्याचे लस विकसित केली.

या प्रसंगी, आघाडीचे यकृततज्ज्ञ व सार्वजनिक आरोग्य कार्यकर्ते डॉ. पियूष मरुडवार यांनी नागरिकांना हपाटायटीसच्या वाढत्या धोक्याची जाणीव करून देण्याचे आवाहन केले आहे आणि लवकर निदान, लसीकरण आणि समतोल आरोग्यसेवा मिळवण्यासाठी कृती करण्याचे आवाहन केले आहे.

जगभरात ३० कोटींपेक्षा अधिक लोक chronic हपाटायटीसने ग्रस्त आहेत, आणि त्यापैकी बहुतेकांना त्यांच्या स्थितीबद्दल माहितीच नसते. विशेषतः हपाटायटीस बी आणि सी हे लिव्हर सिरोसिस आणि यकृत कर्करोगाचे प्रमुख कारण आहेत आणि दरवर्षी सुमारे १३ लाख मृत्यूंसाठी जबाबदार आहेत. लस आणि उपचार उपलब्ध असूनही, अजूनही असंख्य लोक अनभिज्ञता, सामाजिक कलंक आणि मर्यादित आरोग्यसेवेमुळे त्रस्त आहेत.

या वर्षाची थीम हेपाटायटीस थांबत नाही ही आपल्या प्रतिसादाला गती देण्याची आवश्यकता अधोरेखित करते. विलंब निदान, उपचार किंवा लसीकरण गंभीर परिणाम देऊ शकतो. कोविडनंतरच्या काळात आरोग्य सेवांमध्ये अडथळे आणि नियमित तपासणीकडे दुर्लक्ष यांसारख्या समस्या वाढल्या आहेत.

हपाटायटीस शांत असतो, पण आपला प्रतिसाद ठाम असला पाहिजे. जागरूकता, वेळेवर तपासणी आणि लसीकरण ही आपली प्रभावी शस्त्रे आहेत, असे डॉ. पियूष मरुडवार म्हणाले.

डॉ. मरुडवार यांच्याकडून पुढील प्रतिबंधात्मक उपायांवर भर देण्यात येतो:

* हपाटायटीस बी साठी लसीकरण सुरक्षित, प्रभावी आणि उपलब्ध.
* सुरक्षित रक्त संक्रमण आणि इंजेक्शन पद्धती.
* इंजेक्शनद्वारे अंमली पदार्थ घेणाऱ्यांसाठी हानी-नियंत्रण कार्यक्रम.
* उच्च-धोका असलेल्या गटांसाठी नियमित तपासणी आणि लवकर निदान.

ते हपाटायटीससंदर्भातील सामाजिक कलंक दूर करण्यासाठी जनजागृती मोहिमांचे समर्थन करतात. आपण अशी आरोग्य यंत्रणा उभारली पाहिजे जिथे हपाटायटीसची तपासणी आणि उपचार डायबेटिस किंवा बीपीच्या तपासणीइतकेच सामान्य आणि कलंकविरहित असतील, असे ते सांगतात.

भारत आणि इतर निम्न व मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये निदान व उपचाराच्या अडथळ्यांवर मात करणे अत्यावश्यक आहे. बरेच रुग्ण उशिरा समोर येतात, जेव्हा यकृताचे नुकसान मोठ्या प्रमाणात झालेले असते. किफायतशीर औषधांची उपलब्धता वाढवून आणि हपाटायटीस तपासणीला नियमित आरोग्य तपासणीचा भाग बनवून हे अंतर कमी करता येऊ शकते.

डॉ. मरुडवार यांनी आरोग्य कर्मचारी, सामाजिक नेते व धोरणकर्त्यांना जागतिक आरोग्य संघटनेच्या २०३० पर्यंत हपाटायटीस निर्मूलनाच्या उद्दिष्टाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे.

## तारक मेहता का उल्टा चश्मा आजही भारताची अत्यंत आवडती कौटुंबिक मालिका

**मुंबई, ३० जुलै :** भारतीय टेलिव्हिजनवर सर्वात जास्त चाललेली आणि सोनी सबचा अभिमान असलेली तारक मेहता का उल्टा चश्मा ही कौटुंबिक मालिका एक मोठा लक्षणीय टप्पा पार करत आहे. या मालिकेने तब्बल १७ वर्षे पूर्ण केली आहे, ज्यात ४४६० पेक्षा जास्त एपिसोड झाले आहेत, ज्यांनी लोकांना खूप हसवले आहे, जोडले आहे आणि आशा दिली आहे. नीला फिल्म प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली असित कुमार मोदी द्वारा निर्मित ही मालिका २००८ मध्ये सुरू झाली होती आणि आता सगळ्या पिढीतल्या प्रेक्षकांसाठी हे कौटुंबिक जिव्हाळ्याचे नाव बनले आहे. टीएमकेओसी या मालिकेला निरंतर मिळालेले यश हे त्यातील कलाकार, निष्ठावान क्रू, गुणी लेखक आणि द्रष्ट्या प्रॉडक्शन टीमच्या एकत्रित प्रयत्नांचे प्रतीक आहे. गोकुलधाम सोसायटीला देशातील घराघरात लाडकी बनवण्यासाठी मालिकेच्या प्रत्येक विभागाने-ऑन स्क्रीन आणि पडद्याच्या मागे- योगदान दिले आहे.

स्वागतशील वृत्तीच्या गोकुळधाम सोसायटीची गोष्ट सांगणारी ही मालिका भारताच्या सांस्कृतिक मूल्यांमध्ये रूजलेली आहे. या मालिकेत दैनंदिन क्षण नर्म विनोदाच्या, सामुदायिक भावनेच्या आणि अर्थपूर्ण कथानकाच्या माध्यमातून सादर करण्यात येतात, जी सोनी सबची खास शैली आहे. यातील व्यक्तिरेखा अत्यंत ताकदीच्या असल्यामुळेच इतका प्रदीर्घ काळ ही मालिका सुरू राहिली आहे. या व्यक्तिरेखा प्रेक्षकांसोबत वाढल्या, मोठ्या झाल्या आहेत आणि भारतीय कुटुंबातील सदस्य बनल्या आहेत.

एखादा छोटासा गैरसमज असो किंवा ऑनलाइन फ्रॉड अथवा शेजारी-पाजाऱ्यांमधील वाद-विवाद यांसारखा समाजाशी संबंधित एखादा विषय असो या मालिकेची ओळख असलेला साधेपणा आणि आशावाद मालिकेत कायम राहतो.

## डायसन इंडिया ने सुरु केले नवीन अभियान द डिफ्रंस इज डायसन

**नागपूर, ३० जुलै :** डायसन या जागतिक टेक्नॉलॉजी कंपनीने आज आपल्या नव्या द डिफ्रंस इज डायसन अभियानाची सुरुवात केल्याचे घोषित केले. या अभियानाचा मुख्य चेहरा बनली आहे, डायसन इंडियाची ब्युटीसाठी ब्रँड ॲम्बेसेडर बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण. डायसन आपल्या या अभियानात वेगवेगळ्या प्रकारचे केस असणाऱ्या व्यक्तींना कोणत्याही हीट-डॅमेज शिवाय उत्तम प्रकारे केसांची स्टाइल करून, अनोख्या स्व-अभिव्यक्तीचा प्रभाव अनुभवण्यास आमंत्रित करत आहे. यामधून नावीन्यपूर्ण टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून केसांच्या आरोग्याविषयी असेलेली डायसनची वचनबद्धता दिसून येते तसेच डायसन ब्यूटी रेंजचे अष्टपैलूत्व आणि कामगिरी देखील अधोरेखित होते.

या अभियानाविषयी बोलताना डायसन इंडियाचे मॅनिजिंग डायरेक्टर अंकित जैन म्हणाले, द डिफ्रंस इज डायसन हे अभियान व्यक्तिमत्वाची दखल घेऊन ते उन्नत करते. हे अभियान इनोव्हेशनबाबत डायसनची वचनबद्धता दृढ करते आणि आपली हेअर स्टाइलिंग श्रेणी उपभोक्त्यांपर्यंत पोहोचवते. ही श्रेणी सर्व प्रकारच्या केसांसाठी उत्कृष्ट स्टाइलिंग प्रदान करते आणि ते देखील हीट डॅमेजशिवाय. दीपिका पादुकोण आमचा हा जीवनविषयक दृष्टिकोन जिवंत करत आहे आणि हेअर स्टाइलिंगबाबत टेक्नॉलॉजीला सर्वाधिक महत्त्व देण्याची आमची वृत्ती प्रदर्शित करत आहे, याचा आम्हाला आनंद होत आहे.

डायसन ब्यूटी ॲम्बेसेडर बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण म्हणाल्या की मला नेहमी असे वाटते की, आपले व्यक्तिमत्व स्वीकारण्यातच सौंदर्य लपलेले असते. माझ्यासाठी द डिफ्रंस इज डायसन म्हणजे वेगवेगळ्या स्टाइल्स आजमावणे आणि केसांची नैसर्गिक चमक टिकवून ठेवणे आणि तसे करताना आपल्या केसांची योग्य काळजी घेतली जात आहे, हा विश्वास बाळगणे. हेच डायसनचे वेगळेपण आहे.

होगार्थच्या सहयोगाने बनवलेल्या या फिल्ममध्ये हे दाखवले आहे की, कशाप्रकारे डायसनची ही श्रेणी भारतातील वेगवेगळ्या प्रकारच्या केसांसाठीच्या वास्तविक गरजा, स्टाइल्स आणि हवामान यांचा विचार करून तयार करण्यात आली आहे. या फिल्ममध्ये एका पाठोपाठ एक हाय-इम्पॅक्ट व्हिज्युअल्स उलगडत जातात आणि त्यातून केसांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड न करता केलेल्या दीपिकाच्या दैनंदिन आणि खास स्टाइल्स बघायला मिळतात. यामध्ये स्लीक, स्वाभाविक लुकपासून ते सुस्पष्ट दिसणाऱ्या कर्ल्सपर्यंतच्या या स्टाइलिंगच्या प्रवासात डायसनचे नावीन्यपूर्णतेला प्राधान्य देणाऱ्या हेअर-केअर सोल्यूशन्स प्रदान करण्याचे आणि डॅमेज-मुक्त आणि सहज स्टाइलिंगचे वचन झळकते.

## गुडघा, कंबर, खांदा आणि कोपर यांची जॉइंट रिप्लेसमेंट सर्जरी हे जीवन बदलणारे आणि दीर्घकाळ टिकणारे उपाय आहेत!



**डॉ. मनोज पहुकर,**
मॅक्स हॉस्पिटल, नागपूर

**चंद्रपूर, ३० जुलै :** पूर्वीच्या पिढीतील अनेक वृद्ध लोक सांध्यांच्या वेदनांसाठी डॉक्टरांकडे जाणे टाळायचे, पण आजचे सक्रिय प्रौढ व्यक्तीं संपूर्ण जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेमुळे मोठा दिलासा मिळवत आहेत. वय वाढल्यामुळे सांध्यांवर झीज होणे ही नैसर्गिक गोष्ट आहे आणि त्यासोबत येणाऱ्या वेदना सुद्धा अपरिहार्य असतात. भारतात वृद्ध व्यक्तींमध्ये सर्वाधिक आढळणारा संधिवाताचा प्रकार म्हणजे ऑस्टियोआर्थरायटिस. आपल्या सांध्यांमधील हाडांच्या टोकांवर झीजप्रतिरोधक उपयुक्त अशा कूर्चा (कार्टिलेज) थर असतो, जो झटका व कंपन शोषून घेतो आणि हाडांना सुरळीत हालचालीस मदत करतो. संधिवातामुळे ही कार्टिलेज हळूहळू झिजते आणि त्यामुळे हाडं एकमेकांवर घासू लागतात, ज्यामुळे तीव्र वेदना होतात. ऑस्टियोआर्थरायटिस सर्व सांध्यांना होऊ शकतो, परंतु कंबर आणि गुडघ्यासारखे वजन सहन करणारे सांधे सर्वाधिक वेदनादायक ठरतात. जे लोक दीर्घकाळ वेदनांमुळे दैनंदिन जीवन जगू शकत नाहीत, विश्रांती दरम्यान किंवा रात्री वेदना होतात, आणि हालचालींमध्ये मर्यादा येतात, अशा रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असते.

जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेचा मुख्य उद्देश म्हणजे झिजलेल्या किंवा दुखापत झालेल्या सांध्यांच्या पृष्ठभागाला मेटल, प्लास्टिक, पॉलीइथिलीन, सिरॅमिक्स किंवा अशा अनेक सामग्रींच्या साहाय्याने बदलणे. आजच्या काळात कृत्रिम सांध्यांचे अधिक प्रकार उपलब्ध झाले आहेत, आणि हाडांच्या आजारांमध्ये तज्ज्ञ असलेले ऑर्थोपेडिक सर्जन्स रुग्णाच्या गरजेनुसार कोणता पर्याय सर्वोत्तम आहे हे ठरवण्यास मदत करतात.

जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेनंतर मिळणारे परिणाम पूर्वीपेक्षा अधिक अधिक स्थिर आणि यशस्वी होत आहेत, याचे श्रेय आधुनिक तंत्रज्ञान, नव्या शस्त्रक्रिया पद्धती आणि प्रगत साहित्याला जाते. काही निवडक रुग्णांमध्ये सबव्हॅस्टस पद्धतीने मिनिमली इनवेसिव्ह गुडघ्याच्या शस्त्रक्रिया करता येते, ज्यामुळे वेदना कमी होतात, रुग्णालयात राहण्याचा कालावधी कमी होतो आणि रुग्ण लवकर बरा होतो. या शस्त्रक्रियेसाठी वयोमर्यादेचे बंधन नाही बहुतांश रुग्ण ५० ते ८० वयोगटातील असतात. योग्य पूर्वतयारी केल्यास जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया अधिक सुलभ ठरते जसे की वजन कमी करणे, शस्त्रक्रियेपूर्व व्यायामाचे नियोजन आणि ऑपरेशननंतर स्वतंत्रपणे चालण्यासाठी घरातील वातावरण सुरक्षित आणि आरामदायक बनवणे.

गुडघ्याचे प्रत्यारोपण हे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रातील सर्वाधिक यशस्वी शस्त्रक्रिया मानली जाते. यामुळे रुग्णांचे जीवनमान चांगले होते. कंबरेचे प्रत्यारोपण (हिप रिप्लेसमेंट) सुद्धा तितकेच यशस्वी आणि सामान्यपणे केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियांपैकी एक आहे, जी ऑर्थोपेडिक सर्जन्स प्रामुख्याने एव्हस्क्युलर नेक्रोसिस, हिप फ्रॅक्चर आणि कंबर संधिवात (हिप आर्थरायटिस) यासाठी करतात आणि या शस्त्रक्रियेनंतर बहुतांश रुग्ण दुसऱ्याच दिवशी चालण्यास सक्षम होतात. खांदा आणि कोपर संधिवाताने त्रस्त रुग्ण अनेक वेळा वेदना सहन करत राहतात आणि जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया टाळतात किंवा पुढे ढकलतात. पण गेल्या दोन दशकांत खांदा व कोपर प्रत्यारोपणात झालेल्या प्रगतीमुळे उत्कृष्ट कार्यक्षमतेचे आणि यशस्वी परिणाम मिळत आहेत. म्हणून रुग्णांना वेदनामुक्त आणि कार्यक्षम जीवनासाठी या शस्त्रक्रियांसाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. ९०% हून अधिक प्रत्यारोपित सांधे (इम्प्लांट) किमान १० ते १५ वर्षे टिकतात, आणि काही तर यापेक्षाही जास्त काळ टिकतात.

एका रुग्णाने जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेनंतर स्वतंत्रपणे चालायला सुरुवात केली आणि सांगितले की त्यांनी ही शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी विनाकारण खूप वेळ वाट पाहिली. खांदा आणि कंबरेचे प्रत्यारोपण झालेल्या रुग्णांमध्ये शस्त्रक्रियेनंतर मोठ्या प्रमाणात सुधारणा दिसून येते. रुग्णांची जागरूकता, आरोग्यशिक्षण, वैद्यकीय सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान, प्रत्यारोपणासाठी लागणाऱ्या उपकरणांची उपलब्धता, वेदनानियंत्रण आणि ॲनेस्थेशिया देण्याच्या आधुनिक पद्धती यामध्ये झालेली प्रगती यामुळेच संधिवाताने त्रस्त रुग्णांसाठी जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया हे एक वरदान ठरले आहे.

## आज का अंदाज

**गुरूवार ३१ जुलै २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| १५६ | १६८ | २४० | २३४ | १४८ | ३३८ | १७७ | ११६ |
| ४८० | ३४८ | ३६७ | ४५० | ४९० | ७८९ | २५८ | २२४ |
| ३९० | ७८० | ४६६ | ३७९ | ५८० | २३९ | ३५७ | ३६९ |
| २४ | ५४ | ६० | ९० | ३२ | ४२ | ५६ | ८७ |
| २१ | ५१ | ६८ | ९८ | ४० | ४० | ५१ | ८६ |
| २८ | ५८ | ६७ | ९७ | ३९ | ४९ | ५७ | ८१ |

**३१ जुलै : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४३ | ७३ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## कोणी बनले मीडिया स्टार, तर कोणी आहे एआयच्या प्रेमात!

**मुंबई, २९ जुलै :** या आठवड्यात एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है' पाहण्यासह हसून-हसून लोटपोट होण्यास सज्ज राहा, जेथे आधुनिक तंत्रज्ञान गोंधळामध्ये विलक्षण वळण आणते. एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत कटोरी अम्मा ऊर्फ हिमानी शिवपुरी म्हणाल्या, ''हप्पू सिंग (योगेश त्रिपाठी) त्याच्या आजुबाजूला असलेले सर्वजण सोशल मीडियाद्वारे पैसे कमवत आहेत हे पाहिल्यानंतर सेलिब्रिटी होण्याचे स्वप्न पाहतो, अगदी त्याचा कमी हुशार मित्र चिरको देखील ऑनलाइन सेन्सेशन बनला आहे. निराश आणि स्वतःला सिद्ध करण्यास उत्सुक असलेला हप्पू घोषित करतो की तो देखील सोशल मीडिया स्टार बनेल. पण त्याची मुले हृतिक (आर्यन प्रजापती), चमची (झारा वारसी) आणि रणबीर (सोम्या आझाद) त्याची खिल्ली उडवतात, ज्यामुळे त्याला अपमानित झाल्यासारखे वाटते आणि त्याचा प्रसिद्धी मिळवण्याचा ध्यास अधिक वाढतो. हार न मानण्याचा निर्धार केलेला, घरात निर्माण होणाऱ्या गोंधळाची जाणीव नसलेला हप्पू स्टारडमचा पाठलाग करत राहतो. दरम्यान, राजेश (गीतांजली मिश्रा) आणि अवधेशिया (उर्मिला शर्मा) एक कपटी योजना आखतात. आजारी असल्याचे नाटक करून त्या हप्पूकडून पैसे घेतात आणि त्याला फसवतात. या पैशांमधून त्या साड्या व सँडल्स खरेदी करतात. पण त्यांच्या योजनेकडे लक्ष ठेवले जात असते, जेथे कटोरी अम्मा (हिमानी शिवपुरी) त्यांच्यावर बारकाईने नजर ठेवत त्यांचे प्रत्येक कृत्य पाहते. खरे-खोटे व गोंधळामध्ये अडकलेल्या हप्पूला काहीच कळत नाही, कोण खोटे बोलत आहे, कोण खरे बोलत आहे हे समजत नाही.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस चांगला राहील. करिअरमध्ये मात्र तुम्हाला काही आव्हानांना सामोरे जावे लागू शकते. प्रॉपर्टीच्या बाबतीत सावधगिरी बाळगा. नुकसान होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** आज तुमचे आरोग्यही चांगले राहील. तुम्हाला अनेक सकारात्मक बदल अनुभवायला मिळतील. आज तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत वेळ घालवा. तुमची आर्थिक स्थिती काहीशी कमजोर पडू शकते.

**मिथुन :** आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. आजचा दिवस तुमच्या जीवनसाथीसोबत चांगला जाईल. करिअरमध्ये तुम्हाला यश मिळण्याची चिन्हे आहेत. आरोग्यावर विशेष लक्ष द्या.

**कर्क :** आज करिअरमध्ये यश मिळू शकते. घरातील सदस्यांसोबतचे तुमचे संबंध अधिक दृढ होतील. व्यावसायिक मुद्द्यांवर संयम बाळगा. प्रेमसंबंधात मधुरता येईल. आर्थिक निर्णय विचारपूर्वक घ्यावे.

**सिंह :** व्यावसायिक मुद्द्यांवर संयम बाळगणे आवश्यक आहे. प्रेमसंबंधात मधुरता येईल. करिअरमध्ये यश मिळेल. तसेच तुमची आर्थिक स्थितीही सुधारेल. नियोजनपूर्वक प्रवास करा. दिवस रोमांचक असेल.

**कन्या :** आज तुम्हाला तुमच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. घरातील सदस्यांसोबत आणि पार्टनरसोबत वेळ घालवा. करिअरमध्ये लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे.

**तुळ :** कोणताही आर्थिक निर्णय विचारपूर्वक घ्या. आजचा दिवस उतार-चढावांनी भरलेला असू शकतो. स्पर्धेच्या कमतरतेमुळे तुमच्या कामावर परिणाम होऊ शकतो. तुमच्या उत्पन्नात वाढ होईल.

**वृश्चिक :** तुमच्या प्रेमसंबंधांना मजबूत करण्यासाठी पार्टनरसोबत मनमोकळेपणाने बोला. त्यांना पुरेसा वेळ द्या. आर्थिक स्थिती चांगली राहील, परंतु अनावश्यक खर्चांपासून दूर राहा.


**धनु :** आज तुम्हाला करिअरमध्ये नवीन संधी मिळू शकतात. प्रॉपर्टीमध्ये गुंतवणूक करणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. आज करिअरमध्ये यश मिळू शकते. आजचा दिवस सकारात्मक असणार आहे.

**मकर :** एखाद्या जवळच्या व्यक्तीकडून तुम्हाला भेट मिळण्याची शक्यता आहे. प्रॉपर्टीशी संबंधित काही चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. आपल्या वागण्यावर आणि बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**कुंभ :** ज्यामुळे आर्थिक स्थिती सुधारेल. आजचा दिवस तुमच्यासाठी रोमान्सने परिपूर्ण असेल. कोणत्याही प्रकल्पात गुंतवणूक करण्यापूर्वी अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेणे महत्त्वाचे ठरेल.

**मीन :** दिवस उतार-चढावांनी भरलेला असल्याने तुम्हाला स्वतःकडे लक्ष देण्याची गरज आहे. कामाच्या ठिकाणी तुम्हाला यश मिळेल. तुमची आर्थिक वाढ होईल. मानसिक आरोग्याची विशेष काळजी घ्या.

## शब्दकोडे क्रमांक २१७८



**आडवे शब्द :-**
१) हल्या, रेडा
३) आभाराचा एक शब्द
६) पायापासून डोक्यापर्यंत
१०) भुई
११) तापट, रागीट
१३) सडक
१४) लाकडी जिना
१५) इंद्र
१६) दिनांक
१८) माणूस
२०) शुद्ध, पवित्र
२१) लक्ष्मीचे एक नाव
२३) अभिप्राय
२४) झाडाभोवतीचा कट्टा
२५) अंकुर, मूळ
२७) कट्टर
२८) पालखीत बसण्याचा अधिकार मिळलेला
३०) भेसळ
३२) चक्र
३३) मानलेला मुलगा
३७) मऊ
३९) देवासारखा
४१) लापशी
४३) घोड्याची गाडी
४५) धैर्य
४६) पुरुष
४७) अस्ताव्यस्त पडलेले सामान,
४९) धातूचा धागा
५०) शपथ
५२) समाचार
५३) रानरेडा
५५) राहुट्या, डेरे वगैरे ठेवण्याची जागा
५६) सावली
५७) एक पालेभाजी
५८) जास्तीतजास्त
६०) विद्युल्लता
६२) कोंदणात बसविण्याचे काम
६३) कापडी बैठक, सतरंजी
६५) प्रार्थना
६७) चांदी
६९) संपूर्ण
७१) न वापरलेला, नवा
७२) चिंतन
७३) दागदागिने
७४) मळलेला

**उभे शब्द :-**
१) अणकुचीदार
२) ज्याला कशाचीही पारख करता येत नाही असा
३) श्रीमंत
४) हवेचे आच्छादन
५) धमकी
७) परीक्षा, ज्ञान
८) बंदुकीचा मागचा भाग
९) स्तोत्र
१२) जानकी
१७) अस्वल
१८) मातीचा वास येऊ लागलेला
१९) अरण्यात राहाण्याची शिक्षा
२२) पत्ता, ठिकाण
२४) पालन करणारा
२५) एक श्वासरोग
२६) स्वत:ला
२८) चार शिष्ट लोक बोलतील ते खरे (वा.प्र.)
२९) उथळ आकार
३०) सूर्याचे एक नाव
३१) सोयीचे आश्रयस्थान म्हणून स्वीकारलेला अरण्यवास
३४) मऊ
३५) पापच्या विरुद्ध
३६) आकाशयान
३८) माया, प्रेम ३९) देह
४०) पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
४२) पृथ्वी
४४) फळाचे साल
४५) सामन्यातील पराक्रमी खेळाडू
४८) संताप
५०) तापापूर्वीची पूर्वचिन्हे
५१) जिवलग मित्र
५४) वक्र
५९) मावशीच्या संबंधीचे नाते दाखविणारा शब्द
६१) काकडीची एक जात
६२) रक्षण, सांभाळ
६३) अंड्यातील पिवळा भाग
६४) पिकांवर पडणारा एक रोग
६५) विश्रांती
६६) टक्कर
६८) बस्तान
७०) हात

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



महासागर ●गुरुवार,दि.३१ जुलै २०२५

# अकोला

पान ६

# १ ऑगस्ट पासून गांधी रोडवर हॉकर्सव्दारे व्यावसाय करतांना आढळून आल्यावर कारवाई



■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य बाजारपेठेतील वाहतुकीची कोंडी व तेथील स्थायी व्यावसायिकांची गैरसोय लक्षात घेता यांच्या नियोजनार्थ दि. २९ जुलै २०२५ रोजी अकोला महानगरपालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने सांयकाळी ४ वा. पोलीस लॉन येथे जिल्हा पोलीस अधिक्षक अर्चित चांडक व मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या व्दारे मुख्य बाजार पेठेतील फेरीवाले आणि स्थायी व्यावसायिकांची विशेष बैठक घेण्यात आली आहे.

## हॉकर्स झोन मध्ये स्थलांतरीत होण्यासाठी सुचना

या बैठकीमध्ये सर्वप्रथम स्थायी व्यावसायिक आणि किरकोळ व्यावसायिकांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. तसेच त्यांच्या समस्यांचा टप्प्या टप्प्याने निराकण करण्यासाठी योवळी मनपा आयुक्त व जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी ग्वाही दिली. या बैठकीमध्ये मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांनी, फेरीवाला धोरणाची अंमल बजावणीच्या अनुषंगाने स्थानिक खुले नाट्य गृहाच्या बाजुला गांधी रोड येथील जवळपास २४० पथविक्रेत्यांकरिता हॉकर्स झोनची निर्मिती करण्यात आली असून यामध्ये गांधी रोड वरील सर्व किरकोळ व्यावसायिकांनी दोन दिवसाच्या आत हॉकर्स झोन मध्ये स्थलांतरीत होण्यासाठी सुचना केल्या व दोन दिवसात त्यांना त्या ठिकाणी लागणा-या सोई-सुविधा मनपा प्रशासनातर्फे पुरविण्यात येणार असल्याबाबत सांगितले.

# किराणा दुकानात चोरी, दोन मोटारसायकली लंपास

■पातूर,दि ३० (प्रतिनिधी) :

चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत सस्ती येथे अज्ञात चोरट्यांनी रात्रभर धुमाकूळ घातल्याची घटना २८ जुलै रोजीच्या सकाळी उघडकीस आल्याने गावासह परिसरात खळबळ उडाली. रविवारी मध्यरात्री सस्ती येथे अरविंद शेळके यांच्या किराणा दुकानातून काजू, बदाम इतर किराणा सामान व रोख तसेच अमर खडके, रोहित इंगळे या दोघांच्या दोन मोटरसायकली लंपास केल्या तसेच सदाशिव शेळके, काशिनाथ नवले, यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी प्रवेश केला, मात्र चोरीचा प्रयन्न अयशस्वी ठरला, चोरट्यांनी रात्रभर धुमाकूळ केल्याने गावात दहशतीचे वातावरण पसरले आहे.

रविवारी मध्यरात्री तीन वाजताच्या सुमरास अज्ञात चोरटे चार मोटरसायकलीवर जात असताना सीसीटीव्ही कॅमेरे मध्ये कैद झाले. याप्रकरणी चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे यांनी आपल्या ताफ्यासह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आणि अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, तपासाची प्रक्रिया सुरू केली आहे.

# हिवरखेडमध्ये नागपंचमी पाटलीची मिरवणूक



■हिवरखेड,दि ३० (प्रतिनिधी) :

येथे सनातन धर्माला अनुसरुन भवानी मंदीर चंडिका मंदीर गणेश वाकोडे कडील नागदेवता मदींरातिल प्रत्येक पाटलीवर नागदेवतेचे पाच नागाचे कोरीव काम केलेले नागाचे पाटल्या आहेत त्यात सकाळी घरोघरी ज्वारीचे लाह्या फुटाने नारळाचा प्रसाद म्हणून नागदेवतेला प्रसन्न केल्या जाते महिला व पुरुष वर्ग नांगदेवता मंदीरात आपल्या बालगोपाला सहीत दर्शनाला जातात आजच्या दिवशी रीतिरीवाजाप्रमाने तव्यावरले अन्न सहसा कुन्याच घरी बनत नाही. सर्व घरातील मानसाठी पुरी भाजी शिरा बेसन लाडु मिस्टानाचे जेवन होते दूपारी भवानी मदींर मधील दोन नागदेवतेच्या भगत असलेले पांडुरंग गावडे व नागेश गावंडे हे नागदेवतेचे अरबडे यांचे जवळ नागोबा पाटली तसेच चंडीका मंदीर ची पाटली हभप अनत रेखाते साधूबुवा यांचे जवळ असे वाजत गाजत ढोल ताशे बॅड पथकासह गावातुन मिरवनूकीने निघून मंदीरात वापस जातात तिथे रात्रीला ताब्यांचे गूंड ,कोपर व पंचधातुचे कडे च्या तालावर ठावा म्हनून नागदेवतेची भंजने गायली जातातत पाच दिवस चालनारे नागपंचमीला अरबडेच्या भजंनाने भजनाच्या बाया गायील्या जातात

# ‘आपदा मित्र‘ योजनेअंतर्गत ल.रा.तो. च्या एन.सी.सी. कॅडेट्सनी घेतले आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

■अकोला,दि ३०(प्रतिनिधी) :

राज्य आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ‘आपदा मित्र‘ योजनेअंतर्गत अकोल्यातील श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिसन तोष्णीवाल वाणिज्य महाविद्यालयातील एन.सी.सी. कॅडेट्सनी आपत्ती व्यवस्थापनाचे सखोल प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. हे प्रशिक्षण डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कृषक भवन येथे पार पडले. अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कॅडेट्स ला पूर, भूकंप, वादळ, आगीच्या घटना अशा आपत्कालीन परिस्थितीत मदत कार्य कसे करावे याचे तांत्रिक व व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान एन.डी.आर.एफ. च्या तज्ज्ञांनी महापूर, बोटिंग, बचावकार्य आणि प्रथमोपचार यावर



प्रात्यक्षिकांसह सविस्तर माहिती दिली. सहभागी कॅडेट्सला आपत्कालीन प्रत्युत्तर किट आणि ५ लाख रुपयांचे विमा सुरक्षा कवच देण्यात आले. या प्रशिक्षणात ल.रा. तो. महाविद्यालयातील आदित्य ब्रम्हदेव टाले, नितीक्षा लक्ष्मीप्रसाद पांडे, तृष्णा संतोष सिंग, पल्लवी संदीप शिरसाट, जान्हवी गणेश पारसकर, तृप्ती साहेबराव कोरडे, ऐश्वर्या प्रकाश खंडागळे व दिव्या संदीप बावस्कर यांनी सहभाग घेतला. कॅडेट्सच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाणे, आय. क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. योगेश अग्रवाल, व्यवस्थापन अभ्यासक्रम समन्वयक डॉ. वर्षा सुखदेवे व एन.सी.सी. अधिकारी कॅप्टन डॉ. अनिल तिरकर यांनी सत्कार केला.

# शहरात नागपंचमी उत्साहात साजरी

**अकोला :** भारतीय संस्कृतीत सापाला पूजनीय स्थान आहे श्रावण महिन्यात येणाऱ्या नागपंचमीला सर्वत्र सापांचे पूजन करण्याची मोठी परंपरा आहे साप शेतकऱ्यांचा मित्र मानला जातो पिकाचे नुकसान करणाऱ्या उंदीर आणि घुशींचा साप शिकार करतो, भय आणि अंधविश्वासामुळे मनुष्य सापांना आपला शत्रू समजतात त्यामुळे अनेक जण गैरविषारी सापांना सुद्धा मारतात यामुळे निसर्गाचे मोठे नुकसान होत आहे परंतु आता सापां बाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती होत असल्याने सापांचे रक्षण होत आहे शहरातील सर्वच नाग मंदिरात तसेच ज्या ठिकाणी सापांचे वारूळ आहे .



## निधन वार्ता

### रमेश पुंडकर



**अकोला :** स्थानिक सुधीर कॉलनी अकोला येथील रहिवासी तथा चार्टर्ड अकाउंटंट निलेश पुंडकर यांचे वडील रमेश सुखदेवराव पुंडकर यांचे नुकतेच निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्षाचे होते. खेडकर नगर अकोला येथील श्रीकृष्ण मंदिर ट्रस्ट व शहरातील प्रख्यात बारा ज्योतिर्लिंग मंदिर आरती मंडळाचे ते सदस्य होते. त्यांचे मूळ गाव अकोट तालुक्यातील पुंडा येथे त्यांचे वर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे व बराच मोठा आप्त परिवार आहे.

# अ.भा.माळी महासंघ तेल्हाराकडून प्राविण्य प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न



■तेल्हारा,दि ३० (प्रतिनिधी) :

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भागवत मंगल कार्यालय तेल्हारा येथे तालुक्यातील माळी समाजातील इयत्ता दहावी व बारावीतील प्राविण्य प्राप्त व इतरही क्षेत्रात विशेष नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा थाटात संपन्न झाला.यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांकडून सावित्रीबाई फुले,ज्योतिबा फुले व संत सावता महाराज यांची प्रतिमा व पुष्पगुच्छ भेट म्हणून देण्यात येऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अ.भा.माळी महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुभाष सातव,स्वागताध्यक्ष म्हणून जि.प.अकोलाच्या मा.अध्यक्षा संगीताताई नंदकिशोर अढाऊ तर प्रमुख पाहुणे म्हणून बळीराम शिरस्कार मा.आमदार बाळापूर, प्रवीण लोखंडे जिल्हा उपनिबंधक अधिकारी अकोला, प्रमोद उलेमाले साहेब ठाणेदार तेल्हारा, प्रकाश तायडे महासचिव राष्ट्रीय कॉंग्रेस कमिटी, संतोष हुसे ओबीसी नेते, शंकरराव गिरे समाजभूषण, उमेश मसने कार्याध्यक्ष समता परिषद, अनिल गिरे शेगाव मेळावा कार्याध्यक्ष,गणेश काळपांडे प्रदेशाध्यक्ष, प्रकाश दाते जिल्हाध्यक्ष उपस्थित होते.

## स्वातंत्र्यदिनाचा सोहळा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात

**अकोला :** स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहणाचा मुख्य सोहळा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०५ वा. आयोजिण्यात आला आहे. सोहळ्याच्या अनुषंगाने आवश्यक तयारी व कार्यवाही सर्व विभागांनी समन्वयाने करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत स्वातंत्र्यदिन पूर्वतयारीची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील व सर्व यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.सोहळ्याच्या अनुषंगाने इमारत स्वच्छता, सजावट, रोषणाई, पारितोषिक वितरण, कायदा व सुव्यवस्था आदी विविध बाबींविषयी बैठकीत चर्चा करण्यात आली.

# अकोला गार्डन कल्ब तर्फे शेवंती लागवडी संदर्भात कार्यशाळा संपन्न



■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

पर्यावरणाचा व आरोग्याचा समतोल साधणे व सर्वसामान्यांमध्ये झाडाफुलांची आवड निर्माण करणे याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने अकोला गार्डन क्लब तर्फे शहरात दरवर्षी विविध ठिकाणी वृक्षारोपण, वृक्षसंवर्धनाची मोहीम राबविली जाते. तसेच सर्वांना उपयुक्त अशा कार्यशाळेचे सुद्धा आयोजन केले जाते. अशीच एक कार्यशाळा नुकतीच शेवंती लागवडी संदर्भात संपन्न झाली. सदरहु कार्यशाळेमध्ये मध्ये शेवंती, व गुलाब लागवड, निगा, जोपासना, परसबाग निर्मिती, कमळ लागवड व जोपासना, अँडेनियम, बोन्साय, कॅंक्टस निर्मिती व जोपासना, औषधी वनस्पतींची लागवड व जोपासना, हे महत्वाचे विषय समाविष्ट असतात .

सबंधित कार्यशाळेचे विषयतज्ञ उपरोक्त विषयांवर प्रात्यक्षिकांसह उपस्थितांना सविस्तर योग्य व संयुक्तिक मार्गदर्शन करतात. अकोला शहर व नजिकच्या परिसरातील नागरिकांकरिता नुकतीच विषयतज्ञ श्रीकांत कोंडोलीकर यांच्यामार्फत शेवंती लागवड निगा व जोपासना या विषयावरील कार्यशाळा संपन्न झाली.

# अकोला संस्कार भारतीचा संस्कार मित्र व कलावंत मेळावा संपन्न

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

अकोला महानगर संस्कार भारती च्या वतीने स्थानिक आर एल टी महाविद्यालयाच्या सभागृहात अकोला जिल्ह्यातील संस्कार मित्र व कलावंत मेळावा उत्साहात साजरा झाला. रविवारी संपन्न झालेल्या या कार्यक्रमात नागपूरचे संस्कार भारतीचे विदर्भ प्रांत अध्यक्ष वीरेन चांडक,कार्यक्रमाचे उद्घाटक विदर्भ प्रांत उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, प्रमुख वक्ते विदर्भ प्रांत कार्याध्यक्ष सुधाकर अंबुसकर,अकोला जिल्हा अध्यक्षा सौ चंदा जयस्वाल, अकोला महानगर अध्यक्ष डॉ राजकुमार हेडा, महानगर मंत्री महेश मोडक, प्राचार्य डॉ चंद्रवंशी विराजमान होते. कार्यक्रमाचा प्रारंभ संस्कार भारतीचे प्रांत नाट्यविभाग प्रमुख अशोक ढेरे यांच्या निवेदनाने झाला.दीप प्रज्वलन व नटराज पूजन नंतर ,ध्येय गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.



मान्यवरांचे स्वागत शाल, श्रीफळ देऊन करण्यात आले. प्रास्ताविक प्रांत जिल्हाप्रमुख निनाद कुलकर्णी यांनी केले. आजच्या पाश्चात्य संस्कृतीच्या अनुकरणात भारतीय संस्कृतीचे हनन पाहता, संस्कृती चे जतन करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

संस्कार आणि संस्कृती कलेच्या माध्यमातून संपूर्ण देशात रुजवण्याचे कार्य संस्कार भारती करीत आहे असे प्रस्ताविकात कुलकर्णी म्हणाले. महानगर अध्यक्ष डॉ. हेडा यांनी आपल्या भाषणातून संस्कृती जतन करण्याची कळकळ व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. नाना भडके यांनी केले.कार्यक्रमात जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी भेट दिली. जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी जिल्हा संगीत विभाग प्रमुख किसन जयस्वाल,जिल्हा कोषा प्रमुख अविनाश परळीकर,सौ आशाताई खोकले, सौ डॉ वासंती थोते,भाऊलाल देवतवाल आदि उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in my son Passport No is K3567866

----From-----

**KAVITA RAMCHANDRA PARWANI**

------TO-------

**KAVITA RAMKUMAR PARWANI**

My Residential Address is - Near Gurunanak Mandir Sindhi Camp Akot Akola 444101.

**CHANGE OF NAME**

I, **INDUBAI**, spouse of No. 4544233H RANK - EX-NK Name : **MAHADEO JANUJI PATKE**. Resident at Somwar ves, chambhor wadi, Akot, Tehsil, Akot, District - Akola (Maharashtra) 444101 Hereby declared that I have change my name from **INDUBAI** to **INDUBAI MAHADEO PATKE**. My date of birth is **07/12/1960** Vide affidavit before Executive magistrate, Akot, District - Akola

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in my son Passport No is K3567866

----From-----

**RAMCHANDRA SAWALDAS PARWANI**

------TO-------

**RAMKUMAR SAWALDAS PARWANI**

My Residential Address is - Near Gurunanak Mandir Sindhi Camp Akot Akola 444101.

**नाम में बदलाव**

मैं **INDUBAI** मैं पत्नी आर्मी संख्या **4544233H** रैंक **EX-NK** नाम : - **MAHADEO JANUJI PATKE**, निवासी : सोमवार वेस चांभार वाडी, अकोट तहसील : अकोट, जिल्हा - अकोला (महाराष्ट्र) ४४४१०१, मैं घोषित करती हूं कि मेरे पति के आर्मी रिकॉर्ड में मेरा नाम **INDUBAI** यह अधूरा दर्ज हुआ है. मेरा पूरा नाम **INDUBAI MAHADEO PATKE** यह है और मेरी जन्म तारीख : ०७/१२/१९६० यह है. (तहसीलदार अकोट, जिला - अकोला के समक्ष अफिडेविट)

# लोकस्वातंत्र्य म्हणजे खऱ्या कर्तृत्वाने राज्याबाहेर जाऊन पोहचलेला पत्रकार महासंघ : पुष्पराज गावंडे

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

पत्रकार आणि सामाजिक कल्याणाचा एकच ध्यास घेऊन संघर्षक चळवळीतील खऱ्या कर्तृत्वाने महाराष्ट्रभर संघटन आणि पाच राज्याम ध्ये पोहचलेली लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ ही समाजाभिमुख राष्ट्रीय संघटना आहे.पत्रकार आणि साहित्यिक ह्या एक नाण्याच्या दोन बाजू आहेत.त्यानुसार प्रत्येक राष्ट्रीय पदाधिकाऱ्याला मासिक कार्यक्रमाचे अध्यक्षपद देण्याच्या संघटना अध्यक्षांच्या सन्मानजनक समतावादी निर्णयानुसार एका साहित्यिकाला पत्रकार महासंघाचं अध्यक्षपद देण्यात आलं. असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या साहित्य व संस्कृती मंडळाचे माजी सदस्य व याच पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय पदाधिकारी कादंबरीकार पुष्पराज गावंडे यांनी व्यक्त केले. संघटनेचा ४७ वा मासिक विचारमंथन मेळावा गावंडे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.त्यावेळी ते बोलत होते.

पत्रकार महासंघासोबत गेल्या १० वर्षापासून गरीबांसाठी मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहिम राबवणाऱ्या दमाणी नेत्र रूग्णालयाचे संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सभापती शुक्ल हे पुरस्कारार्थी व प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.खामगावचे ज्येष्ठ पत्रकार,युवा दर्शन संपादक जगदिश अग्रवाल तथा डॉ.मनिष हर्षे यांचा सुध्दा प्रमुख अतिथींमध्ये समावेश होता.तर व्यासपीठावर लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे संस्थापक- राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम.देशमुख व जिल्हा सचिव मनोहर मोहोड यांची उपस्थिती होती. सभापती शुक्ल यांनी मोतीबिंदू शस्त्रक्रियेतून दृष्टीदानाच्या मानवसेवी कार्यासाठी पत्रकार महासंघाला जास्तीत जास्त सहकार्य करण्याचे आश्वासन देऊन पुरस्काराच्या सन्मानजनक भावनांबध्दल आभार व्यक्त केले.

## थोडक्यात

### धागा शौर्य का राखी अभियान कुरणखेड येथील राखी जाणआर सीमेवर

**कुरणखेड :** रक्षाबंधन निमित्त धागा शौर्य का राखी अभियान कुरणखेड येथे स्थानिक आमदार आणि पोलीस अधीक्षकांसह अभिनव अनेकांच्या उपस्थितीत उपक्रमाला अनेक नागरिक उपस्थित राहणार आहेत. सीमेवर भारतमातेची अहोरात्र सेवा करणारे भारतीय सैनिकांप्रती आपुलकी, आदरभाव प्रत्येकाच्या मनात निर्माण व्हावा, या हेतूने कुरणखेड येथे वीर भगतसिंग आपत्कालीन शोध व बचाव पथकातर्फे दरवर्षी 'धागा शौर्य का' राखी अभियान राबविले जाते. या कार्यक्रमाचे आयोजन १ ऑगस्ट रोजी गजानन महाराज विद्यालय कुरणखेड येथे दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमातून गावातील विद्यार्थी यांच्या माध्यमातून गोळा महिला, शाळेमधील केलेल्या राखी पोस्टामार्फत सीमेवरील सैनिकांपर्यंत पोहोचणार आहे. तेथे रक्षाबंधनच्या दिवशी रक्षाबंधन उत्सव संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार हरीश पिंपळे, अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, खदान पोलीस स्टेशन ठाणेदार मनोज केदारे, समाजसेविका कमलजीत कौर, युवा समाजसेवक केल्विन सुबि माजी पंचायत समिती सदस्य प्रशांत पांडे, भाजपा मूर्तिजापूर मंडळ अध्यक्ष प्रशांत ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन समाजसेवक तथा वीर भगतसिंग आपत्कालीन बचाव पथकाचे योगेश विजयकर यांच्या टीम च्यावतीने करण्यात आले आहे.

### यशस्वी उद्योजकांचा केला सत्कार

**बोरगाव मंजू :** ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार आणि सेंट्रल बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था अकोला यांच्या विद्यमाने ग्रामीण विभागातील बेरोजगारांना विविध विषयांवर प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाचा फायदा म्हणजे आपल्या रोजगारात वाढ करून आपल्या कौशल्याचा उपयोग व्यवसायात करून घेण्यासाठी मोलाचे ठरते. त्यापैकीच गेल्या आर्थिक वर्षातील काही निवडक प्रशिक्षणार्थी जे आज विविध क्षेत्रात आपला व्यवसाय सुरू करून आज यशस्वी उद्योजक म्हणून कार्य करीत आहेत, असे आशिष इंगळे, आशा जांभे, उमा खैरे यांचा सत्कार यशस्वी उद्योजक म्हणून करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख उद्योजक गणेश काळे यांची उपस्थिती होती.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# निरामय

# कोलेस्टेरॉल: सायलेंट किलर!

आरोग्य विकार
डॉ. दिलीप शिरसाट


कोलेस्टेरॉल 'सायलेंट किलर' सारखे काम करते. त्याची लक्षणे वेळीच ओळखली गेली नाहीत तर याचा आरोग्यावर गंभीर परिणाम होत असतो. यामुळे हृदयरोग आणि हृदयिवाकाराचा झटका येऊ शकतो.

आजची बदलती जीवनशैली, फास्ट फूड आणि व्यायामाचा अभाव यामुळे लोकांमध्ये उच्च कोलेस्टेरॉलसारख्या समस्या अधिक प्रमाणात दिसून येतात. कोलेस्टेरॉलची रक्त तपासणी किंवा 'लिपिड प्रोफाइल' या टेस्टद्वारे रक्तातील चांगल्या आणि खराब कोलेस्टेरॉलचे प्रमाण कळते. परंतु टेस्टशिवायदेखील कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढल्याचे समजू शकते. कोलेस्टेरॉल वाढते तेव्हा डोळ्यांभोवती पिवळे ठिपके (झेंथेलास्मा) दिसू लागतात. त्वचेवर दिसणारे फॅटचे छोटे साठे वाढलेल्या कोलेस्ट्रॉलचे लक्षण आहे.

डोळ्यांच्या कॉर्निया (काळ्या बाहुली) भोवती तयार होणाऱ्या पांढऱ्या किंवा हलक्या राखाडी रंगाच्या वर्तुळाला 'आर्कस सेनिलिस' म्हणतात. ही लक्षणे तुमच्यामध्ये दिसून येत असतील तर शरीरात कोलेस्टेरॉल वाढले आहे, असे समजावे.

**चालताना छातीत दुखणे**

हलके चालल्यानंतर किंवा थोड्या पायऱ्या चढूनही छातीत जडपणा किंवा वेदना जाणवत असतील तर




हे हृदयापर्यंत पुरेसे रक्त पोहोचत नसल्याचे लक्षण असू शकते. ते ब्लॉकेज आणि उच्च कोलेस्ट्रॉलमुळे असू शकते.

**श्वास घेण्यास त्रास**

काही छोटी कामे केल्यावर लगेच थकवा जाणवत असेल किंवा श्वास घेण्यास त्रास होत असेल तर हे शरीरातील ऑक्सिजन पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे लक्षण असू शकते. ते कोलेस्टेरॉलशी संबंधित रक्तवाहिन्यांमधील ब्लॉकेजमुळे होऊ शकते. अशा परिस्थितीत ताबडतोब स्वतःची तपासणी करून घ्यावी.

**बोटांचा आणि पायांचा रंग निळा होणे**

कोलेस्टेरॉलमुळे रक्तवाहिन्या अरुंद होतात. त्यामुळे शरीराच्या अवयवांना रक्तपुरवठा योग्यरित्या होत नाही. बोटांना आणि पायांना वारंवार निळे ठिपके पडत असतील किंवा थंड वाटत असेल तर ते कोलेस्टेरॉल वाढल्याचे एक कारण असू शकते.

# चिंता आणि निद्राविकार

जाणून घ्या
डॉ. महेश दळे



दिवसभर धावपळ केल्यानंतर आपण विश्रांतीच्या शोधात बेडवर पोहोचतो, पण इथे आपण झोपेच्या अपेक्षेने या कुशीवरून त्या कुशीवर होत राहतो. तास न् तास बेडवर पडूनही आपल्याला झोप येत नाही. हे झोपेच्या विकाराचे लक्षण असू शकते.

तासन् तास बेडवर पडल्यानंतरही पापण्या लुकलुकत नाहीत. डोळे बंद झाले तरी काही वेळाने ते उघडतात. झोपेच्या विकाराच्या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी जीवनशैलीत बदल करावे लागतात. या झोपेच्या विकारांमुळे रात्रीची झोप हिरावून घेतली जाते

**निद्रानाश :** रात्रीची झोप हिरावून घेणारा हा मुख्य झोपेचा विकार आहे. याचे दोन प्रकार आहेत. प्रथम, दीर्घकालीन निद्रानाशात एक महिना किंवा त्याहून अधिक काळ झोपेची समस्या असते. तुम्ही रात्री बेडवर कुशी बदलत राहता. दिवसा तुम्हाला थकवा जाणवतो. दीर्घकालीन निद्रानाशात अशी लक्षणे दिसून येतात. त्याच वेळी तीव्र निद्रानाशाची स्थिती काही दिवस किंवा आठवडे टिकू शकते. व्यस्त जीवनशैली, ताणतणाव, चिंता इत्यादी कारणे यामागे असू शकतात.

**स्लीप ॲप्निया :** स्लीप ॲप्निया मध्ये झोपेच्या दरम्यान वारंवार श्वास थांबतो. यामुळे डोळे अचानक उघडतात. यामुळे शांत झोप येत नाही. झोपेचा त्रास होत राहतो. ही समस्या प्रामुख्याने अति लठ्ठ आणि श्वसनाची समस्या असलेल्या रुग्णांना त्रास देते. अशा परिस्थितीत दिवसा जास्त झोप येणे, थकवा, डोकेदुखी आणि एकाग्रतेचा अभाव यासारखी लक्षणे दिसू शकतात.

**अस्वस्थ पाय सिंड्रोम**

अस्वस्थ पाय सिंड्रोममध्ये, पायात जळजळ किंवा मुंग्या येणे जाणवते. यात पाय हलवून आराम मिळतो. झोपताना व्यक्तीला ही समस्या जास्त होते. त्यामुळे रात्रीची झोप बिघडते. या समस्येपासून कायमचा आराम मिळू शकत नाही, परंतु त्यावर नियंत्रण ठेवता येते. त्यामुळे झोपेची समस्या बऱ्याच प्रमाणात दूर होऊ शकते. उपचारानंतर रात्रीही योग्य झोप घेता येते.

# पाय थंड पडतात?

आरोग्य वेध
डॉ.अमोल नाईकवाडे



पाय अनेकदा इतके थंड होतात की त्यांचा स्पर्श बर्फासारखा वाटतो. उन्हाळा असो वा हिवाळा, पाय नेहमीच थंड राहिले तर त्याकडे दुर्लक्ष करणे चूक ठरू शकते. बरेचदा लोक रक्ताभिसरण मंदावले असावे किंवा थंड वारा असावा, असा विचार करू लागतात. परंतु प्रत्यक्षात ते शरीरातील एखाद्या लपलेल्या आजाराचे लक्षणदेखील असू शकते.

तुमचे पाय बराच काळ थंड राहिले तर ते मज्जातंतूंच्या समस्या, रक्ताभिसरणात अडथळा किंवा थायरॉईडसारख्या हार्मोनल असंतुलनाचे लक्षण असू शकते. ही स्थिती सहसा हृदयाशी संबंधित आजार, उच्च कोलेस्ट्रॉल किंवा रक्तवेहिन्यांमध्ये अडथळा यामुळे निर्माण होते. यात पायांमध्ये मुंग्या येणे, पाय सुन्न होणे, चालताना थकवा येणे किंवा वेदना होणे ही लक्षणे जाणवतात. परिघीय न्यूरोपॅथी ही स्थिती प्रामुख्याने मधुमेहाशी संबंधित आहे. यात पायांच्या नसा खराब होतात आणि पाय थंड पडतात, जळजळ होते किंवा सुन्न होतात. हायपोथायरॉईडीझममध्ये थायरॉईड ग्रंथी पुरेसे हार्मोन्स तयार करत नसल्यास शरीराच्या तापमान नियंत्रणावर परिणाम होतो. यामुळे हात आणि पाय थंड राहतात. यात वारंवार थंडी जाणवणे, थकवा, वजन वाढणे, केस गळणे, कोरडी त्वचा ही लक्षणे दिसून येतात. रेनॉड्स सिंड्रोम ही एक ऑटोइम्यून डिसऑर्डर आहे. यात थंडी किंवा ताणतणावात बोटांच्या आणि पायांच्या रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. यामुळे पाय बर्फासारखे थंड होतात. पायांचा निळा किंवा पिवळा रंग, मुंग्या येणे किंवा बधीर होणे, थंडी जाणवण्यावर गंभीर परिणाम, पाय थंड होणे ही केवळ हवामानाशी संबंधित लक्षणे नाहीत तर ती तुमच्या शरीरात सुरू असलेल्या काही गंभीर विकाराचे लक्षण असू शकते.

# हात नीट धुवा!

कुठे चुकतो आपण?

हात धुणं ही खरं तर सर्वसामान्य बाब. याकडे फारसं लक्ष दिलं जात नाही. हातांना थोडा साबण लावला आणि पाण्याने धुतलं की झालं, असं अनेकांना वाटतं. पण प्रत्यक्षात आपल्या हातांवर असंख्य जीवाणूंचा वास असतो. हे जीवाणू शरीरात गेल्यामुळे आपण आजारी पडू शकतो. आपण बरेचदा चुकीच्या पद्धतींनी हात धुतो. त्याविषयी...

* हातांवरचे जीवाणू नष्ट करण्यासाठी कमीत कमी मिनिटभर हात धुवावे लागतात. पण जवळपास ९५ टक्के लोक हात धुण्यात फार वेळ घालवत नाहीत, असं मिशिगन विद्यापीठाने केलेल्या एका संशोधनातून समोर आलं आहे. जीवाणू नष्ट करण्यासाठी किमान २० सेकंद हात धुणं गरजेचं असतं, असं तज्ज्ञ सांगतात. पण हात धुण्याचा सरासरी वेळ फक्त सहा सेकंद असल्याची बाब समोर आली आहे.



* फक्त हातांच्या तळव्यांवर साबण लावणं पुरेसं नाही. नखं आणि बोटांवरच्या रेषांमध्ये तसंच दोन बोटांच्या पोकळ्यांमध्येही जीवाणू दडलेले असतात. त्यामुळे हात धुताना बोटांच्या मधला भागही स्वच्छ करा.

* हात धुतल्यानंतर पुसायला हवेत. ओल्या हातांवर बॅक्टेरिया वाढू शकतात. जंतूंना वाढीसाठी ओलसर, आर्द्र वातावरण लागतं. त्यामुळे नीट हात धुतल्यानंतर पुसले नाहीत तर काहीच फायदा होणार नाही.

* सार्वजनिक ठिकाणी जंतूंचा वास असतो. त्यामुळे लिफ्टचे दरवाजे, दाराचं हँडल, बाक, टेबल अशा कोणत्याही वस्तूला हात लावल्यानंतर हात धुवायला हवेत. काहीजण फक्त स्वच्छतागृहांचा वापर केल्यावर हात धुतात. पण हे चुकीचं आहे.

# डायबेटिक फूटविषयी...

काळजी घ्या



मधुमेहामुळे शरीरात बरीच गुंतागुंत निर्माण होऊ शकते. म्हणूनच रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवणं गरजेचं असतं. मधुमेहामुळे पायांशी संबंधित समस्या निर्माण होतात. रक्तातल्या साखरेच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवलं नाही तर डायबेटिक फूट ही व्याधी जडू शकते. पायांमधल्या संवेदना हरवणं, पायाच्या त्वचेचा रंग बदलणं, पायांमध्ये वेदना जाणवणं, त्वचा लाल होणं ही या विकाराची लक्षणं आहेत. म्हणूनच भविष्यातली गुंतागुंत टाळण्यासाठी मधुमेहींनी पायाशी संबंधित या लक्षणांकडे विशेष लक्ष द्यायला हवं. डायबेटिक फूटची काळजी कशी घ्यावी याविषयी...

डायबेटिक फूटचे दोन प्रकार आहेत. 'डायबेटिक न्यूरोपॅथी' आणि 'पेरिफेरल व्हॅस्क्युलर डिसिज' रक्तातल्या अनियंत्रित साखरेमुळे नसांना नुकसान पोहोचवतं. यामुळे पाय लुळे पडल्यासारखे वाटतात. परिणामी, मधुमेहींना पायात संवेदना जाणवत नाहीत. संवेदनांअभावी दुखापतींचा धोका वाढतो. दुखापतीची जाणीव झाली नाही तर गुंतागुंत वाढून गँगरीन होऊ शकतं. मधुमेहामुळे रक्तवाहिन्यांमध्येही बदल घडतात. रक्तवाहिन्यांमध्ये चरबीयुक्त पदार्थ साठल्यामुळे हातापायांना कमी प्रमाणात रक्तपुरवठा होतो. यामुळे जंतूसंसर्ग, वेदना आणि जखमा होऊ शकतात. कमी रक्तपुरवठ्यामुळे जखमा बऱ्या व्हायला वेळ लागतो.

भारतातल्या १५ टक्के मधुमेहींना पेरिफेरल व्हॅस्क्युलर डिसिज असतो, असं तज्ज्ञ सांगतात. यात कोलेस्टरॉल आणि रक्तातल्या साखरेच्या अतिरिक्त पातळीमुळे पायांना कमी रक्तपुरवठा होतो. परिणामी, गँगरिन होऊ शकतं. म्हणूनच मधुमेहींनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी. डायबेटिक फूटचा धोका टाळण्यासाठी काही प्रतिबंधात्मक उपाय करता येतील. मधुमेहींनी अनवाणी चालू नये. पायांची नियमित तपासणी करावी. कोणतीही जखम, फोड आढळल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. मधुमेहींसाठी योग्य अशा पादत्राणांचा वापर करावा. जखम झालेल्या पायावर फार दबाव टाकू नये. अधिक काळपर्यंत मांडी घालून बसू नये. प्रवासात पादत्राणं काढू नयेत.

# दुष्परिणाम प्रथिनांच्या अतिरेकाचे

काय खावं?

प्रथिनांमुळे चयापचय क्रियेचा वेग वाढतो आणि वजन कमी व्हायला मदत होते. मात्र कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच असतो. त्यामुळे प्रथिनांच्या अतिसेवनाचेही काही दुष्परिणाम आहेत. याविषयी जाणून घेऊ.




* प्रथिनांचा अतिरेक तुमचं वजन वाढवू शकतो. त्यामुळे वजन कमी करायचं असेल तर प्रथिनांचं नेमकं प्रमाण ठरवायला हवं. अन्यथा, वजनवाढीच्या समस्येला सामोरं जावं लागेल.

* प्रथिनांच्या अतिरेकामुळे पचनसंस्थेशी संबंधित समस्या निर्माण होऊ शकतात. बद्धकोष्ठता, पोटफुगी अशा समस्या निर्माण होऊ शकतात. प्रथिनांच्या समावेशामुळे आहाराला जडत्व येतं. यामुळे अन्नाचं पचन होण्यात अडचणी निर्माण होतात.

* गरजेपेक्षा अधिक प्रथिनं खाल्ल्यामुळे डिहायड्रेशनची समस्या निर्माण होऊ शकते. खूप तहान लागणं हे डिहायड्रेशनचं लक्षण आहे.

* प्रथिनांचा अतिरेक मूत्रपिंडांचं आरोग्य बिघडवू शकतो. शरीरातला अतिरिक्त नायट्रोजन तसंच इतर टाकाऊ पदार्थ वेगळे करण्यासाठी मूत्रपिंडांवर अधिक ताण येतो. परिणामी, मूत्रपिंडांच्या कार्यात अडथळे येतात. त्यामुळे प्रथिनांचं प्रमाण मर्यादित ठेवायला हवं.

# जीवघेणी बैठी जीवनशैली

आरोग्य चर्चा
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे



विसाव्या शतकात धूम्रपान हा सार्वजनिक आरोग्याचा सर्वात मोठा शत्रू ठरला होता. आजच्या काळात मात्र बैठी जीवनशैली हे दीर्घकालीन आजाराचे आणि अकाली मृत्यूचे एक प्रमुख कारण झाले आहे.

अलीकडेच या संदर्भात दहा लाखांहून अधिक लोकांचा अभ्यास करण्यात आला होता. दिवसभरात आठ तासांपेक्षा अधिक वेळ बसून राहणे आणि त्याची भरपाई करणारी कोणतीही शारीरिक हालचाल न करणे यामुळे निर्माण होणारा धोका हा लठ्ठपणा आणि धूम्रपानाइतकाच जीवघेणा असतो, असे या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. खरे तर सतत एका जागी बसून राहणाऱ्यांना नियमित हालचाल करणाऱ्यांच्या तुलनेत हृदयविकार आणि कर्करोग होण्याचा धोका लक्षणीयरीत्या जास्त असतो.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार सध्या जगभरातील सुमारे १.८ अब्ज प्रौढांमध्ये शारीरिक हालचालींचा अभाव आहे. त्यामुळे त्यांना हृदयविकार, स्ट्रोक, टाइप २ मधुमेह आणि काही प्रकारच्या कर्करोगांचा धोका अधिक आहे. उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये ही समस्या अधिक गंभीर झाली आहे. ऑफिसमध्ये बसून करावी लागणारी नोकरी आणि डिजिटल करमणुकीच्या सवयींमुळे ही प्रवृत्ती वाढत चालली आहे. अमेरिकेत दर चारपैकी एक व्यक्ती दररोज आठ तासांपेक्षा जास्त वेळ बसून घालवते. आरोग्यशास्त्राचा विचार करता हे प्रमाण सामान्य प्रमाणाच्या खूप जास्त आहे.

तुम्ही सतत बसून राहता तेव्हा शरीरातील मोठे स्नायू जणू काही काम करायचे थांबवतात. यामुळे अवघ्या अर्ध्या तासात शरीराची चयापचय क्रिया सुमारे ९० टक्क्यापर्यंत मंदावते. स्नायूंच्या हालचाली कमी झाल्यामुळे शरीरात साखरेचे नियंत्रण बिघडते. रक्तातील साखर वाढते आणि कोलेस्ट्रॉलसारख्या घटकांचा समतोल बिघडतो. ही सगळी लक्षणे म्हणजे 'मेटॅबॉलिक सिंड्रोम'ची सुरुवात असते. यात रक्तवाहिन्यांमध्ये प्लाक साचण्याची प्रक्रिया अधिक वेगाने घडून येते.

दीर्घकाळ हालचाल न केल्यामुळे रक्ताभिसरण मंदावते. त्यामुळे फॅटी ॲसिड्स आणि लिपिड्स हे घटक रक्तवाहिन्यांच्या आंतरपटलांवर साचू लागतात. कालांतराने यामुळे ॲथेरोस्क्लेरोसिस म्हणजेच रक्तवाहिन्यांमध्ये चरबीचे थर तयार होऊ लागतात. परिणामी कोरोनरी आर्टरीज अरुंद होतात आणि हृदयविकाराचा धोका वाढतो.

सतत एका जागी बसून राहण्याच्या सवयीमुळे हृदयविकाराचा धोका सुमारे ३४ टक्क्यांनी वाढतो, असेही विविध लोकसमूहांवर केलेल्या एका मोठ्या अभ्यासात दिसून आले आहे.

दररोज ६० ते ७५ मिनिटे एरोबिक व्यायाम केला तर सतत बैठ्या जीवनशैलीचे घातक परिणाम बऱ्याच अंशी टाळता येतात. पण बहुतेक प्रौढ या पातळीपर्यंत पोहोचतच नाहीत. २०२४ मध्ये तैवानमध्ये ४.८ लाख व्यक्तींवर केलेल्या एका दीर्घकालीन अभ्यासात दिसून आले, की दिवसभर बसून काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये हृदयविकारामुळे मृत्यू होण्याचा धोका दिवसभर शारीरिक हालचाल करणाऱ्यांच्या तुलनेने ३४ टक्क्यांनी अधिक होता. थोडा वेळ केलेला व्यायाम उपयोगी ठरतो, पण उरलेला संपूर्ण दिवस बसूनच गेला तर ते नुकसान पूर्ण भरून निघत नाही. बसून राहण्याची सवय मोडून काढा. सतत बसून राहणे थांबवण्यासाठी गजर लावा. अवघी दोन मिनिटे चालणे किंवा स्ट्रेचिंग केल्यामुळेही रक्ताभिसरण सुधारते आणि साखरेचे नियंत्रण चांगले राहते.

**वॉकिंग मिटिंग्स:** मीटिंगसाठी कॉन्फरन्स रूमऐवजी ऑफिस किंवा कॅम्पसभोवती फेरफटका मारा.

**ॲक्टिव्ह प्रवास:** गाडी थोडी दूर पार्क करा, सार्वजनिक परिवहनाचा वापर करत असाल तर एक स्टॉप आधी उतरा किंवा शक्य असेल तेव्हा सायकलने जा.

**सीट स्टँड वर्क स्टेशन्स:** बसून काम करण्यासोबतच उभे राहून काम करण्याचाही पर्याय ठेवा. मात्र लक्षात ठेवा, हालचाल न करता फक्त उभे राहणे पुरेसे नाही. कामाच्या ठिकाणी संस्कृतीत बदल आवश्यक आहे. एकत्रितपणे 'हालचालीसाठी ब्रेक' घेण्याची सवय लावून घ्या. पायऱ्या मोजण्याच्या स्पर्धांसाठी प्रोत्साहन द्या. कार्यालयांची रचना अशी ठेवा की चालण्याला चालना मिळेल.

# ताण वाढतोय?

आयुर्वेद आणि विकार



ताणतणाव ही सध्याची सामान्य समस्या बनून गेली आहे. सध्याच्या काळात जवळपास प्रत्येक व्यक्ती तणावग्रस्त आहे. तणावावर मात करण्यासाठी काही उपाय करणं गरजेचं आहे. आयुर्वेदिक वनौषधी ताण कमी करायला मदत करू शकतात.

* जवळपास दोन हजार वर्षांपासून अश्वगंधा या वनौषधीचा वापर होतो आहे. अश्वगंधामुळे शरीरातल्या कार्टिसॉल या हार्मोनचं प्रमाण कमी व्हायला मदत होते. कार्टिसॉल हा प्रमुख स्ट्रेस हार्मोन आहे. अश्वगंधाच्या नियमित सेवनामुळे नैराश्य, अस्वस्थता, भीती, ताण अशा समस्या दूर होऊ शकतात.

* ब्राह्मीमुळे मेंदू तल्लख होतो. स्मरणशक्ती सुधारते. म्हणूनच ब्राह्मीच्या सेवनामुळे मानसिक विकारांना आळा बसू शकतो. ब्राह्मीमुळे ताणाचे परिणाम कमी होऊ शकतात.

* घरोघरी आढळणारी तुळसही खूप प्रभावी आहे. तुळशीमुळे मानसिक समाधान लाभतं तसंच अस्वस्थता, चिंता, ताण कमी व्हायला मदत होते.

* भृंगराजयुक्त चहा प्यायलामुळे मानसिक समाधान लाभतं तसंच शरीरही तणावमुक्त होतं. भृंगराजमधल्या काही घटकांमुळे मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठ्यात सुधारणा होते आणि ताण, नैराश्य अशा समस्या कमी व्हायला मदत होते.

**नवसंशोधन**


## मॅरेथॉनमध्ये धावल्यामुळे...



मॅरेथॉनमध्ये धावण्याचं प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललं आहे. विविध सामाजिक कारणांसाठीही मॅरेथॉनचं आयोजन केलं जातं. अनेक शहरांमध्ये मॅरेथॉन होतात. मॅरेथॉनमध्ये धावणं आरोग्यासाठी, त्यातही हृदयाच्या आरोग्यासाठी चांगलं असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. मॅरेथॉनमध्ये धावल्यामुळे हृदयाचं वय सुमारे चार वर्षांनी कमी होतं, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. 'अमेरिकन कॉलेज ऑफ कार्डिओलॉजी' या जर्नलमध्ये याबाबतचं संशोधन प्रसिद्ध झालं आहे. पहिल्या मॅरेथॉनमध्ये धावल्यामुळे हृदयाला बरेच लाभ मिळतात, असं हे संशोधन सांगतं. त्यामुळे मॅरेथॉनमध्ये धावायला काहीच हरकत नाही.

**डोळ्यांचं आरोग्य**

## डोळे फुगीर वाटतात?



डोळ्यांचा आतला भाग बरेचदा फुगीर वाटतो. पण हे एखाद्या नेत्रविकाराचं लक्षण असू शकतं. या प्रकाराला ॲक्सॉफथॅल्मॉस असं म्हणतात. ॲक्सॉफथॅल्मॉस हा विकार इतर काही शारीरिक व्याधींमुळे उद्‌भवतो. ग्रेव्हज आय डिसिजमुळे डोळे फुगण्याची समस्या निर्माण होऊ शकते. थायरॉइड हार्मोन्सची निर्मिती अधिक प्रमाणात झाल्यास हा विकार होतो. यात डोळे अधिकच फुगीर वाटतात. ॲक्सॉफथॅल्मॉसची काही लक्षणं आहेत. डोळ्यांचा कोरडेपणा, डोळ्यांवर ताण येणं किंवा टोचल्यासारखं वाटणं, पापण्यालगत सूज येणं, डोळ्यातून पाणी येणं, डोळे लाल होणं अशी लक्षणं दिसत दिसली तर तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा.

**जपणूक त्वचेची**

## वाढवा त्वचेचा तजेला




शरीरातली विषद्रव्यं काढल्यास त्वचा छान तजेलदार दिसते. त्वचेचा तजेला वाढवण्यासाठी शरीरातली घातक विषद्रव्यं काढून टाकणारी पेयं तयार करता येतील. 'क' जीवनसत्त्वयुक्त पेयं त्वचेसाठी खूप लाभदायी ठरतात. लिंबू, संत्री, मोसंबी, आवळा ही फळं 'क' जीवनसत्त्वाने समृद्ध असतात. 'क' जीवनसत्त्वयुक्त पेयं बनवण्यासाठी थंड पाण्याच्या ग्लासमध्ये लिंबाचा रस घाला. यात संत्र्याचे तुकडे किंवा रस घाला. काकडीचे काप, पुदिन्याची पानंही घाला. हे मिश्रण काही काळ बाजूला ठेवा. सगळे घटक नीट मिसळणं गरजेचं आहे. हे पेय नियमित प्या. यामुळे त्वचा तजेलदार दिसेल.

**आजीबाईचा बटवा**

## बहुगुणी तीळ



तीळ सहसा थंडीत खाल्ले जातात. छोट्या आकाराचे तीळ खूप गुणकारी असतात. म्हणूनच थंडीतच नाही तर प्रत्येक हंगामात तीळ खायला हवेत. तिळामुळे बद्धकोष्ठतेची समस्या दूर होऊ शकते. बरेचदा कोरडा खोकला लवकर जात नाही. अशा वेळी तीळ आणि खडीसाखर एकत्र खाल्ल्यामुळे लाभ होऊ शकतात. तिळाच्या तेलात एक लसूणपाकळी घालून गरम करा. हे तेल घातल्यामुळे कानदुखी बरी होऊ शकते. तीळ हृदयाच्या आरोग्यासाठीही चांगले असतात. तिळामुळे वाईट कोलेस्टेरॉलचं प्रमाण कमी होतं. तिळामुळे केस गळणं तसंच पांढरे होणं कमी होऊ शकतं.

## बुद्धिबळ राणी दिव्या देशमुखचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नागपुरात सत्कार



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३० :** जॉर्जिया येथील बातुमी येथे आयोजित फिडे वुमन्स वर्ल्ड कप २०२५ वर अवघ्या १९ व्या वर्षी नागपूरच्या दिव्या देशमुखने आपली मोहर उमटवून संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले.

भारतीय खेळाडू ग्रॅण्ड मास्टर कोनेरु हम्पीला चेकमेट करत बुद्धीबळातील हा विश्वकप तिने अलगद आपल्याकडे खेचून घेत ८८ वी भारतीय ग्रॅण्ड मास्टर हा किताब मिळविला. तिच्या या अभूतपूर्व यशाबद्दल महाराष्ट्र शासनातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री आशिष जायस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत २ ऑगस्ट रोजी जाहीर नागरी सत्कार केला जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिली.

नागपूर कन्येच्या या जागतिक यशाबद्दल आयोजित समारंभासाठी नागपूरकरांसह जिल्ह्यातील सर्व क्रीडा संघटना, २ ऑगस्ट रोजी सुरेश भट सभागृहात सकाळी ११.३० वाजता आवर्जून सहभागी होतील, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी बैठकीत व्यक्त केला.

या सोहळ्यास जिल्ह्यातील खेळाडू, क्रीडा प्रेमी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन त्यांनी केले. या विशेष समारंभासाठी आयोजन समितीसह विविध समित्यांचे गठण करण्यात आल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक यांनी दिले.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली आज आयोजित बैठकीस जिल्हा बुद्धीबळ संघटनेचे एस. एस. सोमण, मनपा, शिक्षण व इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# उपराजधानीतील दंगल पूर्वनियोजित




■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३० :** मार्च महिन्यात महाल परिसरात घडलेली दंगल ही मुस्लीम समाजकंटकांकडून पूर्वनियोजित होती. कबरीची प्रतिकृती आणि हिरव्या कापडाची जाळपोळ हे केवळ एक क्षणिक निमित्त होते.

मुस्लीम समाजात पसरवण्यात आलेल्या गैरसमजामुळे हा प्रकार घडला आहे. हिंदू समाजाला लक्ष्य करण्यासाठी ही दंगल घडवण्यात आली होती, असा आरोप भारतीय विचार मंचच्या तथ्य संशोधन समितीच्या अहवालात करण्यात आला आहे.

पत्रकार परिषदेत भारतीय विचार मंचने अहवालासंदर्भात माहिती दिली. समितीचे सदस्य व ज्येष्ठ पत्रकार चारुदत्त कहू म्हणाले, देशात मागील काही काळात घडलेल्या घटनाक्रमानंतर मुस्लीम समाजात पसरवण्यात आलेल्या गैरसमजांनी मोठ्या प्रमाणात या घटनेला हातभार लावल्याचे समितीला आढळून आले. मुस्लीम दुकानदारांकडून एरवी पथपदावर असणारी दुचाकी वाहने दंगलीच्या दिवशी दुपारपासूनच हटवण्यात आली होती. दंगलखोर जमाव मोठे दगड, लाठ्या-काठ्या, काचेच्या बाटल्या, तलवारी, चाकू, पेट्रोल बॉम्ब बाळगून होता. त्यातून ही दंगल नियोजित होती, हे स्पष्ट होते. हिंदू समाजाला लक्ष्य करण्याचा हा प्रयत्न होता, असा दावा कहूंनी केला. पोलीस आयुक्त निकेतन कदम जबर जखमी झाल्याचाही उल्लेख या अहवालात आहे. पत्रकार परिषदेला सुनील किटकरू, रमाकांत दाणी, ॲड. रितू घाटे उपस्थित होते.

या दंगलीचा आरोपी फहीम खान याच्या घरावर झालेली कारवाई चूक असल्याचा आक्षेप मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने घेतला होता. मात्र, तथ्यशोधन समितीने ही कारवाई योग्य ठरवली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला पोलिसांचा विनयभंग झाला नाही, असे सांगितले होते.

मात्र, त्यानंतरही तथ्यशोधन समितीने एका महिला पोलिसाचा विनयभंग करण्यात आल्याचे व हा प्रकार केवळ एका व्यक्तीवरचा हल्ला नसून, तो संपूर्ण सुरक्षा यंत्रणेच्या मनोबलावर केलेला क्रूर आघात आहे, असे निष्कर्ष संबंधित समितीने आपल्या अहवालात मांडले आहेत.

# टेक्सासमधून जप्त माल सोडण्याचे आदेश

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** ऑपरेशन एक्स अंतर्गत, शहर पोलिसांनी टेक्सास स्मोक शॉपच्या चेन आउटलेटवर छापा टाकला आणि लाखो रुपयांचे ई-सिगारेट, हुक्का फ्लेवर्स, हुक्का पॉट्स, लाईटर इत्यादी जप्त केले होते.

या प्रकरणात न्यायालयाने टेक्सास स्मोक शॉपचे संचालक आशिष उर्फ अंकुश शाहूला दिलासा देत पोलिसांना सर्व माल सोडण्यासोबतच गोदामाचे सील काढण्याचे आदेश दिले आहेत. पोलिसांसाठी हा मोठा धक्का असल्याचे सांगण्यात येत आहे.

मे महिन्यात पोलिसांनी एकाच वेळी सर्व दुकानांवर धाड टाकली होती. याशिवाय आशिषच्या गोदामातून मोठ्या प्रमाणात माल जप्त करीत त्याच्याविरुद्ध कोटपा कायद्यासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली होती.

सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर, टेक्सास कंपनीने त्यांचे वकील प्रकाश नायडू यांच्यामार्फत जप्त केलेले सामान, रोख रक्कम परत मिळविण्यासाठी आणि गोदामावरील सील हटविण्यासाठी अपील दाखल केले होते. ॲड. नायडू यांनी टेक्सासमधून जप्त केलेल्या वस्तूंचा सुप्रतनामा जारी करण्याची आणि गोदामावरील सील काढण्यासाठी युक्तिवाद करताना न्यायालयाला सांगितले की पोलिस यंत्रणेने त्यांना दिलेल्या अधिकारांचे घोर उल्लंघन केले आहे. दिलेल्या अधिकारांचा वापर मनमानी पद्धतीने केला आहे.

पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन काम केले आणि कंपनीवर बिनबुडाचे आरोप केले आहेत. पोलिस अधिकाऱ्यांच्या कृतींची चौकशी करण्यासाठी आणि त्यांच्या बेकायदेशीर कृत्यांसाठी पोलिस अधिकाऱ्यांवर दोषसिद्धी सुनिश्चित करण्यासाठीही चौकशी झाली पाहिजे.

याचिकाकर्त्याने युक्तिवाद केला की कोटपा कायद्यातील तरतुदींनुसार, हुक्का उत्पादनांची विक्री आणि पोलिसांनी जप्त केलेल्या सर्व वस्तूंच्या विक्रीवर कोणतीही बंदी नाही. दुकाने आणि व्यापाऱ्यांवर पोलिसांकडून केले जाणारे छापे हे कायद्यांचे उघड उल्लंघन आहे. पोलिसांना सदर वस्तूंच्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याचा कोणताही अधिकार नाही. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या अनेक प्रकरणांचा हवाला देत, याचिकाकर्त्याने पोलिसांची कारवाई बेकायदेशीर असल्याचे न्यायालयाला सांगितले. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बी.एम.एन. देशमुख यांनी अंकुशला दिलासा देत जप्त केलेल्या सर्व वस्तू सोडण्याचे आणि गोदामातील सील काढण्याचे आदेश दिले.

## विजेसंबंधी संपूर्ण माहिती केवळ एका क्लिकवर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** वीजपुरवठ्यासंबंधी माहितीसाठी महावितरण कार्यालयात हेलपाटे मारणे किंवा फोन करण्याची आता आवश्यकता नाही. महावितरणने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सोप्या आणि जलद सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

'महावितरण मोबाईल ॲप' आणि 'ऊर्जा' चॅटबॉटच्या मदतीने आता घरबसल्या तुमच्या विजेच्या सर्व समस्या आणि प्रश्नांची उत्तरे मिळवू शकता, तसेच तक्रारीही नोंदवू शकता. तुमचा मोबाईल नंबर महावितरणकडे नोंदणीकृत असणे.

पावसाळ्यात वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित होणे, खांब पडणे किंवा तारा तुटणे अशा समस्या मोठ्या प्रमाणावर उद्भवतात. अशा वेळी नेमकी काय समस्या आहे आणि ती कुठे आहे, याची माहिती ग्राहकांना पटकन मिळत नाही.

याच गोष्टी लक्षात घेऊन महावितरणने हे नवीन उपक्रम सुरू केले आहेत. या ॲप आणि चॅटबॉटमुळे तुम्हाला विजेच्या बिलाची माहिती, बिल भरणा, तक्रारी नोंदवणे आणि नवीन वीजजोडणीची माहिती एका क्लिकवर मिळेल. यासाठी महावितरणने ग्राहकांना अनेक पर्याय उपलब्ध करुन दिले आहेत.

महावितरण मोबाईल ॲप हे ॲप गुगल प्ले स्टोअर्स आणि ॲपल ॲप स्टोअर्सवर उपलब्ध आहे. यावर तुम्हाला आवश्यक माहिती, तक्रार नोंदणी आणि इतर अनेक सुविधा मिळतील.

'ऊर्जा' चॅटबॉट हा २४ तास उपलब्ध असून, तो तुम्हाला नवीन वीजजोडणी अजाची सद्यस्थिती, वीजबिल भरणे, वीजबिलाचा तपशील, मोबाईल क्रमांक आणि ई-मेल नोंदणी, स्वतः मीटर रीडिंग सबमिट करणे, गो-ग्रीन नोंदणी, वीज वापर आणि बिलाचे कॅल्क्युलेटर अशा अनेक गोष्टींमध्ये थेट मदत करेल.

महावितरण संकेतस्थळावर तुम्हाला सर्व माहिती सविस्तरपणे उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे ग्राहकांच्या तक्रारींचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

वीजपुरवठा, वीज देयक आणि इतर तक्रारींसाठी महावितरणचे कॉल सेंटर सदैव सेवेत आहे. तुम्ही १९१२/१९१२०/ १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ या क्रमांकांवर कॉल करून तक्रार नोंदवू शकता.

ग्राहकाला महावितरणकडे त्याचा मोबाईल क्रमांकाची नोंदणी करणे किंवा तो बदलणे सोपे आहे यासाठी 'MPEG <१२ अंकी ग्राहक क्रमांक>' असा एसएमएस ९९३०३९९३०३ या क्रमांकावर एसएमएस पाठवा. अथवा महावितरणच्या संकेतस्थळावरून किंवा मोबाईल ॲपवरूनही तुम्ही मोबाईल क्रमांक नोंदवू किंवा बदलू शकता.

एकदा महावितरणकडे ग्राहकाचा मोबाईल क्रमांक नोंदणीकृत झाला की, ग्राहकाला वीजपुरवठा खंडित झाल्याची तक्रार देण्यासाठी, नोंदणीकृत मोबाईलवरून ०२२-५०८९७१०० या क्रमांकावर मिस कॉल करू शकता किंवा एसएमएस पाठवू शकता. वेळेवर विजेसंबंधी अपडेट्स मिळतील. याशिवाय ग्राहकाचा वेळ वाचेल आणि अनावश्यक त्रासातून सुटका मिळेल.

ग्राहकांचे चुकीचे क्रमांक नोंदवले असू शकतात. अशा ग्राहकांनी आपला अचूक मोबाईल क्रमांक नोंदवावा. तसेच, ज्या ग्राहकांना आधी नोंदवलेला मोबाईल क्रमांक बदलायचा असेल, त्यांनीही नवीन क्रमांक नोंदणीकृत करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. महावितरणने या सर्व सुविधा ग्राहकांना एका क्लिकवर मिळाव्यात या उद्देशाने उपलब्ध केल्या आहेत.

### भुसावळ विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक पदाचा
## पुनीत अग्रवाल यांनी स्वीकारला कार्यभार



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** भारतीय रेल्वेच्या इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी सेवेतील १९९६ बॅचचे अधिकारी श्री पुनीत अग्रवाल यांनी भुसावळ विभागाच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापक पदाचा कार्यभार स्वीकारला. त्यांनी श्रीमती. इती पाण्डेय यांच्याकडून पदभार स्वीकारला. या पदावर नियुक्त होण्यापूर्वी अग्रवाल नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड येथे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक (प्रतिनियुक्त) या पदावर कार्यरत होते.

पुनीत अग्रवाल यांना प्रकल्प व्यवस्थापन व विकास, धोरणात्मक व्यवस्थापन, कॉर्पोरेट व्यवहार, मालवाहतूक व लॉजिस्टिक्स, शहरी परिवहन, बहुपक्षीय निधी व्यवस्थापन, उच्च मूल्य खरेदी प्रक्रिया, रेल्वे ऑपरेशन्स, रोलिंग स्टॉक ऑपरेशन्स आणि देखभाल, रेल्वे विद्युतीकरण, हरित ऊर्जा, मानकीकरण व गुणवत्ता व्यवस्थापन तसेच कॉर्पोरेट कायदे (करार कायदे, कंपनी कायदे इत्यादी) यामधील व्यापक अनुभव आणि सखोल ज्ञान आहे.

भारतीय रेल्वेमधील उल्लेखनीय सेवेसह, त्यांनी डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडमध्येही विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. प्रकल्प अंमलबजावणीचे नियोजन व वेळापत्रक, साहित्य व्यवस्थापन, देखभाल धोरण, टोटल क्वालिटी मॅनेजमेंट आणि करड अंमलबजावणी यामध्येही त्यांचा विशेष अनुभव आहे. पुनीत अग्रवाल यांचे नेतृत्वाखाली विभागात प्रगती, आधुनिकीकरण व कार्यक्षमतेत वाढ होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

## राज्य अनु. जाती जमाती आयोगाकडून नितीन फुल्लुके यांचे अभिनंदन

### ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी केले सन्मानित



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत भारतीय माहिती सेवेसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत निवड झालेले नितीन फुल्लुके यांचा महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगामार्फत सत्कार करण्यात आला. आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी फुल्लुके यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत राष्ट्रीय स्तरावर वीस पदांसाठी भारतीय माहिती सेवेसाठी परीक्षा घेण्यात आली होती. यामध्ये नागपुरातील नितीन फुल्लुके यांची निवड झाली. या निवडीबद्दल महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी आनंद व्यक्त करीत नागपुरातील रविभवन येथे नितीन फुल्लुके यांचा सत्कार केला.

मुळचे गोंदिया जिल्ह्यातील असलेले नितीन फुल्लुके यांचे हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. समाजातील अनेक विद्यार्थ्यांना या यशामुळे प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळेल व त्यांना देखील पुढे जाण्यासाठी मार्गदर्शन मिळेल, असा विश्वास यावेळी आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी व्यक्त केला. याप्रसंगी मोनाल थूल, सौरभ नाखले हे उपस्थित होते.

## तुळजाभवानीचे गाभाऱ्यातील दर्शन १० ऑगस्टपर्यंत बंद

**भाविकांना फक्त मुखदर्शनाची परवानगी**

■ **वृत्तसंस्था, तुळजापूर, दि. ३० :** तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिरात देवीच्या सिंहासन मंडपात (मुख्य गाभाऱ्यात) सध्या जीर्णोद्धाराचे काम सुरू असून, या पार्श्वभूमीवर १ ते १० ऑगस्टदरम्यान देवीचे गाभाऱ्यातील दर्शन बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत भाविकांना केवळ मुखदर्शनाची मुभा देण्यात आली आहे.

या दरम्यान देवीच्या सिंहासन गाभाऱ्यात कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. मंदिरातील शिल्पकलेचे संरक्षण आणि ऐतिहासिक वास्तूंच्या टिकावासाठी पुरातत्त्व विभागामार्फत जीर्णोद्धाराचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. हे काम पूर्ण होईपर्यंत सुरक्षा कारणास्तव गाभाऱ्यातील थेट दर्शन बंद ठेवण्यात आले आहे.

देवस्थान समिती व प्रशासनाने भाविकांनी संयम बाळगावा, गर्दी टाळावी व मंदिर प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन केले आहे. यासोबतच मुखदर्शनाची व्यवस्था सुयोग्य पद्धतीने करण्यात आली असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरवर्षी श्रावण मासात आणि सप्ताहांतामध्ये लाखो भाविक तुळजाभवानीच्या दर्शनासाठी येतात. त्यामुळे या निर्णयामुळे काही काळ भाविकांची निराशा होण्याची शक्यता आहे. मात्र देवीच्या मूळ स्थापनेचे जतन हेच उद्दिष्ट असल्याने सर्वांनी सहकार्य करावे, असेही देवस्थान समितीने स्पष्ट केले.

## पत्रकारांच्या हक्कांसाठी बुलंद हुंकार

### राजस्थान अधिवेशनात संदीप काळे यांचे सरकारला आव्हान




■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३० :** राजस्थानातील झोटवाडा येथे झालेल्या व्हॉईस ऑफ मीडियाच्या राज्य अधिवेशनात संस्थेचे संस्थापक आणि आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी पत्रकारांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र कायदा लागू करण्याची जोरदार मागणी केली.

हजारो पत्रकारांच्या उपस्थितीत झालेल्या या अधिवेशनात काळे यांनी स्पष्ट शब्दांत सरकारला इशारा दिला, आम्ही कोणतीही निवडणूक जिंकायला आलेलो नाही. आम्ही पत्रकार आहोत... आणि आमची लेखणीच आमचं अस्त्र आहे.

यावेळी बोलताना त्यांनी पत्रकारांच्या समस्यांवर थेट आणि आक्रमक भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, सध्या पत्रकारांवर वाढत्या धमक्या, खोटे गुन्हे, पोलिसी दडपशाही आणि आर्थिक असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने पत्रकार संरक्षण कायदा लागू केला पाहिजे. या कायद्यात विशेष न्यायालय, तत्काळ एफआयआर आणि साक्षी संरक्षण यांसारख्या तरतुदी असाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पत्रकारांसाठी पेन्शन व आरोग्य विमा योजना लागू कराव्यात, अशी मागणी करताना काळे म्हणाले, बिहारमध्ये पत्रकारांना दरमहा १५,००० पेन्शन दिली जाते, तर त्यांच्या पत्नी/पतीला मृत्यूनंतर १०,०००. मग राजस्थान मागे का? त्यांनी ही योजना तातडीने लागू करण्याची मागणी केली. तसेच, पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी १० लाखांचा आरोग्य विमा सरकारने मोफत द्यावा, अशीही भूमिका त्यांनी मांडली.

काळे यांनी डिजिटल पत्रकारितेच्या वाढत्या प्रभावाला मान्यता देण्याची गरज अधोरेखित केली. युट्यूब, पोर्टल्स, सोशल मीडिया या माध्यमांमध्ये हजारो पत्रकार रात्रंदिवस काम करत आहेत. त्यांनाही मान्यता, ओळखपत्र, जाहिराती आणि संरक्षण मिळाले पाहिजे, असा ठाम पवित्रा त्यांनी घेतला.

तसेच, पत्रकारांच्या समस्यांसाठी राज्य पत्रकार आयोग स्थापन करणे, प्रादेशिक व ग्रामीण पत्रकारांसाठी घरकुल योजना, पत्रकारांच्या मुलांना शैक्षणिक सवलती, आणि महिला पत्रकारांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र विभाग सुरू करण्याचे प्रस्तावही त्यांनी सादर केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित पत्रकारांनी पत्रकार झुकेगा नहीं आणि व्हॉईस ऑफ मीडिया जिंदाबाद या घोषणा देत संदीप काळे यांच्या नेतृत्वाला पाठिंबा दर्शवला. या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष गोपाल गुप्ता, आनंद गुप्ता, मंजू शर्मा, राजेंद्र शर्मा, नरेश जाजू, प्रतीक जैन, बाबूलाल यांच्यासह अनेक मान्यवरांनी सहभाग नोंदवला.

# विदर्भात वीजवाहिन्यांचे विलगीकरण व उपकेंद्रांचे सक्षमीकरण पूर्णत्वाकडे




■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३० :** सुधारित वितरण क्षेत्र योजनेतून (आरडीएसएस) विदर्भामध्ये १००७ वीजवाहिन्यांच्या विलगीकरणाचे व इतर तांत्रिक कामांसह मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मधून ७२७ उपकेंद्रांच्या सक्षमीकरण व क्षमतावाढीचे कामे पूर्णत्वाकडे आहेत. त्यामुळे नवीन वीजजोडणीसह सर्व ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा देण्यास प्राधान्य द्यावे. तसेच वीजहानी कमी करून वीजबिलांच्या वसूलीला आणखी वेग द्यावा. यात कोणतीही हयगय करू नये असे निर्देश महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी बुधवारी नागपूर प्रादेशिक विभागाच्या आढावा बैठकीत दिले.

अकोला येथील नियोजन भवनात अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर व गोंदीया परिमंडलातील विविध कामे व योजनांसह प्रामुख्याने मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०, मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेचा लोकेश चंद्र यांनी आढावा घेतला. यावेळी संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे, प्रादेशिक संचालक परेश भागवत, सौर कंपनीचे सल्लागार श्रीकांत जलतारे, मुख्य अभियंते राजेश नाईक (अकोला), सुहास रंगारी (गोंदिया), दिलीप दोडके (नागपूर), हरिश गजबे (चंद्रपूर), अशोक साळुंके (अमरावती) यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकेश चंद्र म्हणाले की, कृषीपंपाला दिवसा वीज पुरवठा आणि बिगर कृषी ग्राहकांना २४ तास वीज उपलब्ध करून देण्यासाठी विदर्भात १ हजार ७ वीजवाहिन्यांच्या विलगीकरणाचे कामे सुरू आहेत. त्यापैकी ३१४ वीजवाहिन्यांचे काम पूर्ण झाले आहे.

उच्च व लघुदाबाच्या ३०८९ किलोमीटर वीजवाहिन्या, ९६७० किलोमीटर एरिअल बंच यासह इतर तांत्रिक कामे सुरु आहेत. ही कामे दर्जेदार व दिलेल्या मुदतीत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत विदर्भामध्ये १ लाख ४२ हजार ७३२ घरगुती ग्राहकांनी छतावर सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असल्याने त्याचे वीजबिल शून्यवत झाले आहे.

घरगुती ग्राहकांमध्ये या योजनेबाबत प्रबोधन करून लाभ मिळवून द्यावा असे निर्देश त्यांनी दिले.

महावितरणच्या आर्थिक स्थैर्यासाठी वीजबिलाची शंभर टक्के वसूली तसेच तांत्रिक व वाणिज्यिक हानी कमी करणे यावर आणखी भर द्यावा लागणार आहे. गेल्या एप्रिलपासून वीजबिलांच्या थकबाकीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे संपूर्ण थकबाकीसह चालू वीजबिलांच्या वसूलीशिवाय अन्य पर्याय नाही. महसूलवाढ व वसूलीमध्ये हयगय केल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

महावितरणच्या सर्व ग्राहकसेवा वेबासाईट व मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन आहेत. ग्राहकांना घरबसल्या ग्राहकसेवा उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्राहकांना ऑनलाइन अर्जांद्वारे तत्पर सेवा देण्यात यावी. यामध्ये सेवेच्या कृती मानकांनुसार विहीत सेवा देण्याबाबत सजग राहावे. सुरळीत वीजपुरवठ्यासाठी तांबडतोब उपाययोजना कराव्यात. देखभाल व दुरुस्तीसह पायाभूत यंत्रणेच्या सक्षमीकरणासाठी स्थानिक आराखडे करून संबंधित कामांना वेग द्यावा, असे निर्देश लोकेश चंद्र यांनी दिले.

**वीज दर कपातीचा उद्योगांना लाभ**

अकोला जिल्ह्यातील उद्योजकांशी लोकेश चंद्र यांनी विविध मुद्द्यांवर संवाद साधला. यावेळी एमएसईबी होल्डींग कंपनीचे स्वतंत्र संचालक आशिष चंदराणा उपस्थित होते. लोकेश चंद्र म्हणाले की, मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात गेल्या अडीच वर्षांमध्ये ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीमुळे प्रथमच वीज दरात कपात झाली आहे. पुढील पाच वर्षांमध्ये लघु व उच्चदाबाच्या औद्योगिक वीज दरात घट होत जाणार आहे अशी माहिती देत उद्योजकांच्या विविध वीज प्रश्नांवर चर्चा करून ते त्वरित सोडविण्यासाठी लोकेश चंद्र यांनी स्थानिक यंत्रणेला निर्देश दिले.